**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग – दोन**

**गुरुवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ / भाद्रपद २०, १९४७ (शके)**

**११५. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण २९३ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २९३ निवेदनांपैकी २५ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण २६८ निवेदनांपैकी ९४ निवेदने गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली. १७४ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. आता ४५ निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित १२९ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : ११ सप्टेंबर, २०२५**

**मेघना तळेकर**
**सचिव-२ ,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
३. संगणक कक्ष (Website)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

लक्षवेधी सूचना क्रमांक १९९८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.भीमराव केराम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९९८ पुढीलप्रमाणे आहे.

"मंत्रालयात आदिवासींच्या विविध विभागातील राखीव ५० जागांवर बिगर आदिवासींनी बळकावला असल्याचे निदर्शनास येणे, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी, लिपिक टंकलेखक, उच्चश्रेणी लघु टंकलेखक, यात समावेश असणे, अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर ५० जणांनी आदिवासी म्हणून नियुक्ती मिळविले असल्याचे निदर्शनास आल्याने हे प्रकरण न्यायालयात गेले असणे आदिवासी जमातीचे ३९ जणांचे जात प्रमाणपत्र अवैद्य झाले असणे, त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळून येणे, ७ जणांचे उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असणे, ४ जणांचे जात प्रमाणपत्र अवैद्य ठरल्याने त्यांची सेवा समाप्त करण्याचे प्रस्तावित असणे, हे सर्वजण अधिसंख्य पदावर कार्यरत असणे, सर्वोच्च न्यायालयाने यावेळी दि. ६ जुलै २०१७ रोजी निर्णय असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि. २८ सप्टेंबर २०१८ रोजी निर्णय देत भरती प्रक्रिया नव्याने राबविण्याचे निर्देश दिले असणे, त्या अनुषंगाने राज्य शासनाने आदिवासी समाजाच्या विशेष पदभरती करिता दि. २१ डिसेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केले असणे, मात्र एकीकडे शासन भरती प्रक्रिया राबवत असताना दुसरीकडे आदिवासींसाठी राखीव असलेल्या ५० पदांचा निर्णय अद्याप घेतलेला नसणे, त्यामुळे बेरोजगार आदिवासी उमेदवारांची पदभरती थांबविण्याबाबत होत असलेली मागणी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

### मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १६-ब) यांच्या दिनांक २१.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य मागासवर्ग जात प्रमाणपत्र अथवा वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबतचा निर्णय घेतला त्यानुसार मंत्रालयीन संवर्गात ज्या अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवेने अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्ती झाली, तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य मागासवर्ग जात प्रमाणपत्र अथवा वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या ४६ तसेच अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे ज्यांच्या सेवा समाप्त केल्या असे ४ कर्मचारी मिळून ५० अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा दिनांक १८.०१.२०२० च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत.

मंत्रालयीन संवर्गात अनुसूचित जमाती प्रवर्गात सरळसेवेने नियुक्त झालेल्या तथापि, जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे अन्य मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना अनुसूचित जमातीच्या बिंदूवरुन वगळण्यात येवून, रिक्त झालेली पदे त्या-त्या वेळी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्यात आलेली आहेत.

दिनांक २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये जे अधिकारी व कर्मचारी त्यांच्या मूळ नियुक्तीच्या पदावर कार्यरत असतील अशाच अधिकारी व कर्मचाऱ्यांची अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेली पदे सरळसेवेने भरण्याकरिता विशेष भरती मोहिम राबविण्यात यावी अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या. त्यानुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या पदांपैकी मूळ नियुक्तीच्या सरळसेवेच्या पदावर कार्यरत असलेल्या सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील १ व लिपिक-टंकलेखक संवर्गातील ४ अशा अनुसूचित जमाती प्रवर्गातील एकूण ५ पदांचा समावेश सन २०२१ च्या परीक्षेमध्ये करुन ती पदे भरण्यात आलेली आहेत.

*****

लक्षवेधी सुचना क्र.२८५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

श्री.चेतन तुपे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. मंगेश चव्हाण, प्रतापराव पाटील चिखलीकर, श्रीमती सना मलिक वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२८५ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची होत असलेली विक्री, अंमली पदार्थ विरोधी शाखेने राज्यात मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस आणले असून यामध्ये विशेषतः बिटा (जि.सांगली) येथील औद्योगिक वसाहतीतील बंद कारखान्यात एमडी ड्रग्ज बनविणाऱ्या बेकायदेशीर स्थानिक गुन्हे अन्वेशण पथकाने टाकलेल्या छाप्यात ३० कोटी रुपयांचे १४ किलो ५०० ग्रॅम एमडी जप्त करणे,तसेच सांगली येथेच नशेसाठी मेफेटमाईन नावाचे औषधी इंजेक्शन आणि गोळयांची विक्री करणाऱ्या केमिस्ट दुकानदारास केलेली अटक तसेच मुंबई,छत्रपती संभाजीनगर,नाशिक,चाकण, कोल्हापूर,पुणे,चंद्रपूर,रत्नागिरी, ठाणे येथे व अन्य जिल्हयात मोठया प्रमाणावर अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या टोळ्यांना गुन्हे अन्वेशण विभागाने अटक करुन त्यांच्याकडून चरस, गांजा, डोडा पावडर, कोकेन, अंमली बोंडे व इतर अंमली पदार्थ मोठ्या प्रमाणात जानेवारी-फेब्रुवारी, २०२५ मध्ये जप्त करण्यात येणे, तस्करी परदेशातील टोळी सक्रीय असल्याचे तपासात समोर येणे, याकरीता विविध भागातील दलाल, कुरियर कंपन्या, लहान कार्गो कंपन्या यांच्या साखळीचा होत असलेला वापर, परिणामी राज्यातील नागरीकांना विशेषतः युवकांना अंमली पदार्थ सहज उपलब्ध होत असल्यामुळे महाराष्ट्रात ड्रग्ज कॅन्सर ग्रासण्याची शक्यता, केवळ शहरी भागच नव्हे तर ग्रामीण भागातही ड्रग्ज तस्करांनी मोठया प्रमाणावर शिरकाव केल्याने समाजाला ड्रग्जचे गँगरीन होण्यापूर्वीच शासनाने कठोर कारवाई करुन या अंमली पदार्थ विक्रीस कायमस्वरुपी आळा घालण्यासाठी तात्काळ करावयाची कठोर कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या इसमांविरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते.. कोल्हापूर, सांगलीसह पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्हा/शहरी भागात अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे व गुन्हे प्रकटीकरण शाखा यांचेमार्फत अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येते.तसेच

स्थानिक पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थांचे सेवन करणारे सेवानार्थी इसमांविरुध्द देखील कारवाई करण्यात येते.

पोलीस अधीक्षक, सांगली यांच्या कार्यक्षेत्रातील विटा पोलीस ठाणे हद्दीतील रामकृष्ण हरी माऊली इंडस्ट्रीज, कार्वे एम.आय.डी.सी. येथे एम.डी.(मेफेड्रॉन) ड्रग्ज तयार करणारा कारखाना आणि १४ किलो ८०६ ग्रॅम वजनाचे एम.डी. ड्रग्ज, मशिनरी, केमिकल व इतर साहित्य असे एकुण रु.२९,७३,५६,२००/- किंमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने दि.२८.०१.२०२५ रोजी विटा पोलीस ठाणे येथे गुरनं ५२/२५, एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८(क),२१(क),२५,२९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ९ आरोपींना अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

तसेच पोलीस अधीक्षक, सांगली यांच्या कार्यक्षेत्रातील मिरज हद्दीत मेफेनटमाईन सल्फेट या इंजेक्शनचा साठा व विक्री करतांना मिळून आल्याने दि.२१.०१.२०२५ महात्मा गांधी चौक पो.ठाणे येथे गुरनं. २०/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३,२७८,३(५) आणि औषधीद्रव्य व सौंदर्यप्रसाधाने अधि.१९४० चे कलम १८(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्यात मेफेनटमाईन सल्फेट या इंजेक्शनच्या १५०७ बाटल्या, गोळ्या, एक कार व एक मोटार सायकल असा एकूण रु.१४,४६,६४१/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यात एकूण १३ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

तसेच सन २०२५ मध्ये पोलीस अधीक्षक, सांगली यांच्या कार्यक्षेत्रातील मिरज हद्दीत नशेच्या गोळ्यांचा साठा व विक्री करतांना मिळून आल्याने महात्मा गांधी चौक पो. ठाणे येथे गुरनं ४१/२०२५ एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८(ग),२२(क) सह औषधीद्रव्य व सौंदर्यप्रसाधने अधि.१९४० चे कलम १८(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात रु.१८,०००/- इतक्या किंमतीच्या ५ एमजी व १० एमजी नायट्रोसन कंपनीच्या एकूण ८९० नशेच्या गोळ्या असा मुद्देमाल जप्त करुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सन २०२५ मध्ये मुंबई, औरंगाबाद, नाशिक, चाकण, कोल्हापूर, पुणे, चंद्रपूर, रत्नागिरी, ठाणे जिल्हयात आणि अन्य जिल्हे/शहरी भागात अंमली पदार्थांची विक्री व वाहतुक करणाऱ्यांमध्ये परदेशातील टोळी सक्रीय असल्याचे तपासात समोर येणे, याकरीता विविध भागातील दलाल, कुरियर कंपन्या, लहान कार्गो कंपन्या यांच्या साखळीचा होत असलेला वापर इ. बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत. तसेच राज्यात वेळोवेळी परदेशी/बांग्लादेशी नागरिक यांच्याबाबत गोपनिय माहिती घेवून ते राहत असलेल्या ठिकाणी कोम्बींग ऑपरेशन

करुन अंमली पदार्थाची विक्री,पूरवठा करताना मिळून आल्यास त्यांच्यावर एनडीपीएस कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द/जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द/ सेवनार्थींविरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आले आहे व एकूण रू.४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.
- विशेष पोलीस महानिरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थाबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दि.०६.०१.२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०५.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनः रचना करण्यात आली असून त्यानुसार दि. ३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स,बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

*******

गृह विभाग

लक्षवेधी सूचना क्र. ६४७

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. रोहित पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६४७ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र राज्यात स्वर्गीय आर. आर. आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य अधिनियम क्रमांक १२ लागू करण्यात आला. या अधिनियमाचा उद्देश हॉटेल, उपहारगृहे, मद्यपान कक्ष (बार रूम) आणि इतर आस्थापनांमध्ये होणाऱ्या अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालणे, तसेच या ठिकाणी कार्यरत असलेल्या महिलांचे शोषण रोखणे, त्यांची प्रतिष्ठा व सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे हा होता. या अधिनियमानुसार महाराष्ट्र राज्यात डान्स बार बंद करण्यात आले होते. मात्र, सध्या महाराष्ट्र सरकार वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आणि राज्याच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने पुन्हा डान्स बार सुरू करण्याचा विचार करत असणे, तथापि, अशा निर्णयामुळे महाराष्ट्रात सध्या भेडसावत असलेल्या महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता असणे. नवीन नियम व कायद्यांची कठोर अंमलबजावणी करूनही डान्स बार संस्कृती महाराष्ट्राच्या पारंपरिक आणि सांस्कृतिक मुल्यांमध्ये बसणारी नाही. त्यामुळे राज्य सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करावा आणि महिलांच्या सुरक्षेसह समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घ्यावा याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

शासनाने महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ (सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) मंजुर करुन दिनांक १८.०४.२०१६ पासुन राज्यात लागू करण्यात आला आहे. हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) आणि इतर आस्थापना येथे करण्यात येणाऱ्या अश्लिल नृत्यावर प्रतिबंध करण्याच्या संबंधात आणि अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या शोषणास प्रतिबंध करण्याच्या व त्यांची प्रतिष्ठा व सुरक्षितता यास संरक्षण देण्याच्या हेतूने आणि त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे हा उद्देश आहे.

या अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीस, लायसन घेतल्याखेरीज आणि सदर अधिनियम व त्याखालील नियम याद्वारे लादलेल्या शर्ती व निर्बंधांचे अनुपालन केल्याखेरीज, जेथे नृत्ये आयोजित

केली जातात अशा हॉटेल, उपाहारगृह, मद्यपान कक्ष (बार रूम) किंवा अन्य कोणतेही ठिकाण सुरू करता येणार नाही.

महाराष्ट्र सरकार वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आणि राज्याच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने पुन्हा डान्सबार सुरू करण्याचा विचार करत आहे हे म्हणणे चुकीचे आहे. असा कुठलाही विचार शासन करीत नाही. शासन अशा कोणत्याही बाबीस समर्थन अथवा प्रोत्साहन देत नाही.

---------------------------

लक्षवेधी सुचना क्र.८३०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

सर्वश्री.विजय वडेट्टीवार, रोहित पवार, नानाभाऊ पटोले वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ८३० पुढीलप्रमाणे आहे:-

"दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी राज्यातील नामांकित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मुलांचे वसतिगृह क्रमांक ५ मध्ये २ विद्यार्थी अंमली पदार्थांचे सेवन करताना आढळून येणे, दि. १५ जानेवारी २०२५ ला पुण्यातील येरवड्यातून २२ लाखांचे ११० ग्राम एमडी नामक अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, पुणे शहरातून २०२२ मध्ये ९.९ कोटी, २०२३ मध्ये १३.६१ कोटी तर २०२४ मध्ये तब्बल ३६७९ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ सापडणे, दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी नागपुरातून १०.११ लक्ष किमतीचे विविध अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, दि.२८ जानेवारी २०२५ रोजी सांगली जिल्ह्यातील विट्याजवळील औद्योगिक वसाहतीत प्लॉट क्रमांक ४३ वरील एका कारखान्यात अत्तराऐवजी अंमली पदार्थ बनत असल्याची बाब समोर येणे, अंमली पदार्थांचे हे लोण सद्यस्थितीत शहरी भागासोबतच ग्रामीण भागात देखील पसरत असणे, दि. ३१ ऑगस्ट २०२३ रोजी राज्यात अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यात येऊन देखील सदरील टास्क फोर्स अस्तित्वात असून देखील राज्यात अमली पदार्थांच्या निर्मितीस व व्यापारास आळा घालण्यास अपयश येत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

सवित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे वसतीगृहातील दोन विद्यार्थ्यांच्या कब्जात १२ ग्रॅम वजनाची हिरव्या रंगाचे वाळलेली पाने व बिया असलेली गांजा या अंमली पदार्थाची प्लॅस्टिकची पुडी स्वत:जवळ बाळगल्याचे मिळून आल्याने चतुः श्रृंगी पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गुरनं. ९५६/२०२४ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी ६५ (ई) प्रमाणे दि.०५.१२.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. उपरोक्त गुन्ह्यात दि.०३.०१.२०२५ रोजी महाराष्ट्र दारुबंदी ६५ (ई) कलम कमी करुन एनडीपीएस ॲक्ट कलम ८ (क), २०(ब), (ii), (अ) प्रमाणे कलम वाढ करण्यात आली आहे. तसेच

सदर गुन्ह्यातील निष्पन्न आरोपीस भारतीय न्याय संहिता ३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे.

येरवडा पोलीस ठाणे क्षेत्रात दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी रु.२२,००,०००/- किंमतीचे १०६ ग्रॅम ९१ मि.ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ व इतर ऐवज अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या, विक्रीकरीता जवळ बाळगल्याचे मिळुन आल्याने येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ३७/२०२५ अन्वये एन.डी.पी एस. ॲक्ट कलम ८(क),२१ (क),२९ प्रमाणे दि.१६.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपी निष्पन्न झाले असून एका आरोपीस अटक करण्यात आली असून उर्वरीत दुस-या आरोपीचा तपास सुरू आहे. तसेच अटक आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त,पुणे शहर यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सन २०२२ ते माहे एप्रिल २०२५ अखेर पर्यंत करण्यात आलेल्या कारवाईचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| सन | दाखल गुन्हे | अटक आरोपी | | | जप्त अंमली पदार्थ किंमत रुपयेमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | परदेशी | |
| २०२२ | १५० | १६८ | २२ | १० | ९,९३,३२,७६५/- |
| २०२३ | १३५ | १७२ | १२ | ०९ | १३,६१,००,९३५/- |
| २०२४ | १२९ | १९१ | ०३ | १० | ३६७९,३६,९५,१४५/- |
| एप्रिल २०२५ पर्यंत | ४४ | ६६ | ०३ | ०० | २,३५,२०,५२०/- |

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस ठाणे पारडी येथे दि.१६.११.२०२४ रोजी दोन व्यक्तींकडे एम.डी.(मेफेड्रॉन) ड्रग्ज व देशी बनावटीचे रिव्हॉल्वर मिळून आल्याने अप.क्र.५६४/२४, एनडीपीएस कायदा कलम ८(क),२२(ब),२९ भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक केली असून गुन्ह्याचा पुढील तपास सूरू आहे.

पोलीस अधीक्षक, सांगली यांच्या कार्यक्षेत्रातील विटा पोलीस ठाणे हद्दीतील रामकृष्ण हरी माऊली इंडस्ट्रीज, कार्वे एम.आय.डी.सी. येथे एम.डी. ड्रग्ज तयार करणारा कारखाना व १४ किलो ८०६ ग्रॅम वजनाचे एम.डी. ड्रग्ज मिळून आल्याने दि.२८.०१.२०२५ रोजी विटा पोलीस ठाणे येथे गुरनं ५२/२५, एनडीपीएस कायदा कलम ८(क),२१(क),२५,२९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ९ आरोपींना अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द/जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द/ सेवनार्थीविरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

तसेच पोलीस विभागामार्फत अवैधरित्या अंमली पदार्थ साठा व विक्री करणाऱ्या इसमांबाबत माहिती प्राप्त करुन, वेळोवेळी कारवाई करण्यात येते. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयाच्या सिमेवरील चेक पोस्टवर अंमली पदार्थांची वाहतूक रोखण्याकरीता वाहनांची कसून तपासणी करण्यात येत. तसेच दुर्गम भागातून चोरट्या वाटेने येणाऱ्या वाहनांची देखील चेकपोस्टवर तपासणी केली जाते व सदर तपासणी दरम्यान, अंमली पदार्थ मिळून आल्यास, त्यांच्यावर प्रचलित कायदयातील तरतुदीप्रमाणे योग्य ती उचित कायदेशीर कारवाई करण्यात येते.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.

- विशेष पोलीस महानिरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दि.०६.०१.२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०५.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनः रचना करण्यात आली असून त्यानुसार दि. ३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स ,बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

*******

<u>लक्षवेधी सूचना क्र.२२९४</u> <u>गृह विभाग</u>

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.बापूसाहेब पठारे, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, श्री. संजय मेश्राम, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२९४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"लोहगाव पुणे येथे ११७ एकर जमिनीत २०१० मध्ये मेगा पोलीस हाऊसिंगची योजना राबविणे, प्रकल्प बीईबीलो मोरया कंपनीतर्फे विकसित करण्याचा निर्णय, बांधकाम व्यवस्थापन सुनिश्चितीसाठी मोरया आणि एमपीएमसी यांनी मिळून बेबेन डेव्हलपर्स नावाने एसपीव्ही स्थापने, त्यात पोलिसांचे ३०० कोटीहून अधिक भरणा करणे, प्रकल्पात बांधकाम गुणवत्तेसाठी फिनलँडमधील प्री-कास्ट कॉंक्रीट तंत्रज्ञान व एलिमेंटिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रकल्प पूर्ण प्रोजेक्ट प्री-कास्टच्या माध्यमातून पूर्ण करण्याची हमी देणे, प्रकल्पाच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यांमध्ये ५२४८ सदनिका व २०० दुकाने हस्तांतरण करण्याचे बंधनकारक, परंतु प्रकल्प २०१६ पासून रखडलेला, विकसक पुण्यातील बिल्डर्स आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने एमपीएमसीवर दबाव आणून प्रकल्प स्वतःच्या फायद्यासाठी प्रयत्नशील, प्रकल्पाची उर्वरित जागा खाजगी बिल्डरला विकून प्रकल्प चालू करायचा हे एमपीएमसीला मान्य नसणे, सदर प्रकल्प बाहेर काढण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी अर्थ व गुंतवणूक प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या कंपन्यांच्या माध्यमातून पूर्णत्वास येईल यासाठी सविस्तर चर्चा करण्याचे निर्देश, त्यानुसार १० नोव्हेंबर २०२४ रोजी प्रकल्पाला अर्थ व गुंतवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यां पैकी भारता बाहेरील कंपन्यांच्या मार्फत गुंतवणुकीची टर्म शीट देणे, विकसक व काही प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेप व विलंबामुळे पोलीस घरापासून वंचित, प्रकल्पास अडथळा निर्माण करणाऱ्या सध्याचा विकासक व संबंधित अधिकारी यांच्यावर शासनाने कडक कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील आजी व माजी वरीष्ठ ते कनिष्ठ दर्जाच्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी लोहगाव, पुणे येथे पोलीस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्था २००९ साली स्थापन केली. सदर प्रकल्पाकरीता लोहगाव येथील स. नं. २५,२६,२७,२८,२९, व ३२ येथे जागा निवडण्यात आली. सदर प्रकल्प बांधकामाकरीता. बी.ई बिलीमोरीया या कंपनीची निवड करण्यात आली. यासाठी एकूण ९.६१ हेक्टर जमीनीसाठी रु. ३४६.३० कोटी इतकी किमत निश्चित करण्यात आली, त्यानुसार संस्थेकडून एकूण रु. ५१.९४ कोटी इतकी रक्कम कंपनीला देण्यात आली. दरम्यानच्या काळात सभासदांची संख्या वाढल्यामुळे ११.६६ हे. जागा वापरण्याचे ठरले व किंमत रु. ४१९.६७ कोटी ठरली व बिल्डरला रु. ११ कोटी वाढीव

देण्यात आली. तसेच त्यानंतर सदनिकांची वाढती मागणी लक्षात घेता एकूण ५२४८ सदनिका बांधण्याचे निश्चित करुन त्यासाठी एकूण ३८.९४ एकर जागा प्रकल्पासाठी वापरण्याचे निश्चित करण्यात आले. सांमजस्य करारात बिल्डर यांनी सभासदांना सदनिका दिलेल्या दरामध्ये बांधून द्याव्यात असा उल्लेख असून त्यांना देण्यात येणा-या सदनिकेच्या किमतीच्या १५ टक्के रकमेचा वापर जमीन खरेदी व जमीनीचा विकास करण्यासाठी करावा, असे नमूद आहे. त्यानंतर ८ टक्के रक्कम ही प्रकल्पासाठी लागणा-या विविध परवानगी मिळविल्यानंतर व जागा अकृषिक केल्यानंतर देण्याबाबत नमूद आहे. तसेच त्यानंतर सहा महिन्यात ७ टक्के रक्कम देण्याचे ठरविण्यात आले आहे.

सन २०१५ ते २०१७ या कालावधीमध्ये जागा अकृषीक करण्यास मान्यता मिळाली आहे. तसेच पीएमआरडीए कडून आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे. सहकार विभागाकडून ०८.०७.२०१० रोजी संस्था नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. सन २०१८ साली पर्यावरण खात्याकडून मंजूरी मिळाली आहे. सन २०१८ साली प्रत्यक्षात ३४ टॉवरचे बांधकाम सुरु झाले. करोना महामारीमुळे सभासदांकडून कमी प्रमाणात पैसे जमा झाल्याने बांधकाम गती मंदावली आहे. सद्यस्थितीत काम सुरु झाल्याचे संबंधित बिल्डरचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर प्रकल्पाचे बेबॅन्को डेव्हलपर्स लिमिटेड व एम.पी.एम.सी. संस्था यांचे मध्ये ॲग्रीमेंट टू सेल दि.३१.०३.२०१७ रोजी एकूण ४९९७ सदनिका व १६० दुकानांसाठी नोंदणीकृत करण्यात आले, त्यामध्ये प्रकल्पाची अंदाजित रक्कम रु.७३१ कोटी इतकी आहे. आजपावेतो सदर महाराष्ट्र पोलीस मेगासिटी गृहनिर्माण हौसींग सोसायटीच्या सहा इमारतीचे १४ मजले व ४ इमारतीचे १ ते २ मजले एवढे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

याबाबत पोलीस आयुक्त, पुणे यांनी सदर विकासक व महाराष्ट्र पोलीस मेगासिटी गृहनिर्माण संस्थेसोबत बैठका घेतल्या आहेत. सदर बैठकीमध्ये विकसक बी. ई. बिलीमोरीया यांनी कर्ज / निधी उपलब्ध करून प्रकल्पास पुर्णत्वास नेण्याचे वेळोवेळी आश्वासन दिलेले आहे. परंतु विकासक कर्ज अथवा निधी उपलब्ध करू शकलेले नाहीत. दि.३१.०३.२०२३ रोजी पर्यंत महाराष्ट्र पोलीस मेगासिटी गृहनिर्माण हौसींग सोसायटीने विकसकारा २७७.५४ कोटी रुपये अदा केलेले आहेत. तरीसुध्दा दि.३१.०३.२०२३ रोजी अखेर एमपीएमसी कडून ४७.५५ कोटी रुपये देणे बाकी असल्याचे फेरिन्सिक ऑडीट प्रमाणे दिसून आले आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे १ ले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३५२ पुढीलप्रमाणे आहे:-

"अमळनेर तालुक्यातील ३३/११ केव्ही उपकेंद्रांना एकाच १३२/३३ केव्ही उपकेंद्रातून विजपुरवठा केला जात असणे, तथापि त्यामुळे एकाच वेळेस विद्युत प्रवाह वाढल्याने पुर्ण अमळनेर तालुक्यातील वीजप्रवाह वाढून तालुका अंधकारमय होणे, सदर उपकेंद्राची क्षमता वाढविण्यास व नविन ३३ केव्ही स्वतंत्र वाहिनी काढण्यात तांत्रिक अडचणी असल्याने एकाच ३३ केव्ही पातोंडा वीजवाहिनी वरुन चार ३३/११ उपकेंद्रांना वीजपुरवठा चालू असल्याने तालुक्यातील वीज ग्राहकांना सुरळीत व योग्य दाबाने वीज पुरवठा होत नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे होत असलेले अतोनात हाल व शेतीपिकाचे नुकसान होणे, महावितरणाकडून अमळनेर येथील २२०/१३२ केव्ही उपकेंद्रातून ६ स्वतंत्र ३३ केव्ही वाहिन्या काढण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेल्या असणे, परंतु सदर प्रस्ताव शासनस्तरावर मंजुरीकरीता प्रलंबित असणे, ग्रामस्थांची होत असलेली मागणी विचारात घेता, सदर प्रस्ताव मंजूर करुन तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री तथा मंत्री ( ऊर्जा ) यांचे निवेदन

अमळनेर तालुक्यास महापारेषण कंपनीच्या १३२/३३ केव्ही. अमळनेर या अति उच्चदाब उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. १३२ के.व्ही. अमळनेर उपकेंद्राची स्थापित क्षमता १०० एम.व्ही.ए (२x५० एम.व्ही.ए) असून त्यावर अंदाजे ६० एम.व्ही.ए उच्चतम भाराची नोंद आहे. जागेच्या कमतरतेमुळे सदर उपकेंद्राची क्षमता वाढवून नविन ३३ के.व्ही. फिडर उभारणे शक्य नाही.

अमळनेर येथे २२०/१३२ के.व्ही. उपकेंद्रही कार्यरत असून सदर उपकेंद्राची स्थापित क्षमता ४०० एम.व्ही.ए (२x२०० एम. व्ही.ए) आहे परंतु तेथे ३३ के.व्ही. स्तर नाही. २२०/१३२ के.व्ही. अमळनेर उपकेंद्रात ३३ के.व्ही. स्तर निर्माण करण्यासाठी २२०/३३ के. व्ही. ५० एम.व्ही.ए ची दोन रोहित्रे व ३३ के. व्हीचे ६ बे उभारण्याचा प्रस्ताव राज्य पारेषण उपक्रमाच्या त्रैवार्षिक आराखड्यात (सन २०२५-२६ ते २०२७-२८) समाविष्ट आहे.

महावितरण कंपनीकडून सदर योजनेचा प्रस्ताव महापारेषण कंपनीस प्राप्त झाला असून सद्यस्थितीत सदर योजनेची, प्रणाली अभ्यासानुसार सुसाध्यता तपासण्यात आली आहे. तसेच सदर योजनेस महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाकडून मान्यता मिळालेली आहे. योजनेचा अंदाजे खर्च रु. २५ कोटी पेक्षा जास्त असल्याने सदर योजना मा. वीज नियामक आयोगाकडे तत्वत: मान्यतेसाठी पाठविण्यात येत आहे. तसेच योजनेच्या अंतर्गत समाविष्ट असलेल्या कामांसाठीची निविदा प्रक्रिया सुरु करुन मा. वीज नियामक आयोगाची तत्वत: मान्यता प्राप्त झाल्यावर कामाचा कार्यादेश देऊन काम लवकरात लवकर सुरु करण्यात येईल.

*****************

लक्षवेधी सूचना क्रमांक २४१०

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे १ले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. किशोर जोरगेवार, विधानसभा सदस्य यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४१० पुढीलप्रमाणे आहे:-

" चं.म.औ.वि.कें.चंद्रपूर येथील कार्यरत कंत्राटदार अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या द्वारा सदोष काम करून वारंवार कुशल मनुष्यबळ पुरवठा न केल्याने दिनांक ०२/०८/२०२३ रोजी जारी केलेल्या करार समाप्ती पत्रानुसार अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेडला अनेक नोटिसा दिल्या जाणे. कंपनी द्वारे दिलेल्या उत्तरांना सी.एस.टी.पी.एस. प्रशासनाने असमाधानकारक व अमान्य मानणे. याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्याला निलंबितही करण्यात येणे, अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या ब्लॅकलिस्टिंग करणे. शासनाच्या नियमानुसार काळ्या यादीतील कंत्राटदाराला कुठेही नवीन काम देता येत नसणे. असे असतांना अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला फक्त चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील ८ व ९ युनिट करीता काळा यादीत मर्यादित ठेवून त्याच चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील इतर विभागात/युनिटमध्ये नवीन कंत्राट दिला जात असणे. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र इतर युनिट व युनिट नं ८ व ९ हे एकाच प्लांट चे भाग असणे. त्यातील सर्व अधिकारी व कामकाज एकाच ठिकाणाहून सुरु असतांना अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला फक्त युनिट नं ८ व ९ येथील कंत्राटमधील काळ्या यादीत ठेवणे व इतर युनिटचे कंत्राट देणे तर्कसंगत व न्यायिक नसणे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र चंद्रपूर येथील काळ्या यादीतील अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेडला अधिकृतरित्या सर्व ठिकाणावरून ब्लॅकलिस्ट करून त्यांच्या सर्व चालू व आगामी निविदांमध्ये सहभागावर तात्काळ बंदी घालण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राच्या संच क्र. ८ व ९ येथील राख हाताळणी यंत्रणेच्या (AHP) वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठीच्या दि. ०२.०८.२०२३ रोजी समाप्त झालेल्या पहिल्या करारानंतर मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचेशी दि. ०३.०८.२०२३ पासून पुढील दोन वर्षासाठीचा द्वैवार्षिक करार करण्यात आला होता.

मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून दि. २४.०८.२०२४ ते ०९.०९.२०२४ या कालावधीत (कंत्राटी कामगारांच्या संपकाळात) पुरेशा प्रशिक्षित मनुष्यबळाचा पुरवठा करण्यात आला नव्हता. त्यामुळे राख हाताळणी विभागात विविध समस्या निर्माण होऊन योग्य प्रकारे वेळेवर देखभाल न

झाल्याने राख हाताळणी यंत्रणेच्या समस्यांमध्ये वाढ झाली; परिणामी राख हाताळणी यंत्रणेवर परिणाम होत गेला.

मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांना राख हाताळणी यंत्रणेच्या कामगिरीत सुधारणा करण्याकरिता वारंवार ताकीद देवून सुद्धा राख हाताळणी विभागाच्या संच क्र. ८ व ९ च्या देखभालीबाबत त्यांचेकडून पुरेशा उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. तसेच मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून राख हाताळणी यंत्रणेची स्थिती खराब होण्याची, देण्यात आलेली कारणे समाधानकारक नसल्याने ती अमान्य करण्यात येऊन चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राच्या स्थानिक प्रशासनाकडून, मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांना दि.०२.१२.२०२४ रोजी चंद्रपूर येथील सर्व संचांमधील राख हाताळणी विभागाशी संबंधित सर्व कंत्राटांकरीता ३ वर्षांकरिता ब्लॅकलिस्ट करण्यात आले. त्यामुळे सदर एजन्सी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथील राख हाताळणीशी संबंधित कोणत्याही कंत्राटामध्ये सहभागी होऊ शकणार नाही.

मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि यांना स्थानिक प्रशासनाकडून दि.०२.१२.२०२४ रोजी चंद्रपूर येथील संच क्र. ८ व ९ सहित सर्व संचांच्या राख हाताळणीशी संबंधित सर्व कामांकरिता बंदी घातली आहे. तसेच चालू असलेले संच क्र. ८ व ९ येथील कंत्राट रद्द करण्यात आले असून त्यांची बँक गॅरंटीदेखील जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी, राख हाताळणी विभागातील तत्कालीन अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांना कामातील दिरंगाई व कामाबाबतचा निष्काळजीपणा याकरिता निलंबित करण्यात आले आहे.

तथापि, चंद्रपूर येथे मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. यांचेकडून संपकाळात तसेच, इतर काळातही राख हाताळणी विभागातील कामांव्यतिरिक्त कोल मिल्स, प्रेशर पार्टस यांची देखभाल तथा पूर्ण कोळसा हाताळणी विभागाची वार्षिक देखभाल, बाष्पकातील गळती व बाष्पकाची वार्षिक देखभाल या कामांची कामगिरी समाधानकारक होती. त्यामुळे मे. अडोरे कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. यांना चंद्रपूर येथील राख हाताळणी यंत्रणेच्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी चालू असलेल्या कामांमध्ये ब्लॅकलिस्ट करणे योग्य होणार नाही. तसेच, इतर विद्युत केंद्रांमध्ये या कंपनीचे काम समाधानकारक असल्यामुळे तेथे त्यांना ब्लॅकलिस्ट करणे उचित होणार नाही.

*****************

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. बापूसाहेब पठारे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२७० पुढीलप्रमाणे आहे:-**

"वडगाव शेरी मतदार संघातील साईनाथ नगर, वडगाव शेरी, शांतीनगर, इंदिरानगर, भारतनगर, कतारवाडी, विश्रांतवाडी, धानोरी, लोहगाव या व इतर भागात पावसाळ्यात पाऊस झाल्यामुळे नागरिकांच्या घरामध्ये पाणी जाण्याच्या घटना सातत्याने घडत असणे, प्रत्येक वर्षी या भागातील नागरिकांना इतरत्र हलवून त्यांच्या निवाऱ्याची सोय तसेच इतर-व्यवस्था पुणे महानगरपालिका व जिल्हा प्रशासनास करावी लागणे, अचानक आलेल्या पुरामुळे नागरिकांचे अतोनात नुकसान होणे, मुळा-मुठा नदी किनारच्या भागांमध्ये पूर रेषा निश्चित करणे, वारंवार पाण्याखाली जाणाऱ्या आणि बाधित होणाऱ्या वस्त्यातील सर्व नागरिकांना एस.आर.ए. किंवा इतर योजनेमध्ये घरे द्यावी, तसेच मोकळ्या झालेल्या जागेवर कंपाऊंड करून सदर जागा सुरक्षित करणे शक्य असल्यास गार्डन किंवा इतर प्रकल्प राबविणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेच्या येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात वडगांव शेरी मतदार संघातील शांतीनगर, इंदिरानगर, भारतनगर, कतारवाडी, विश्रांतवाडी, धानोरी, लोहगावचा काही भागाचा समावेश होतो तसेच वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये साईनाथ नगर हा परिसर येतो.

पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीमुळे धरणातून पाण्याचा मोठ्या प्रमाणात नदीमध्ये विसर्ग करण्यात येतो. त्यामुळे शांतीनगर, इंदिरानगर, भारतनगर, कतारवाडी या नदीकिनारी असलेल्या झोपडपट्टीच्या काही भागात पाणी शिरते ही वस्तुस्थिती आहे.

येरवडा येथील मुळा-मुठा नदीकिनारी असलेल्या चिमा घाट, योजना नगर येथील परिसरात खडकवासला धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग केल्यास काही झोपडपट्ट्यांमध्ये पावसाचे पाणी शिरते.

नदीमध्ये पाण्याचा विसर्ग होताना म.न.पा मार्फत नागरिकांना वेळोवेळी सतर्कतेचा इशारा देण्यात येतो. सन २०२४ च्या पावसाळ्यामध्ये ज्या नागरिकांच्या घरात पाणी शिरले अशा अंदाजे ३५० कुटुंबाना मनपा

मालकीच्या शाळा, समाजमंदिरे इत्यादी ठिकाणी सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्यात आले होते. तसेच त्यांच्यासाठी अन्न, निवारा व झोपण्यासाठी व्यवस्था करण्यात आली होती.

साईनाथ नगर या भागात पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्यावर पुरस्थिती निर्माण होते. अशावेळी साईनाथ नगर मधील नागरिकांना जवळच्या सारथी शाळा, खराडी व सनराईज स्कूल, वडगावशेरी येथे स्थलांतरित केले जाते. सन २०२४ मध्ये ७० कुटुंबाना या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले होते. पूर परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत नागरिकांना सदर ठिकाणी राहण्याची व जेवणाची सोय पुणे महानगरपालिकेमार्फत केली जाते.

लोहगाव परिसरातील लोहगाव बसस्टँड, लोहगाव वाघोली रस्त्यावरील कर्मभूमी तसेच धानोरी जकात नाका या भागात पावसाळ्यात तेथून वाहत असलेल्या नैसर्गिक नाल्यामुळे तसेच सखल भागामुळे पावसाचे पाणी पावसाचा जोर कायम असेपर्यंत सखल भागाकडे वाहत असते. पावसाचा जोर असेपर्यंत वाहतूक व्यवस्था विस्कळीत होते. पावसाचा जोर ओसरल्यावर काही वेळाने वाहतूक पूर्ववत होते. तथापि नागरिकांचे स्थलांतर करण्याची परिस्थिती उद्भवत नाही.

मुळा मुठा नदी किनारच्या भागात पूररेषा निश्चित करणे हे काम पाट बंधारे विभागाशी संबंधित आहे. नदीच्या पुरामुळे बाधित होणाऱ्या वस्त्यामधील नागरिकांना SRA किंवा इतर योजनेमध्ये घर देणे ही बाब धोरणात्मक स्वरुपाची आहे.

येरवडा कळस धानोरी व नगर रोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत पावसाळा पूर्व साफ सफाई कामांमधून नाले व पावसाळी गटारांची साफसफाई करण्यात येणार आहे. तसेच १५ व्या वित्त आयोग मार्फत उपलब्ध निधी मधून लोहगाव व धानोरी भागात पावसाळी लाइन व बॉक्स ड्रेनेज ची काही कामे सुरु असून काही कामे प्रस्तावित आहेत. सदर प्रकल्पीय कामे पूर्ण झाल्यानंतर पावसाळामध्ये धानोरी, विश्रांतवाडी व लोहगाव या भागातील पाण्याचा निचरा होण्यास मदत होणार आहे.

********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्रीमती. सरोज आहिरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक स्मार्टसिटी अंतर्गत एरिया बेस डेव्हलपमेंट (एबीडी)ची कामे सुरू असून जलवितरणिका बदलणे, जलकुंभ बदलणे, स्काडामीटर बसवणे, जलशुद्धीकरण केंद्रबांधणे आदी कामे केली जात असणे, ही कामे नेमून दिलेल्या विहीत कालावधीत पूर्ण न करणे याकामाला ऑगस्ट, २०२५ पर्यंत मुदत वाढ दिली असणे, तरी प्रत्यक्षात कामाच्या ठिकाणी पाहणी केली असता सदर कामे निकृष्ट व अतिशय धिम्यागतीने सुरू असणे, याबाबत लोकप्रतिनिधीं यांचे दि.४/३/२०२५ चे प्रधान सचिव, नगरविकास यांना पत्र दिले असून शहराच्या वाढत्या लोकसंख्येला पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होण्यासाठी डिझाईन आणि जलशुद्धीकरण केंद्राचा पुनर्विकास करण्याची योजना स्मार्टसिटीने हाती घेतला असणे.आगामी महाकुंभच्या अनुषंगाने सदर कामे वेळेत पूर्ण करणे,अत्यावश्यक असताना तसे न करता संबंधित ठेकेदार यांनी निकृष्ट कामे करून विलंब केला असणे एबीडी आणि संबंधित इलेक्ट्रो-मेकॅनिकल वर्क (डब्ल्यूटीपी,ईएसआर,आरडब्ल्यूपी) आणि स्मार्टवॉटर मीटर-आर्टनसिटीसाठी स्काडा-इन्स्ट्रुमेंटेशनची पुरवठा, स्थापना, जलप्रक्रिया प्रकल्पांची रचना आणि पुनर्विकास अशा स्वरूपाची ही कामे प्रलंबित असणे. यात विशेषतः जलवाहिका, वितरिका बदलणे, जलकुंभ बांधणे, स्काडामीटर बसवणे, पंचवटी, बाराबंगला जलशुद्धीकरण केंद्रांतर्गत नवीन जलशुद्धीकरण केंद्रांची उभारणी करणे आदी कामे केली जाणे, सदर कामे पूर्ण करण्यास विश्वराज इन्फ्राप्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून विलंब करणे. ४ एप्रिल २०२२ ला संबंधित कंपनीला कार्यरंभ आदेश देण्यात येणे, ३० महिन्यांच्या आत हे काम पूर्ण करण्याचे बंधनकारक असणे, मात्र ते पूर्ण न झाल्याने ऑगस्ट, २०२५पर्यंत कामांना नियमबाहय मुदतवाढ देण्यात आली असणे, याप्रकरणी संबंधित व निविदा धारक यांचेवर कार्यवाही करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### -: मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

नाशिक स्मार्ट सिटीच्या एरिया बेस्ड डेव्हलपमेंट अंतर्गतची कामे करण्याकरिता L-१ निविदाधारक मे. विश्वराज इन्व्हार्यमेंट प्रा.लि. या कंपनीस दिनांक ०४/०४/२०२२ कार्यारंभ आदेश देण्यात आला असून सदर कामाची मूदत ३० महिने होती. सदर प्रकल्पाअंतर्गत सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या पंचवटी व बाराबंगला जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता वाढ करणे, नाशिक मनपा हद्दीतील उर्वरीत जलशुध्दीकरण केंद्रे, रॉ-वॉटर/क्लिअर वॉटर पंपीग स्टेशन व सर्व जलकुंभावर स्काडा प्रणाली बसविणे आणि व्यवसायिक, बिगर घरगुती ग्राहक नळ जोडणी वर स्मार्ट वॉटर मीटर्स बसविणे या कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे निकृष्ठ व धिम्यागतीने सुरू असल्याबाबत लोकप्रतिनिधी यांचे पत्र विभागास दि. १० मार्च, २०२५ रोजी प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्पाची कामे करतांना जुनी कार्यान्वित असेलेली प्रणाली सुरू ठेवून दैनंदिन पाणी पुरवठा विस्कळीत न करता तांत्रिक अडचणींचे वेळोवेळी निराकरण करावे लागत असल्याने कामे वेळेत पूर्ण झाली नाहीत. नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या निर्देशानुसार नाशिकरोड, गांधीनगर आणि शिवाजीनगर जलशुध्दीकरण केंद्र, पंपीग स्टेशन व जलकुंभ येथे उपकरणे बसविणे, स्मार्ट वॉटर मिटर्स बसविणे, टेस्ट बेंच लॅब स्थापीत करणे, कस्टमर केअर सेंटर कार्यान्वित करणे, बाराबंगला जलशुध्दीकरण केंद्राच्या प्रशासकिय इमारतीचे काम व सबस्टेशनचे काम १०० टक्के पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पातील एकूण

कामांमधील स्थापत्य अभियांत्रिकीची ६० टक्के व आयसीटीचे काम ८० टक्के पूर्ण झालेले आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर असून उर्वरित कामांना स्मार्ट सिटीच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने दिनांक १८ मे, २०२५ पर्यंत दंडात्मक मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांची गुणवत्ता तपासण्याकरिता केंद्र शासनाच्या मे. सर्टीफिकेशन इंजिनियर्स इंटरनॅशनल लि. (CEIL) या त्रयस्थ संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या मार्फत कामांची व साहित्यांची वेळोवेळी गुणवत्ता तपासण्यात येते.

***********************

H-161-1A

<u>लक्षवेधी सूचना क्र. १८२५</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम अधिवेशन**

**श्री.उमेश उर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८२५ पुढीलप्रमाणे आहे :-**

---

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा ठाणे जिल्ह्यातील मालमत्ता मुल्यांकनाबाबत सखोल अभ्यास नसल्यामुळे महानगरपालिका, नगरपालिका तथा इतर सभोवतालचे प्राधिकरणे यामध्ये असलेल्या मालमत्ता मुल्यांकन नागरीकांच्या सुचनेनुसार होत नसल्यामुळे सभोवताली विकास करतांना अडचणी निर्माण झाल्या असणे, गेल्या एक वर्षापासुन सहसंचालक मुल्यांकन विभाग तसेच विभागीय मुल्यांकन कार्यालय याठिकाणी अनेक नागरीकांचे मुल्यांकन वाढवणेबाबत व जिथे खुपच मुल्यांकन जास्त आहे तिथे कमी करणेबाबत निवेदने प्राप्त झाले असुन अशा नागरीकांच्या सूचनेवरुन मुल्यांकन विभागाने सुचना व हरकतींचा गांभीर्यापुर्वक विचार करुन शहर प्राधिकरणातील विकासाच्या दृष्टिने शासनाला तात्काळ मिळणारे महसुलचा विचार करुन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

**<u>श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री(महसूल) यांचे निवेदन</u>**

महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम १९९५ अन्वये दस्त नोंदणीसाठी मुद्रांक शुल्क आकारणेकामी वार्षिक मूल्य दर तक्ते, नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून प्रतीवर्षी निर्गमित केले जातात. सदर दर तक्ते तयार करताना मागील वर्षात नोंदविलेल्या जमिनींच्या तसेच सदनिकांच्या खरेदी विक्री व्यवहारातील दराच्या सरासरी वाढीचे पृथ:करणात्मक (Analysis) विश्लेषण करुन यासोबतच वास्तुप्रदर्शनातील दर, स्थावर व्यवसाय संकेतस्थळावरील दर, स्थानिक चौकशीतील दर इ.शी तुलनात्मक अभ्यास करुन त्यानुसार योग्य ते वास्तववादी सरासरी दर प्रस्तावित केले जातात. तसेच मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक यांचे स्तरावर वास्तुविशारद बांधकाम व्यावसायिक, दस्त लेखनीक यांची बैठक आयोजित करुन, त्यांच्याही सूचना विचारात घेतल्या जातात. याशिवाय मा. लोकलेखा समितीने दिलेल्या सूचनानुसार वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये लोकसहभाग असण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक व संबंधित मूल्यांकन अधिकारी यांचे समवेत मा. लोकप्रतिनिधी यांची बैठक आयोजित केली जाते. सदर बैठकीमध्ये वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दरांबाबत लोकप्रतिनिधी यांचेकडून सूचना/ हरकती घेण्यात येतात. लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या मतदार क्षेत्रातील मूल्यदराबाबतच्या सूचना प्राप्त झाल्यास दिलेल्या सूचनांची पडताळणी करुन, विभागीय उपसंचालक / सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन हे योग्य ते दर प्रस्तावित करतात. त्यामुळे सदर तक्त्यातील सरासरी दर हे वास्तववादी असतात. सदर दर विभागीय सर्वोच्च विक्री दर ग्राहय धरुन ठरविले जात नसून, मागील वर्षी प्रत्यक्ष बाजारात जेवढे दर वाढलेले असतात, त्यामधील सरासरीच्या वाढीनुसार वार्षिक मूल्यदर तक्त्यात जमिनीचे/सदनिकांचे सरासरी दर दिले जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवीन बांधकाम दर प्राप्त करुन घेऊन ते वार्षिक मूल्यदर तक्त्यासोबत निर्गमित केले जातात.

त्याचप्रमाणे ज्या मूल्यविभागामधील दरात वाढ नसल्यास अशा मूल्यविभागातील जमीन / सदनिकांचे दरात कोणतीही वाढ न देता दर स्थिर ठेवणेत येतात. तसेच दरात घट निदर्शनास आल्यास घट देखील देणेत येते. त्यामुळे बाजारातील वाढ / घट वार्षिक मूल्यदर तक्त्यात प्रतिबिंबीत झालेली असते.

नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून केवळ मुद्रांक शुल्क आकारणीसाठी जमीन व इमारतीचे सरासरी दर दर्शविणारे वार्षिक मूल्य दर तक्ते तयार केले जातात. दस्त नोंदणीकामी मुद्रांक शुल्कासाठी सदर दर व मार्गदर्शक सूचना वापरुन येणारे मूल्य मान्य नसल्यास, प्रत्यक्ष दर कमी असल्यास, आवश्यक पुराव्यांसह महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३१ अन्वये अभिनिर्णयांतर्गत सविस्तर मूल्यांकन करुन घेण्याची तरतूद आहे. स्थावर व्यवसाय बाजारात सदनिकांच्या किंमती हया वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दरावर ठरल्या जात नसून, जमिनीच्या किंमती, बांधकाम खर्च, प्रकल्पातील सुविधा, शासन/महानगरपालिकेस भरावे लागणारे शुल्क/ प्रिमियम इ. बाबी विचारात घेऊन ठरल्या जातात. सदर किंमती हया बाजारातील पुरवठा व मागणी या बाजारातील घटकांवरही (market forces) अवलंबून असतात. थोडक्यात, वार्षिक बाजारमूल्यदर तक्ते तथा रेडी रेकनर दरांमुळे सदनिका तथा घरांच्या किंमतीमध्ये वाढ होत नाही. तर, स्थावर मिळकतीच्या तसेच सदनिकांच्या मागील वर्षी झालेल्या खरेदी-विक्रीच्या किंमतीचा चालु वर्षी तुलनात्मक अभ्यास करुन पुढील वर्षाकरीता लागु होणारे दर वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्याव्दारे प्रसिध्द केले जातात. विशिष्ट परिसरात उपलब्ध सोयीसुविधा, इमारतीमधील सोयीसुविधा, बांधकामाचा दर्जा, मुख्य शहरापासूनचे अंतर, दळणवळण सुविधा, बांधकाम व्यावसायीकाचा नफा ई. बाबींवर घरांच्या किंमती प्रत्यक्ष बाजारात ठरल्या जातात. त्याचा वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दरवाढीशी संबंध नाही. वास्तविक सदनिकाच्या किंमतीत मागील वर्षी झालेली वाढ विचारात घेऊन, त्यानुसार पुढील वर्षासाठी दर निश्चित केले जातात. सदनिकांच्या दरामध्ये पुढील वर्षाच्या बाजारातील वाढीचे कोणतेही अंदाज (Forecast) विचारात घेऊन वार्षिक मूल्य दर तक्त्यात दर प्रस्तावित केले जात नाहीत.

सन २०१७-१८ साली वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्यात आले होते. तद्नंतर सलग २ वर्षे स्थावर मिळकत क्षेत्रातील मंदीचा विचार करुन (सन २०१८-१९ व सन २०१९-२०)साठी सदर दर कायम ठेवण्यात आले होते. सन २०२०-२१ साली कोरोना परिस्थितीमुळे शासनाने दि.१८.३.२०२० पासून लागू केलेले निर्बंध व कार्यालयातील मर्यादित उपस्थितीमुळे शासनाने पुढील आदेश होईपर्यंत वार्षिक मुल्यदर तक्ते कायम ठेवण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.त्याअनुषंगाने सदर काम पूर्ण झाल्यानंतर दि.१२/९/२०२० रोजी सन २०२०-२१ करिता वार्षिक मुल्यदर तक्ते प्रसिध्द करण्यात आले असून कोरोना परिस्थितीमुळे स्थावर मिळकतीचे बाजारातील मंदीचा विचार करता सदर दरास कमीत कमी वाढ देण्यात आली होती. तदनंतर सन २०२१-२२ चे वार्षिक मूल्यदर तक्तेस शासनाकडून स्थगिती देण्यात आल्याने सन २०२०-२१ चेच दर सन २०२१-२२ करिता कायम ठेवणेत आले. सन २०२२-२३ साली वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्यात आले होते. तदनंतर सन २०२३-२४ व २०२४-२५ चे वार्षिक मूल्यदर तक्तेस शासनाकडून स्थगिती आल्याने सन २०२२-२३ चेच दर २०२३-२४ व २०२४-२५ करिता कायम ठेवण्यात आले.

सदयस्थितीत सन २०२५-२६ चे वार्षिक मूल्यदर तक्ते मागील ३ वर्षाचे खरेदी-विक्री व्यवहारातील वाढ अथवा घट विचारात घेऊन वास्तववादी करणेची कार्यवाही नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत सुरु आहे.

*****************************

H/106-19

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र. ७५८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. हेमंत रासने, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७५८ पुढीलप्रमाणे आहे:-**

" पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या वसाहतीची दुरावस्था झाली असून कसबा मतदार संघामध्ये एकूण इमारतीची संख्या ४४ असून यामध्ये पूरग्रस्त ४ बैठी चाळी ४ असणे, पुणे शहरात ७८ चाळी व इमारती बैठी घरे असून बैठी घरे वसाहती १० आहेत. एकूण सदनिका ३४५९ असून यामध्ये नादुरस्त सदनिकांची संख्या १८७ असणे, अनेक इमारतीमध्ये मनपा सेवक बिगर महानगरपालिका सेवक सेवानिवृत्त सेवक राहत असून त्यांना अनेक मूलभूत सोयी-सुविधापासून वंचित रहावे लागणे, यामध्ये प्रामुख्याने पाण्याची व्यवस्था नसणे, ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसणे, इमारतीमध्ये स्लॅब गळती होणे, काही इमारतीमध्ये स्लॅब पडल्यामुळे नागरिकांना अनेक वेळा दुखापत झाल्याच्या घटनाही घडणे, महापालिकेला भाडे भरुन ही सोयी सुविधांपासून नागरिकांना वंचित रहावे लागणे, पुणे महानगरपालिकेने काही वसाहतीचे उदाहरणार्थ राजेंद्र नगर येथील वसाहतीचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरु केलेली असून, परंतु त्या ठिकाणी राहत असलेल्या नागरिकांनी मालकी हक्काने घरे द्या तसेच या ठिकाणी पूरग्रस्त सुध्दा रहात असून त्यांचाही निर्णय प्रशासन अद्यापपर्यंत घेऊ शकला नाही तसेच अनेक अडचणींना महापालिका प्रशासनाकडून कोणीतीही सकारात्मक उत्तरे अथवा कारवाई अद्यापपर्यंत करण्यात न येणे, परिणामी या नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन येथील नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया . "

## <u>मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास)</u> महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेत कसबा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात ४३ बहुमजली इमारती व ३ बैठ्या चाळी असून या वसाहतीमध्ये मनपा सेवक व बिगर मनपा प्रकल्पबाधित सदनिका धारक भाडेतत्वाने राहतात. सदर वसाहती किमान ५० ते ६० वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या असून यामधील इमारती बैठ्या स्वरूपाच्या तसेच तळ +२ मजले स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे इमारती जुन्या झाल्याने या ठिकाणी टेरेस स्लॅब व शौचालयाच्या स्लॅब मधून पाण्याची गळती होणे, ड्रेनेज लाईन / पाण्याची लाईन नादुरुस्त होणे, भिंत/ छताचे प्लास्टर पडणे, फरशी तुटणे असे प्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे सदर इमारतींच्या आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी दुरुस्ती करण्याची दक्षता पुणे मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे. त्यानुषंगाने पुणे मनपाच्या प्रत्यक वर्षीच्या अंदाजपत्रकात सुद्धा यासाठी तरतूद करण्यात येत असते.

या तरतुदी अंतर्गत सदरची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे महापालिकेमार्फत दरवर्षी क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येत आहेत. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये RE२२B१०५ (पुणे मनपाच्या असलेल्या वसाहतीमध्ये विविध दुरुस्ती करणे) या अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली र.रु.२ कोटी एवढी तरतूद पुणे

महानगरपालिकेने केली होती. या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी अंदाजे १.४० कोटी रक्कम पुणे महानगरपालिकेत कसबा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील वसाहतींच्या देखभाल दुरुस्तीसाठी भवन विभागाकडून क्षेत्रिय कार्यालयांना लॉकिंग करून देण्यात आली असून त्यातून देखभाल दुरुस्तींची कामे करण्यात येत आहेत.

पुणे मनपाच्या वसाहतींमधील इमारती जुन्या झाल्यामुळे यातील काही इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची कार्यवाही चालू आहे. सदर इमारती जुन्या व जीर्ण असल्याने दुरुस्तीचा खर्च जास्तीचा होत असल्याने या इमारतींचा पुनर्विकास करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच ही कार्यवाही टप्याटप्याने पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे. ही प्रक्रिया कमी कालावधीत होणे शक्य नसल्याने दरम्यानच्या काळात येथील नागरिकांचे पुणे मनपाच्या ताब्यातील इतर मिळकतींमध्ये पुनर्वसन करण्याचेही प्रयत्न करण्यात आले होते. परंतु नागरिक त्यांची मूळ जागा सोडून इतर ठिकाणी राहण्यास तयार नाहीत. मूळ ठिकाणीच पुनर्वसन करणे व त्या सदनिका मालकी हक्काने देणे अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

कसबा विधानसभा मतदारसंघातील वसाहतीपैकी साने गुरुजी वसाहत येथील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेत वाढीव इमारत बांधण्यात येत असून या ठिकाणी ११ मजली इमारतीमध्ये १५२ सदनिका बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच पोरपडे पेठ मनपा कॉलनी क्रमांक ८ व ९ मधील १६ इमारतीपैकी तीन इमारतीचे देखील पुर्नविकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. या सदनिकाधारकांना तात्पुरत्या स्वरुपात ट्रांझिट कॅम्प मध्ये स्थलांतरित करण्याचे काम हाती घेण्यात येऊन या ठिकाणी नवीन एका इमारतीमध्ये १५० सदनिका उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच गंजपेठ येथील मनपा कॉलनी क्र. ६ BOT तत्वावर विकसित करण्यात आलेली असून त्याठिकाणी २३१ मनपा सदनिकाधारक यांना भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

बिगर मनपा प्रकल्पबाधित सदनिका धारक यांना पुर्नविकास केलेल्या इमारतीमधील सदनिकांचे वाटप करण्याबाबतचे धोरण मालमता व व्यवस्थापन विभाग मार्फत निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. बिगर मनपा प्रकल्पबाधित सदनिका धारक यांना सदनिका पुर्नविकास केलेल्या इमारतीमधील सदनिका या मालकी हक्काने द्यावयाच्या झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नूतनीकरण) नियम २०२३ व पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ यामध्ये तरतूद नाही.

*********

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२३६५

महाराष्ट्र विधानसभा

**श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३६५ पुढीलप्रमाणे आहे :-**

" ठाणे शहरात पुनर्विकासाच्या नावाखाली हजारो नागरिकांची आर्थिक आणि मानसिक छळवणूक होत असल्याने अनेक नागरिकांनी विकासाच्या विरुद्ध पोलीसठाण्यात तक्रार करणे, तथापि ठाण्यातील वर्तकनगर शिवसह्याद्री को-ऑपरेटिव्ह हौ. सोसायटी इमारत क्र. ४९ सहयोग को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी इमारत क्र.४८ एमएचबी कॉलनी पोखरणरोड व दीपमाला को-ऑपरेटिव्ह सोसायटी इमारत क्र.५० येथील इमारतींमधील रहिवासी १४ वर्षापासून अत्यंत हलकीच्या अवस्थेत दिवस काढत असून आदित्य इंटरप्रायचे संजय भालेराव याविकासाकडून त्यांची आर्थिक फसवणूक होऊन त्यांना प्रचंड मानसिक जाचाला सामोरे जावे लागणे, नौपाडा येथील जोशी एंटरप्राइजेस यांचेकडून देखील शेकडो रहिवाशांचे आर्थिक शोषण व फसवणूक झाल्याचे उघड होणे वेळोवेळी पोलिसात तक्रार करून देखील त्यांच्यावर कोणतीच कारवाई न होणे, ढोकाळी येथील तिरुपती ग्रुपचे मेरी गोल्ड इमारतीमधीलने रहिवाश्याची फसवणूक केल्याचे देखील उघड होणे १४ वर्षे प्रकल्प रेंगाळत ठेवून ५० टक्के रक्कम भरून देखील तेथील रहिवाश्यांना अद्यापही सदनिका दिल्या गेल्या नसणे, तसेच त्रिनिटी टॉवर यांनी देखील सदनिका धारकांनी पैसे भरून सुद्धा त्यांना सदनिका दिल्या गेल्या नसून यामध्ये सदनिका धारकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊन संबंधित विकासाकांवर अद्याप कोणतीच दंडात्मक कारवाई झालेली नसणे, त्यामुळे रहिवाशांमध्ये तीव्र संताप निर्माण होणे, याप्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित विकासकांवर दंडात्मक कारवाई करण्याचे तीव्र मागणी होणे याबाबत शासनाने केलेली कार्यवाही उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

वर्तकनगर, ठाणे येथे शिव सह्याद्री को-ऑपरेटिव्ह सोसायटी इमारत क्रमांक ४९, सहयोग को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, इमारत क्रमांक ४८ व एम.एच.बी. कॉलनी, पोखरण रोड व दीपमाला को-ऑपरेटिव्ह सोसायटी, इमारत क्रमांक ५० या सोसायटयांच्या सभासदांनी पुनर्विकासासाठी विकासक श्री.संजय भालेराव यांची नियुक्ती केली होती. या संस्थांनी पुनर्विकासासाठी म्हाडाकडे ना-हरकत प्रमाणपत्र व वाढीव क्षेत्राची मागणी केल्यानंतर म्हाडामार्फत सन २०१०-११ मध्ये अधिमुल्याची आकारणी करून सदर संस्थांना २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देकारपत्र व ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. तद्नंतर सदर इमारतींना नियोजन प्राधिकरण म्हणून ठाणे महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी देण्यात येते. तथापि, सदर तीनही सोसायटयांच्या ठिकाणी पुनर्विकासाबाबत कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. मात्र याबाबत म्हाडा प्राधिकरणाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

उपरोक्त तीनही संस्था हया सहकार कायद्यानुसार नोंदणीकृत असून सदर संस्थेंनी विकासकाची नेमणूक केली आहे. विकासक विहित मुदतीत पुनर्विकास करू न शकल्यास त्याच्याशी करण्यात आलेल्या करारनामानुसार विकासकाची नेमणूक रद्द करण्याचे अधिकार हे संबंधित संस्थेंना असतात.

नूतन को.ऑप. हौस. सोसायटी, नौपाडा ठाणे हा प्रकल्प मे. जोशी एंटरप्रायझेस हे प्रवर्तक राबवत असून सदर प्रस्तावास ठाणे महानगर पालिकेकडून १ ते ७ मजल्याची परवानगी / सी. सी. अदा करण्यात

आलेली आहे. परंतू, सदर इमारतीचे फक्त ४ चौथ्या मजल्यापर्यंतचे आर.सी.सी. चे काम पुर्ण झाले आहे. याशिवाय, मे. जोशी एंटरप्रायझेस यांचे ठाणे शहरात एकूण ११ प्रकल्प महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणी केले आहेत. त्यापैकी त्यांनी ३ प्रकल्प पूर्ण केले असून, उर्वरित ८ प्रकल्प प्रलंबित आहेत. एकूण ११ प्रकल्पांपैकी ५ प्रकल्पांबाबत महारेरा प्राधिकरणाकडे तक्रारी दाखल करण्यात आलेल्या आहेत. तसेच, ५ प्रकल्पांबाबत पोलिस स्टेशन मध्ये तक्रारी (F.I.R.) दाखल करण्यात आल्या आहेत. सदर तक्रारींमध्ये गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका सभासदांची फसवणूक झाल्याची बाब नमूद करण्यात आलेली आहे. या प्रकरणांत मे. जोशी एंटरप्रायजेस यांच्यावर गुन्हा दाखल होऊन त्यांना दि.०२.०४.२०२४ ते दि.८.०४.२०२४ या कालावधीत प्रथम ६ दिवसांची पोलिस कोठडी व त्यापुढे त्यांना दि.०८.०४.२०२४ ते दि.२२.०४.२०२४ पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते. सद्य:स्थितीत, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

ढोकळी येथील तिरुपती ग्रुपचे मेरी गोल्ड इमारतीमधील रहिवाशांचा प्रकल्प मे. श्री. तिरुपती ग्रीनफील्ड डेव्हलपर्स हे राबवित असून, ठाणे महानगर पालिकेकडून सदर प्रस्तावास स्टिल्ट + २३ मजले या करीता परवानगी / सी. सी. अदा करण्यात आलेली आहे. सदर इमारतीचे बांधकाम सुरु आहे. मे. श्री. तिरुपती ग्रीनफील्ड डेव्हलपर्स या प्रवर्तकाने मेरी गोल्ड बी विंग या प्रकल्पाची नोंदणी महारेरा प्राधिकरणाकडे केली असून, सदर प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी दि. ३१.१२.२०२५ असा आहे.

त्रिनिटी टॉवर हा प्रकल्प मे. बालाजी कंन्स्ट्रक्शन ही कंपनी राबवित असून सदर प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेकडून एकूण ५ इमारतींकरीता परवानगी / सी. सी. अदा करण्यात आलेली आहे. प्रस्तावात एकूण ५ इमारतींचे नियोजन असून, फक्त २ इमारतींना जोता प्रमाणपत्र अदा करण्यात आलेले आहे. सर्व इमारतींचे बांधकाम सद्यस्थितीत अपूर्ण अवस्थेत आहे. श्री. तिरुपती ग्रीनफिल्ड डेव्हलपर्स या प्रवर्तकाने मेरी गोल्ड बी विंग या प्रकल्पाची नोंदणी महारेरा प्राधिकरणाकडे केली असून, सदर प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ३१.१२.२०२५ पर्यंत आहे. तथापि, ट्रिनिटी टॉवर नावाचा प्रकल्प महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणीकृत झालेला नाही. अनिल ठाकूरदास कुर्सीजा या प्रवर्तकाने ट्रिनिटी हाइट्स, ट्रिनिटी ओयासिस, ट्रिनिटी ओयासिस फेज २ अशा तीन वेगवेगळया प्रकल्पांची महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असून, सदर तीन प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी अनुक्रमे दि.३०.५.२०२३, दि.३१.७.२०२३ आणि दि.३०.१२.२०२४ असा दिलेला होता. मात्र, सदर प्रकल्प पूर्ण केलेले नाहीत. या तीन प्रकल्पांमध्ये मिळून एकूण ३१ तक्रारी खरेदीदार वाटपग्राही यांनी महारेरा प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या आहेत. महारेरा प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या तक्रारींवर स्थावर संपदा अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्थावर संपदा अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी प्रवर्तकासोबत प्रकल्प विकास करारनामा (Redevelopment Agreement) केल्यानंतर वा प्रकल्पामधील फक्त विक्री योग्य सदनिका (Saleable Component) संदर्भात महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच या विक्रीयोग्य सदनिकामधील फक्त खरेदीदार वाटपग्राही (allottees) यांनाच महारेरा प्राधिकरणाकडे त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत तक्रार दाखल करता येते. पुनर्विकास प्रकल्पातील मूळ सभासदांना महारेरा प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करण्याची तरतूद स्थावर संपदा अधिनियम २०१६ मध्ये नाही. अशा सभासदांना मा. दिवाणी न्यायालय, मा. ग्राहक न्यायालय, मा. उच्च न्यायालय अशा ठिकाणी दावे दाखल करणे आवश्यक असते.

**************

लक्षवेधी सूचना क्र.२००३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. नारायण कुचे,वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२००३ पुढीलप्रमाणे आहे:-

"वसई विरार महानगरपालिका अंतर्गत टाऊन प्लॅनिंग विभागातील लायसन्स इंजिनियर सनद मेहता यांनी नियमबाह्य पद्धतीने, खोटी कागदपत्रे सादर करून व बोगस नावाने परवाना प्राप्त केला असल्याचे निदर्शनास येत असणे,तसेच या संदर्भात, त्यावेळचे तत्कालीन वसई विरार महानगरपालिकेचे आयुक्त श्री. गंगाधरंडी यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून सनद मेहता यांचा परवाना रद्द केला होता असेही दिसून आले असणे,तसेच वरील भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध होऊनही सनद मेहता यांचा परवाना पुढील तीन वर्षांसाठी नूतनीकरण करण्यात आला होता असेही निदर्शनास आले असणे,त्यामुळे सदर लायसन्स इंजिनियर सनद मेहता यांना परवाना कायमस्वरूपी देण्यामागील कारणे कोणती असणे,तसेच यासंदर्भात वसई विरार महानगरपालिकेने कोणती चौकशी केली नसणे, तसेच,या प्रकरणात दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली नसणे, त्यामुळे सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

---

मा.उपमुख्यमंत्री,नगरविकास यांचे निवेदन

- वसई विरार शहर महानगरपालिकेची सन २००९ साली स्थापना झाली असून महानगरपालिकेस, महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी दि.०७.०७.२०१० रोजी नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.
- महानगरपालिकेमार्फत मंजूर विकास नियंत्रण नियमावली,२००१ (Sanctioned DCR) मधील तरतुदीन्वये अभियंता परवाना देण्यात येतो. सदर तरतुदींनुसार, श्री. मेहता यांनी अभियंता परवाना मिळणेबाबत, वसई विरार शहर महानगरपालिकेकडे अर्ज सादर केला होता. DCR २००१ मधील तरतुदींनुसार, श्री. मेहता हे पात्र ठरत असल्याने त्यांना अभियंता परवाना देण्यात आला व सदर परवान्याचे सन २०१५ पर्यंत वेळोवेळी नूतनीकरण करण्यात आले आहे.
- श्री. मेहता यांच्या सन २०१६ मधील परवाना नुतनीकरणावेळी, श्री. मेहता यांनी सादर केलेले अभियंता प्रमाणपत्र खोटे असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने श्री. मेहता यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे व कागदपत्रांसह खुलासा सादर केला होता. सदरील खुलाश्याच्या आधारे त्यांच्या अभियंता परवान्याचे सन २०१६ करिता नुतनीकरण करण्यात आले आहे.
- सन २०२० मध्ये श्री. मेहता यांच्या अभियंता परवान्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीच्या संदर्भाने तत्कालीन आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन / गठीत करण्यात आली होती.
- DCR - २०१३ मधील तरतुदींनुसार अभियंता परवाना करिता अर्जदार किमान Degree in Civil or Structural Engineering or Membership (Civil) of the Institution of Engineers असणे आवश्यक आहे. तथापि, श्री. मेहता हे स्थापत्य अभियांत्रिकी डिप्लोमाधारक असून त्यांनी

दिशाभूल करणारी कागदपत्रे सादर केली असल्याने समितीने त्यांचा अभियंता परवाना निलंबित केला होता.

- दिनांक २५.५.२०२१ रोजीच्या आदेशाविरुद्ध श्री.सनत मेहता यांनी दिनांक १.६.२०२१ रोजीच्या अर्जान्वये शासनास्तरावर वसई विरार महानगरपालिकेमार्फत त्यांच्या दिनांक २५.५.२०२१ च्या पत्रान्वये निलंबन केलेला अभियंता परवाना रद्द करणेबाबत तसेच उक्त परवाना पुढील ३ वर्षाच्या कालावधीकरिता बहाल करण्याची विनंती केली होती.
- श्री.सनत मेहता यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासन स्तरावरून संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई यांचे अभिप्राय घेण्यात आले होते.त्यानुसार संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ४ जून,२०२१ रोजीच्या पत्रान्वये "श्री.सनत मेहता यांचे प्रमाणपत्र वैध आहे व श्री.सनत मेहता यांनी उत्तीर्ण केलेला Diploma In Construction Technology हा अभ्यासक्रम मंडळाच्या ३ वर्षाच्या Diploma In Civil Engineering या पदविका अभ्यासक्रमाच्या समकक्ष आहे" असे अभिप्राय दिले आहेत. तसेच,विकास नियंत्रण नियमावली UDCPR-२०२० मधील C-३.१ (II) मध्ये अभियंता परवाना पात्रता संदर्भात Diploma in Civil Engineering or Diploma in Architectural Assistance ship अशी पात्रता नमूद आहे. UDCPR-२०२० मधील तरतूद व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालयाचे अभिप्राय यानुसार शासन स्तरावरून दि.७ जून ,२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्री.सनत मेहता यांचे अभियंता परवाना निलंबन संदर्भातील महानगरपालिकेचे दिनांक २५.५.२०२१ रोजीचे आदेश रद्द करण्यात आले व श्री.सनत मेहता यांना वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत या पूर्वी देण्यात आलेले अभियंता परवाना प्रमाणपत्राचे पुढील तीन वर्षाचे नुतनीकरण प्रक्रिया करून अभियंता परवाना प्रमाणपत्र बहाल करण्यात यावे,असे महानगरपालिकेस कळविण्यात आले. या अनुषंगाने श्री.सनत मेहता यांचा अभियंता परवाना दिनांक ११.६.२०२१ रोजी ३ वर्षासाठी नुतनीकरण करण्यात आला असून श्री.सनत मेहता यांच्या अभियंता परवान्याचे पुनश्चः नुतनीकरण करण्यात आले आहे.

*******

e५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. सिध्दार्थ शिरोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३९४ पुढीलप्रमाणे आहे :-**

" पुणे महानगरपालिका हद्दीतील कात्रज भागामधील आर के कॉलनी मध्ये सर्वे क्र. ३६ व ३८ गल्ली क्र. १ आणि सर्वे क्र. ३८ प्लॉट क्र. २९ फेज-३ मध्ये अनाधिकृत धार्मिक स्थळ असणे, वरील तिनही ठिकाणांच्या बांधकामास पुणे मनपाने कोणतीही परवानगी दिलेली नसणे. सदर अतिक्रमण निष्कासनाबाबत पुणे मनपा ने नोटीस काढलेली नसुन, आज रोजी पर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे. तसेच सहकार नगर येथील ट्रेजर पार्कच्या गेट समोर संत नगर भागात समोरील बाजूच्या रस्त्यावर २ अनाधिकृत थडगे/ मजार सदृश्य बांधकाम झालेले असणे, हे २ अनाधिकृत थडगे/मजार दि. ३०-१२-२०१६ रोजी निष्कासीत केलेले असूनही हे दोन अनाधिकृत धार्मिक स्थळे नव्याने बांधलेले असणे, यावर पुन्हा पुणे महानगर पालिका प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, तसेच हेल्थ कॅम्प पांडव नगर येथील साईबाबा मंदिराच्या लगत मोकळ्या जागेत आणि बिबवेवाडी स.नं. ६२३/२/४ या मिळकतीवर अनाधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम झालेले असणे. सदर अनाधिकृत अतिक्रमण बांधकाम निष्कासीत करण्याबाबत पुणे महानगर पालिका प्रशासनास निवेदने प्राप्त असणे. परंतु अद्याप पर्यंत सदर अनाधिकृत अतिक्रमण बांधकाम निष्कासीत करण्याबाबत पुणे महानगर पालिका प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, सदर बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

प्रस्तुत प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे पत्र जा.क्र.४३९/२०२३, दि.२८/०८/२०२३ च्या पत्राच्या अनुषंगाने सदर तिन्ही ठिकाणी, संबंधीतास प्रादेशिक महाराष्ट्र व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) (ए) अन्वये अन्वये दि. १८/१०/२०२३ रोजी नोटिसा बजाविण्यात आल्या. त्यानुसार कारवाई करणेकरिता स्थानिक पोलिस बंदोबस्त मिळणेसाठी पोलीस उप आयुक्त , परिमंडळ क्र.२, लष्कर पोलीस ठाणे, कॅम्प, पुणे यांना दि.०५/१२/२०२३ राजी पत्र देण्यात आले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भारती विद्यापीठ, पोलीस स्टेशन, धनकवडी, पुणे शहर यांचेकडून संबंधितांना बोलवून स्वतःहून काढुन घेणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या व त्यानुसार दि.०७/०३/२०२४ रोजी पुणे महानगरपालिकेने कारवाईचे नियोजन करुन कारवाई दरम्यान संबधितांकडून पुणे पेठ कात्रज स.नं. ३८/७, प्लॉट नं. १४२/१५३ येथील अनधिकृत पत्राशेड व पुणे पेठ कात्रज सर्व्हे नंबर ३६ गल्ली नं. १ येथील

मिळकतीवरील अनधिकृत पत्राशेड स्वत:हून काढून घेतलेले आहे. तसेच पुणे पेठ कात्रज सर्व्हे नंबर ३८ प्लॉट नं. २९, आर. के. कॉलनी फेज नं. ३ मधील मिळकतीत नागरीक वास्तव्यास असून तेथे चालणारे धार्मिक उपक्रम बंद करण्यात आलेले आहेत. उपरोक्त तिन्ही ठिकाणी धार्मिक उपक्रम बंद करण्यात आले आहेत.

सहकारनगर येथील ट्रेजर पार्क गेट समोर संतनगर भागात समोरील बाजूच्या रस्त्यावर दोन अनधिकृत थडगे/मजार सदृश बांधकामावर दि.३०/१२/२०१६ रोजी कारवाई करण्यात आलेली आहे. कारवाई करतेवेळी श्री. शेख व इतर नागरिक यांनी कारवाईस विरोध दर्शविल्यामुळे कारवाई पूर्ण होऊ शकली नाही. सदरचे बांधकाम हे शिवकालीन ऐतिहासिक वास्तू असून त्यांचे वर्णन हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे काळातील वकील काझी हैदर यांचे संबंधित आहे. सदर दर्गा हे पुरातन असून त्यांना इनाम आहे. तसेच सदर दर्गा हे वक्फ बोर्डाच्या अखत्यारीत येतात त्यावर अतिक्रमणाची कारवाई करण्यात येऊ नये व दर्ग्याला पोलीस प्रशासनामार्फत कुठल्याही प्रकारचा जातीय तेढ निर्माण होऊ नये म्हणून सुरक्षा देण्यात यावी. असे कळविले आहे. त्यानुसार श्री. शेख यांनी उपरोक्त बाबत दिलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून मिळणेसाठी धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयामार्फत दि.२४/५/२०२४ रोजी सहाय्यक संचालक, पुणे पुरातत्व लेखागार, महाराष्ट्र शासन, पुणे कार्यालय यांना पत्रान्वये कळविले आहे. तसेच सदर कागदपत्रे पुरातत्व विभागाकडून तपासून मिळण्यासाठी खात्यामार्फत त्यांचेकडील शोधणावळ फी रु.२५०/- चलनाद्वारे दि.६/६/२०२४ रोजी भरलेली आहे. सदरील धार्मिक स्थळास 'क' वर्गवारी प्राप्त असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येत आहे. सद्यपरिस्थितीत सदर ठिकाणी थडगे/मजार अस्तिवात आहे.

हेल्थ कॅम्प पांडवनगर, वडारवाडी येथील साईबाबा मंदिरा लगत रस्त्याची मोकळी जागा असून त्यालगत मनपा पी.एम.सी. कॉलनीची सीमाभिंत असून त्या सिमाभिंतीस लागून काही धार्मिक स्थळाचे अनधिकृत बांधकाम झालेले दिसून येत आहे. सदरचे बांधकाम रस्त्यावर झालेले असून याठिकाणी झोपडपट्टी / गवनि क्षेत्र नाही. सदर जागा ही चाळ विभागाच्या अखत्यारीत असल्याने अनधिकृत पत्राशेडवर कारवाईचे नियोजन चाळ विभागाच्या स्तरावर होवून चाळ विभाग व क्षेत्रीय कार्यालयाचे तर्फे संयुक्त कारवाई करणे बाबत अति. महापालिका आयुक्त (वि) यांचे आदेश दि. १७/९/२०२१ रोजी झालेले आहेत. तदनंतर चाळ विभाग व क्षेत्रीय कार्यालयाचे स्तरावर कारवाईचे नियोजन करण्यात आले होते. तथापि वेळोवेळी कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न उपस्थित झाल्याने आज अखेर पर्यंत कारवाई होवू शकली नाही. सदर ठिकाणी धार्मिक स्थळाचा प्रश्न असल्याने कायदा व सुव्यवस्थाची दखल घेवून वरिष्ठ पातळीवर योग्य ते निर्णय घेवून पुढील कारवाई करण्यात येईल.

बिबवेवाडी स.नं.६२३/२/४ या मिळकतीवर कोणतेही धार्मिक स्थळाचे अनधिकृत बांधकाम आढळून आले नाही.

********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री.सुनिल कांबळे, श्री. भिमराव धोंडिबा तापकीर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४५८ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पुणे महानगरपालिकेत मागील तीन वर्षांपासून प्रशासक राजवट असून, या काळात घेतल्या जाणाऱ्या निर्णयांबाबत मोठ्या प्रमाणात सशंकता निर्माण झाली आहे. अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू असल्याने नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष झाले असून, रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन यांसारख्या सेवांमध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. विशेषत:, विद्यमान लोकप्रतिनिधी असलेल्या आमदार आणि खासदार यांच्या मागण्यांकडे प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. त्यांच्या पत्रांना महापालिका अधिकारी उत्तर देणे आवश्यक समजत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वयाचा अभाव निर्माण झाला असून, नागरी प्रश्न मार्गी लागण्यास विलंब होत आहे. प्रशासक राजवटीमुळे महत्त्वाचे निर्णय काही अधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून राहिले असून, लोकशाही प्रक्रियेपासून प्रशासन दूर जात असल्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया."

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी पुणे महानगरपालिकेचा कार्यकाल संपुष्टात आला असून, शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४, दि.३ मार्च, २०२२ अन्वये महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची प्रशासक म्हणून शासनातर्फे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

प्रशासक कालावधीत पुणे महानगरपालिकेचे सर्व कामकाज विषयक निर्णय हे प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली भरविल्या जाणाऱ्या मुख्य सभा, स्थायी समिती व विशेष समित्यांमार्फत केले जात आहेत.

महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे प्रशासक म्हणुन कार्यभार सांभाळत आहेत. सर्व विभागांकडील विषयांबाबत नियमित आढावा घेण्यात येत आहे. तसेच लोकप्रतिनिधी मा. खासदार/आमदार यांचेसमवेत विविध विषयांबाबत वेळोवेळी बैठकांचे आयोजन करण्यात येते. तसेच लोकप्रतिनिधी मा. खासदार/आमदार यांचेकडुन प्राप्त होणाऱ्या पत्रांबाबत संबंधित विभागांकडुन योग्य ती दखल घेण्यात येते.

********

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

सूचना क्र. १९२९

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. राजेश मोरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९२९ पुढीलप्रमाणे आहे:-**

"कल्याण (जि. ठाणे) तालुक्यातील १४ गावे (पिंपरी, कर्मनगरी पिंपरी, माणिकपाडा, ठाकूरपाडा, दहिसर, दहिसर मोरी, बाले, नागाव, बामल्ली, उत्तरशिव, निघू, वाकलन, भंडार्ली, गोठेघर, नावाली, मोकाशीपाडा) ही नवी मुंबई महानगरपालिकेत महाराष्ट्र शासनाने समाविष्ट केली होती. परंतु १० ते ११ महिन्यानंतर सुध्दा येथील नागरिकांच्या सुविधाकरिता निधी उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत असणे, तसेच १४ गावांची नावे नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करण्यारिता असलेली दस्तावेज हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे किंवा नसणे, उक्त १४ गावांसाठी अत्यावश्यक असलेल्या नागरी सोयसुविधा मिळण्याकरिता आवश्यक निधीसाठी येथील ग्रामस्थांनी पायपीट होत असणे, येथील ग्रामपंचायतीकडे विचारणा केली असता याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेडे विचारण्या करण्याबाबत सांगितले जात असून महानगरपालिकेकडे विचारणा केली असता नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून याबाबत कोणतीची माहिती मिळत नसल्याने येथील ग्रामस्थांनमध्ये तीव्र संताप निर्माण होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्ष्यम दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कल्याण, (जि. ठाणे) तालुक्यातील (दहिसर, मोकाशी, वालिवली, पिंपरी, निघू, नावाळी, वाकलण, बामार्ली, नारीवली, बाळे, नांगाव, भंडार्ली, उत्तर शिव व गोटेघर) ही १४ गावे, नवी मुंबई महानगरपालिकेत दि.०७.०३.२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. सदर १४ गावांचे एकूण महसुली क्षेत्र २०.८९ चौ.मी. इतके असून, सन २०११ चे जनगणनेनुसार १४ गावांची एकूण लोकसंख्या १५६२३ इतकी आहे.

तद्नंतर शासनाने महाराष्ट्र प्रदेश व अधिनियम,१९६६ अन्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेल्या १४ गावांचे क्षेत्रासाठीची एमएमआरडीएची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून केलेली नियुक्ती मागे घेऊन, सदर १४ गावांचे क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे. उक्त नमूद १४ गावांकरीता नागरीसोयी सुविधा पुरविणे करीता व सुधारणा करीता विकास आराखडा तयार करणेचे काम प्रगतीपथावर असून, सदर १४ गावांचा विकास आराखडा तयार करण्याकरीता मे. टेककॉम अर्बन मॅनेजमेंट कंसल्टंट ॲण्ड सर्विस प्रोव्हायडर या सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत विकास आराखडा तयार करण्याकरीता आवश्यक असणारे GIS प्लॉन तयार करण्याचे व त्याकरीता सर्वेक्षणाचे काम सदर सल्लागारामार्फत करण्यात येत आहे.

तसेच, सदर १४ गावांकरीता झोन दाखले, भाग नकाशे देण्याची कामे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरू केले असून, महानगरपालिकेस प्राप्त बांधकाम परवानग्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

१४ गावांपैकी १० गावांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत सन २०१९ मध्ये पाणी पुरवठा योजना राबविण्यात आलेली असून, उर्वरीत ४ गावांकरीता सप्टेंबर २०२४ मध्ये पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर दोन्ही योजनेकरीता कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काम पाहत आहे. सदर १४ गावांकरीता सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या उक्त पाणी पुरवठा योजनेची वस्तुस्थिती जाणून घेऊन, उक्त दोन्ही योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्याची महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

१४ गावांना एमआयडीसीमार्फत सद्य:स्थितीत पाणी पुरवठा होत असून, पाणी आरक्षण अपुरे असल्याने, सध्याची व भविष्यातील लोकसंख्येचा विचार करता वाढीव पाणी आरक्षण मिळणेकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरू आहे.

१४ गावांमध्ये सद्य:स्थितीत सार्वजनिक शौचालय व वैयक्तिक शौचालयाची सुविधा असून, त्याकरीता Septic Tank चा वापर करण्यात येत आहे. या गावांमध्ये मलनि:सारण वाहिनीची सुविधा सद्यस्थितीत उपलब्ध नाही. प्रत्येक गावांमध्ये आवश्यक सार्वजनिक शौचालय बांधणेसाठी जागेच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही प्रस्तावित आहे.

सदर १४ गावांच्या समावेशाबाबतची अधिसूचना दि.०७.०३.२०२४ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झाली होती. तथापि, दरम्याच्या कालावधीत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता, तद्नंतर कोकण पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाची आदर्श आचार संहिता तसेच, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ ची आदर्श आचारसंहिता लागु झाल्याने, जवळपास ६ महिन्यांचा कालावधी आदर्श आचारसंहितेमध्ये गेला, ही वस्तुस्थिती आहे.

नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या १४ महसुली गावांमधील विकसित / प्रस्तावित / सुरु असलेली कामे, मालमत्ता, भूखंड / जमीन, नागरी / पायाभूत सोयी-सुविधा, निधी, योजना, दस्तऐवज हस्तांतरण, इत्यादी विषयाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, विविध विभागांचे अधिकारी / प्रतिनिधी व महानगरपालिका यांची संयुक्त बैठक संपन्न झाली असून, याअनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे यांचेशी समन्वय साधून सदर कामे तात्काळ पुर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

तसेच, नवी मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये उपरोक्त १४ गावांसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. यावर्षी या तरतूदी मधून प्राधान्याने शाळा, नागरी आरोग्य केंद्र, पाणी पुरवठा व मलनि:सारण, दिवाबत्ती, पायवाटा, रस्ते इ. अत्यावश्यक नागरी सुविधा निर्माण करण्याची कामे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहेत.

***

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २५१९

श्री.राजेश बकाने, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २५१९ पुढील प्रमाणे आहे :-

"संपूर्ण विदर्भात प्रसिदध असलेले कस्तुरबा हेल्थ सोसायटी द्वारा संचालित सेवाग्राम रुग्णालय हे केंद्र शासनाचे ५०% अनुदान व राज्य सरकारचे २५% अनुदानाच्या सहकार्याने चालवली जात असून त्या ठिकाणी संपूर्ण विदर्भातून रुग्ण औषध उपचारासाठी येत असणे, परंतु रुग्णालय प्रशासनाचा हेकेखोर वृत्तीमुळे रुग्णांची हेळसांड होत असल्याचे निदर्शनास आले असणे, येथे शासकीय योजनांची अंमलबजावणी होत नसणे, व्यवस्थापन सुद्धा कर्मचाऱ्यांना अतिशय हीन वागणूक देते व त्यांच्या हक्काचे वेतन सुद्धा योग्य प्रमाणात दिले जात नसणे, या मनःस्तापामुळे कर्मचा-यांची मानसिक अवस्था बिकट झाली असणे, या ठिकाणी ७५ टक्के अनुदान मिळून सुद्धा तेथील वैद्यकीय उपकरणांची उणीव तसेच तज्ञ डॉक्टरांची कमतरता असणे, त्यामुळे रुग्णांना कोणत्याही सोयी उपलब्ध होत नसणे, केंद्र आणि राज्य सरकार मिळून ७५ टक्के अनुदान मिळत असल्यामुळे सदर संस्थेद्वारा रुग्णांना योग्य औषधोपचार मिळण्यासाठी शासन स्तरावरून कार्यवाही होण्याकरिता जिल्ह्याचे पालक सचिव यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्याची आवश्यकता, या संस्थेचे ऑडीट करण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

कस्तुरबा हेल्थ सोसायटी, सेवाग्राम, वर्धा या संस्थेची स्थापना सोसायटी नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत दि.११.०९.१९६४ रोजी करण्यात आली. आवश्यक उपाययोजनांचा अवलंब करुन रोगांचे निर्मूलन करणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. कस्तुरबा हेल्थ सोसायटीचा सर्व निधी तसेच मालमत्ता व संसाधनांचा वापर मुख्यत: महात्मा गांधी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्रामसाठी केला जातो. अवर सचिव, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या दि.२२.२.१९७५ च्या पत्रान्वये कस्तुरबा हेल्थ सोसायटीच्या अंतर्गत महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलची रचना व कार्ये निश्चित केली आहे. संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिल वर राज्य शासनामार्फत सचिव, वैद्यकीय शिक्षण व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन हे दोन प्रतिनिधी आहेत. संस्थेच्या बैठका नवी दिल्ली येथे होतात. बैठकीत मंजूर केलेल्या तरतूदीनुसार दरवर्षी अंदाजपत्रकात तरतूद केली जाते. सदर संस्थेसाठी केंद्र शासन, राज्य शासन व

संस्थेमार्फत अनुक्रमे ५०:२५:२५ या प्रमाणात वार्षिक निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सन १९६९ मध्ये महात्मा गांधी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस सुरु करण्यात आले आणि कस्तुरबा रुग्णालयाशी संलग्न करण्यात आले. हे भारतातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आहे.

सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दररोज साधारणपणे १५०० ते २५०० बाह्य रुग्ण येत असतात. रुग्णालय मागील ५५ वर्षांपासून गोरगरीब नागरिकांसाठी माफक दरात दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम करीत आहे. रुग्णालयाचे प्रशासनामुळे रुग्णांची हेळसांड होत असल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार कस्तुरबा रुग्णालयाचे व्यवस्थापनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. कस्तुरबा रुग्णालयात शासनामार्फत जाहीर करण्यात आलेल्या आरोग्य विषयक योजनांची नियमित रित्या अंमलबजावणी करण्यात येत असून अनेक रुग्णांना त्याचा फायदा होत आहे. कस्तुरबा रुग्णालयाच्या व्यवस्थापनाद्वारे अधिकारी व कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारची हीन वागणूक मिळत असल्याबाबतची तक्रार व्यवस्थापनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. कस्तुरबा रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती पत्रात नमूद केलेले वेतन नियमाप्रमाणे अधिकोषाद्वारे संबंधित कर्मचाऱ्यांचे खात्यात प्रत्येक महिन्याला थेट जमा केले जाते. महात्मा गांधी मेडिकल कॉलेजशी संलग्नित कस्तुरबा रुग्णालय हे शैक्षणिक रुग्णालय असून येथे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषानुसार आवश्यक सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षणासाठी अध्यापक वर्गातील १२२ पैकी ३ पदे सोडून सर्व पदे भरलेली आहेत. रुग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच संस्थेचे प्रत्येक वर्षाचे ऑडिट हे महालेखापाल कार्यालयाद्वारे (CAG) करण्यात येते. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता संस्थेमार्फत शैक्षणिक कार्य तसेच रुग्णसेवा योग्य प्रकारे पार पाडले जात असल्याचे स्पष्ट होते. यास्तव, सदर संस्थेवर प्रशासक नेमण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

****

९४८

लक्षवेधी सूचना क्र. १९४४

महाराष्ट्र विधानसभा

श्री. वरूण सरदेसाई यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९४४ पुढीलप्रमाणे आहे.

"मुंबई विद्यापीठातर्फे यंदा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दिल्या गेलेल्या तब्बल दीड लाखांहून अधिक प्रमाणपत्रांवरील बोधचिन्हामधील मुंबई विद्यापीठाचे इंग्लीश मधील नाव चुकलेले असणे

९०८.

## लक्षवेधी सूचना क्र.४८६

**महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन**
**मा. श्री. राजेंद्र गावित, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४८६ पुढीलप्रमाणे आहे :-**

" राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये आदिवासीच्या जमिनी या बिगर आदिवासी होत असणे, त्यामुळे आदिवासी समाज भूमिहीन होत असणे, तसेच आदिवासी हा मूळ शेतीवर उपजिविका करणारा शेतकरी शेतमजूर असून त्याचे संपूर्ण कुटुंब हे शेती तसेच शेतीशी निगडित व्यवसायावर आधारित असणे, मात्र काही व्यवसायिक कारणास्तव आदिवासी जमीन हे बिगर आदिवासी यांच्या नावाने खरेदी विक्री केली जात असणे, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच इतर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आदिवासी जमिनी बिगर आदिवासी खरेदी होत असणे, महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी परत करणे अधिनियम १९७४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ३६ (अ) आणि ३६ (ब) अन्वये आदिवासी जमीन बिगर आदिवासीला विक्री करण्यास परवानगी बाबत अटींची पूर्तता न करणे, त्यामुळे मा. राष्ट्रपतींचे अध्यादेशाचे भंग होत असणे, तसेच, आदिवासीचे कुळ असताना सुद्धा तहसीलदारांकडून सुरक्षित कुळअसतानाही कुळ परस्पर रद्द करणे, आदिवासीसाठी असलेल्या कायद्याचे भंग होणे, आदिवासी ते बिगर आदिवासींकडे हस्तातरीत करीत असताना अनेक त्रुटींचा अभाव असणे, यावर योग्य ती नियमावली तयार करणे आवश्यक असणे, तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आदिवासी जमीन या बिगर आदिवासी खरेदी विक्री हस्तांतरण होत असताना यावर प्रतिबंध करणे आवश्यक असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार शासनाला अवगत करणे, उक्त प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ मधील तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसार, जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने आदिवासी व्यक्तींच्या जमिनी ह्या आदिवासी व्यक्तींनाच हस्तांतरीत करण्यात येतात. तथापि, सदर अधिनियमातील कलम ३६अ मधील तरतुदी व महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीतर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम, १९७५ मधील तरतूदी विचारात घेऊन संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्यामार्फत शासनाच्या पूर्वमान्यतेसाठी आदिवासी खातेदाराची जमीन बिगर आदिवासी खरेदीदाराकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्राप्त प्रस्ताव गुणवत्तेवर तपासून शासन स्तरावर उचित निर्णय घेतला जातो. अशी परवानगी देताना प्रकरणी खरेखुरे अकृषिक प्रयोजन (Bonafide non-agriculture purpose) सिध्द होत असल्याबाबत आणि त्या जमिनीवर प्रस्तावित अकृषिक वापर अनुज्ञेय असल्याबाबत खात्री करण्यात येते. जमीन हस्तांतरणापूर्वी संबंधित गावाच्या ५ कि.मी. परिसरामध्ये सदर जमीन घेण्यासाठी इतर आदिवासी इच्छुक नसल्याबाबत खात्री करण्यात येते. संबंधित जमिनीची विक्री करणारा आदिवासी व्यक्ती भूमीहिन होणार नाही याची दक्षता घेण्यात येते. तसेच आदिवासी खातेदारास असलेली आर्थिक निकड व सदर जमिनीच्या अकृषिक दराने आदिवासी खातेदार यांना योग्य मोबदला मिळत असल्याबाबतची खातरजमा केली जाते व त्यानंतरच आदिवासी खातेदारांची जमीन बिगर आदिवासी खातेदारकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येते.

शेटा- H/254 (700-7-2025)-1

१४९

लक्षवेधी सूचना क्र. २२५२

१०८.

लक्षवेधी सूचना क्र.३८६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३८६ पुढीलप्रमाणे आहे:-

"कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या हद्दीतील रेल्वे लाईन कल्याण बदलापूर (तिसरी व चौथी लाईन) च्या भूसंपादन प्रक्रियेत मौजे बेलवली तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे येथील एका सहकारी गृहनिर्माण सोसायटीची फसवणूक झाली असणे, या सोसायटीची जागा या भूसंपदात गेलेली नसताना त्या सोसायटीच्या मालकाने भूखंड दिलेला असणे, त्याने रेल्वे कडून खोट्या पध्दतीने २.८६ कोटी इतका मोबदला घेऊन राज्य शासन तसेच रेल्वेची मोठी आर्थिक फसवणूक केली असणे, याबाबत संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने प्रांत अधिकारी उल्हासनगर यांच्याकडे तक्रार केलेली असताना सुध्दा त्यांना अद्याप न्याय मिळाला नसणे, त्यांची १३ गुंठे इतकी जमीन कुठल्याही मोबदला न मिळता रेल्वेचा नावावर करण्यात आलेली असणे, याबाबत संबंधित जागामालक तसेच महसूल अधिकारी यांच्या संगनमताने कोट्यावधी रुपये लाटण्यात आलेले असणे याबाबत तातडीने चौकशी करुन दोषी अधिकारी व जागा मालक व त्यांना साथ देणारे एजंट यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची गरज असणे, रेल्वे तसेच राज्य शासनाचे भूसंपादनाचे कोट्यावधी रुपये लाटूनही जागा संबंधी शासकीय यत्रंणाच्या रेल्वे च्या ताब्यात आलेली नसणे, याबाबत सविस्तर व सखोल चौकशी होवून संबंधितावर गुन्हे दाखल करुन शासकीय निधी हडप केलेल्या बिल्डर व अधिकारी यांच्याकडून वसुली करण्याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

अंबरनाथ तालुक्यातील कल्याण ते बदलापूर, मध्य रेल्वे विभागातील ३ ऱ्या व ४ थ्या रेल्वे मार्गासाठी मौजे बेलवली, ता. अंबरनाथ येथील खाजगी जमिन भूसंपादनासाठी रेल्वे अधिनियम १९८९ मधील कलम २० A ची अधिसूचना दि. १४/०६/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यानुषंगाने, उप अधिक्षक, भूमि अभिलेख, अंबरनाथ यांना प्रस्तुत गावातील बाधित होणाऱ्या स.नं बाबतची संयुक्त मोजणी करणेकामी उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी दि. १२/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते.

दि.१०.०९.२०२० रोजीच्या संयुक्त मोजणी अहवालाच्या आधारे सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी दि. २८/०१/२०२२ रोजी मौजे-बेलवली गावातील बाधित स.नं.४९/२/ब मधील १३३० चौ.मी क्षेत्रासाठी निवाडा पारित केला. त्याप्रमाणे, ७/१२ उताऱ्यावर कब्जेदार सदरी श्री.गुलचंद भागवत गायकवाड, श्री. काळूराम भागवत गायकवाड व श्रीम.विमल अशोक धनवटे यांना दिनांक १२/०५/२०२३ रोजी मोबदला रक्कम अदा केली. तसेच

माध्यमाऐवजी मराठी माध्यमातून दिली असल्यामुळे मुख्य अधिकारी, केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी सदर विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिका परीक्षेतील गैरव्यवहार व चुकांचे प्रकरण महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४८ (५) (क) मधील तरतूदीनुसारच्या तपास समिती समोर सादर करण्याकरीता प्रस्तावित केलेले होते.

सदर प्रकरण दिनांक १३/१२/२०२४ रोजी व दिनांक १७/०१/२०२५ रोजी झालेल्या तपास समितीच्या सभेमध्ये विचारार्थ होते. समितीने एलएल.एम. अभ्यासक्रमाचे Prospectus / syllabus, विद्यापीठाचे निदेश क्र. ७५/२०२४ दि. १९/०९/२०२४, विद्यापीठाचे निदेश क्र. ८९/२००४ दि.१०/११/२०२२, विद्यापीठाचे निदेश क्र.२०/२०१४ दि. २८/०७/२०१४ लक्षात घेऊन आणि विद्यापीठाचे अध्यादेश क्र. ०७/२००४ मधील क्र. ९ येथील तरतूद विचारात घेऊन पुढीलप्रमाणे शिफारस केली होती.

" परीक्षकांनी विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन करणे गरजेचे होते. **विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतून लिखाण केले त्यामुळे असंबंधित लिखाण असे समजून परीक्षकाने शून्य गुण देणे अपेक्षित होते**. यापूर्वी परीक्षकांनी अशा प्रकरणांत शून्य गुण दिलेले होते. एलएल.बी. पर्यंत विद्यार्थांना त्यांच्या उत्तरपत्रिका मराठी किंवा हिंदी भाषेतून लिखाण करण्यास अध्यादेशात तरतुद आहे. परंतु एलएल.एम. च्या विद्यार्थ्यांना तशी सुविधा अध्यादेशात दिलेली नाही. या बाबींची विद्यार्थ्यांना माहिती असणे आवश्यक आहे. परंतु, त्यांनी अध्यादेशातील तरतूदीची पाहणी न केल्यामुळे सदर चुक घडली असावी असे समितीचे मत आहे. वास्तविकतः सदर प्रकरणांचा समावेश हा गैरव्यवहार प्रकरणात होत नाही असेही समितीचे मत आहे. त्यामुळे यापुढे अशा प्रकरणात संचालक, परीक्षा व मूल्यामापन मंडळ व मुख्य अधिकारी केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र यांनी त्यांच्या स्तरावर चर्चा करुन ही बाब निकालात काढावी."

या शिफारशीस मा कुलगुरू यांनी दिनांक १२/०२/२०२५ रोजी मान्यता प्रदान केली होती.

समितीच्या शिफारशी नुसार सदर प्रकरणातील उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करण्याकरीता मुख्य अधिकारी, केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र यांच्या कडे पाठविण्यात आले होते. ज्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेत पेपर सोडविला नाही, त्या विद्यार्थ्यांना परीक्षकांनी शून्य गुणदान केले होते.

पत्र क्र. संगाबाअवि/ ३/ पचौ/ १०/ २०२५ दि.१३/०३/२०२५ अन्वये एलएल.एम. सत्र १ ते ४ या परीक्षेमधील सर्व प्रश्नपत्रिका अध्यादेश क्र.०७/२००४ (९) मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार सोडविण्याबाबत च्या सूचना सर्व विद्यार्थ्यांना अवगत करुन देण्याबाबतच्या सूचना संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी विद्यापीठाशी संलग्नित सर्व विधी महाविद्यालयांच्या प्राचार्य/ विभागप्रमूख यांना दिल्या होत्या.

तथापि, विद्यापीठाने दिनांक ०२/०४/२०२५ च्या निर्देश क्र. २९/२०२५ अन्वये अध्यादेश क्र.०७/२००४ मध्ये सुधारणा करून एल. एल. एम. च्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिका इंग्रजी मधुन असली तरी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतुन उत्तरपत्रिका सोडविलेली असल्यास त्याचे मूल्यांकन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार एल.एल.एम. च्या ज्या विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमातुन उत्तरपत्रिका लिहिल्या होत्या त्यासर्व विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करुन त्यांचे सुधारीत निकाल दिनांक ०७/०४/२०२५ रोजी जाहिर करण्यात आलेले आहेत.

*********

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- १४५२**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. सत्यजित देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४५२ पुढीलप्रमाणे आहे :-

"३२ शिराळा, जि.सांगली या गावातील जगप्रसिध्द नागपंचमीच्या सणाला जिवंत नागाची पुजा करण्यावर मागील काही वर्षापासुन शासनाने बंदी घालण्यात आल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, उक्त ठिकाणी शेकडो वर्षापासुन गुरु गोरक्षनाथांनी सुरु केलेल्या परंपरेनुसार नागपंचमी सण हा उत्साहात साजरा करण्यात येत असून याकरिता स्थानिक नागरीकांकडून परिसरातील जिवंत नाग पकडून त्यांची विधीवत पुजा करुन त्यांच्या जिवीतास कोणताची धोका न करता पुन्हा त्यांना पकडलेल्याच मूळ ठिकाणी सुखरुपपणे सोडण्यात येत असणे, त्यानुसार ३२ शिराळा येथील गुरु गोरक्षनाथांचे अनुयायी, अनेक साधु, भक्तगण तसेच शिराळा व पंचक्रोशीतील हजारो ग्रामस्थ यांनी जिवंत नागाची पुजा पुर्ववत चालु व्हावी यासाठी शासनाकडे अंदोलने, निवेदने देवून तसेच लोकप्रतिनिंधी यांचेकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, तदनुसार उक्त ठिकाणची जगप्रसिध्द नागपंचमी सणावेळी जीवंत नागाची पुजा पुर्वापार हिंदू धर्मातील चालीरीतीप्रमाणे पूर्ववत सुरु होण्यासाठी जलीकट्टू व बैलगाडा शर्यती यास अन्य कायद्याची बाधा न येता ज्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली त्याचधर्तीवर ३२ शिराळकरांचा पारंपारिक नाग पंचमीचा सण त्यानिमित्त नागाचा शोध घेणे, नाग पकडणे, पुजा करुन कोणतीही इजा न होता तो परत मुळ ठिकाणी सोडणे या "क्रिडा प्रकारास" शासन मान्यता देण्यासाठी शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. गणेश नाईक**

### निवेदन

सांगली वन विभागाचे क्षेत्र १० तालुक्यांमध्ये विभागलेले असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ४१५७५.३७ हेक्टर आहे. त्यामध्ये शिराळा वनपरिक्षेत्रामध्ये वाळवा व शिराळा तालुक्यांचा समावेश होतो.

सांगली जिल्हयातील ३२ शिराळा (ता. शिराळा) या ठिकाणी अनेक वर्षापासून नागपंचमी सणावेळी नाग, धामण इ. जातीचे जिवंत सर्प पकडून शिराळा व आसपासच्या खेडयामधून घरोघरी त्याची पूजा अर्चा करणे. पकडलेल्या जिवंत नाग, सर्प यांचे प्रदर्शन करून मिरवणूक काढणे. तसेच त्याची स्पर्धा ही भरविणेत. यामध्ये नाग, धामण या वन्यप्राण्यांना मोठ्या प्रमाणात इजा होवून मृत्यूमुखी पडल्याच्या घटना निदर्शनास येत होत्या.

प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचिका ६२/२००२ व रिट पिटीशन ३६५७/२००३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०१.०८.२००३ रोजी एकत्रित सुणावणीमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"in view of the fact that such practice cannot be undertaken in view of the provisions of the (Wildlife Protection) Act. १९७२. In our opinion the authorities will implement the provisions of the Act."

तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचिका ७५/२०११ व रिट पिटीशन ८६४५/२०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १५.०७.२०१४ रोजी एकत्रित सुणावणीमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"We direct to State Government to constitute a committee consisting of officers of appropriate higher rank of the Revenue and Forest Department as well as representative of relevant NGOs for evolving action plan for due implementation of the provision of the Wildlife Protection Act १९७२ with

reference to hunting of snakes in some parts of the State like Battis Shirala for Nag Panchami festival."

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने तयार केलेल्या राज्य कृती आराखडयास दिनांक २६.०२.२०१५ रोजी शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यता प्राप्त राज्य कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याबाबत सहाय्यक शासकीय अभियोक्ता यांनी दिनांक १५.०६.२०१५ रोजी आयोजित सुनावणीत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना अवगत करण्यात आले आहे.

सदर मान्यता प्राप्त कृती आराखड्यानुसार वन विभाग, पोलीस विभाग आणि जिल्हा प्रशासनामार्फत प्रत्येक वर्षी नागपंचमीचे सणा दरम्यान आवश्यक खबरदारी घेण्यात येते. सर्पमित्र तसेच निसर्गप्रेमी अशासकीय संस्था यांच्या सहभागाने प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविण्यात येतात. तसेच शिराळा व आसपासच्या खेड्यामध्ये व्यापक जनजागृती करणेत येत असून लोकांची धार्मिक भावना न दुखावता सापांच्या अधिवासाची पूजा करणे व मातीचे नाग अथवा सर्प यांची प्रतिकात्मक पूजा करण्याबाबत आवाहन करण्यात येते.

*****

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १७०४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७०४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील शिरढोणगावांसह अनेक गावात रानडुक्कराचा सततचा होणारा त्रास व त्यामुळे नांदेड जिल्ह्यात रानडुक्करांचा प्रचंड त्रास असून त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यास भिती निर्माण होणे, सदर रानडुक्करांच्या हल्ल्यात दि. २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी ग्रामस्थ रमेश किसनराव शिंदे यांचा झालेला मृत्यु, त्यांच्या पश्चात त्यांना चार मुली व एक मुलगा अवलंबून त्यांच्या कुटुंबियांवर मोठा आघात झालेला असणे, तसेच गावातील इतर चार ते पाच शेतकरी देखील रानडुक्करांच्या हल्ल्यात जखमी झालेले असणे, नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी रानडुक्करांनी शेतीचे प्रचंड नुकसान केलेले असणे, परिणामी या रानडुक्करांच्या हल्ल्यामुळे शेतकरी शेतात जाण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली भिती व घबराट, परिणामी, ग्रामस्थांमध्ये पसरलले भितीचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, जनावरांना देखील रानडुकरे जखमी करीत असल्यामुळे शासनाने याची तात्काळ दखल घेऊन बंदोबस्त करण्याची तसेच मृत कुटुंबियांना शासनाद्वारे आर्थिक मदत करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. गणेश नाईक**

### निवेदन

दिनांक २३.०२.२०२५ रोजी वनपरिक्षेत्र नांदेड अंतर्गत श्री. रमेश किशनराव शिंदे हे रानडुक्कर या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याचें निदर्शनास आले. सदर व्यक्तीस तात्काळ उपचाराकरीता डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय रुग्णालय विष्णुपुरी, नांदेड येथे दाखल करण्यात आले होते उपचारा दरम्यान दिनांक २५.०२.२०२५ रोजी श्री. रमेश किशनराव शिंदे यांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे. तदनंतर मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार रु. २५.०० लक्ष इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालूका हा नांदेड व मुखेड वनपरिक्षेत्रामध्ये विभागलेला आहे. कंधार तालुक्यातील मागील दि. ०१.०१.२०२२ ते दिनांक १९.०३.२०२५ या कालावधील मनुष्य हल्ल्याच्या १६ व शेपी पिक नुकसानीच्या ४३८ घटना निदर्शनास आल्या असून संबंधितास प्रचलित नियमातील तरतूदीनुसार अनुक्रमे रु. ३२.४९ लक्ष व रु. १२.३६ लक्ष इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही यांना पारध करण्याची क्षेत्रिय स्तरावर परवनगी देखील देण्यात येते.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचा-यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकिय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

*****

H-771-1A

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १९५५

**मा. श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये, उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १९५५ पुढील प्रमाणे आहे–**

"सन २०१९ देशभर जलजीवन मिशन योजना राबविण्यास सुरुवात झाली मात्र अद्यापी ४०% योजनांची कामे राज्यात अपूर्ण असल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, जलजीवन मिशन अंतर्गत सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांच्या कामापैकी ४५% कामे प्रगतीपथावर असून त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हा परिषदा अंतर्गत जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मागेल त्याला नळ जोडणी योजनेपासून नागरिकांना पासून वंचित रहावे लागत असणे, त्यामुळे राज्यभरातील वाढीवस्त्यांवर व गावात राहणाऱ्या नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असणे, त्यासाठी राज्यभरातील जलजीवन कामांचा तात्काळ आढावा घेऊन उन्हाळा चालू होण्याच्या अगोदर ही सर्व अपूर्ण कामे पूर्ण करून घरोघरी नळ जोडणीची योजना प्रभावीपणे राबवण्याची मागणी सामान्य जनतेतून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

**श्री. गुलाबराव पाटील, मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन**

केंद्र शासन पुरस्कृत महत्वाकांक्षी जल जीवन मिशन कार्यक्रमाची सन २०१९ मध्ये सुरवात करण्यात आली. राज्यात ४ सप्टेंबर, २०२० पासून सदर योजनची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याद्वारे सन २०२४ पर्यंत सर्व १०० टक्के ग्रामीण कुटुंबांना "हर घर जल" या तत्वाने कार्यात्मक घरगुती नळ जोडणी (FHTC-Functional Household Tap Connection) द्वारे शुध्द पेयजल उपलब्ध करुन देण्यास शासन कटीबद्ध आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण व शाश्वत पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली त्यावेळी (दिनांक १५ ऑगस्ट, २०१९) ४० LPCD प्रमाणे नळ जोडणी असलेल्या कुटूंबांची संख्या ४८.४४ लक्ष इतकी होती. सदर योजना देखील रेट्रो फिटींग अंतर्गत घेण्यात येवून त्यांना देखील ५५ LPCD प्रमाणे पाणी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

सद्यस्थितीमध्ये राज्यातील ग्रामीण भागातील एकुण १,४६,७९,७७४ घरे/कुटुंबांपैकी १,३१,००३६७ (८९.२४%) इतक्या घरांना/कुटुंबांना कार्यात्मक घरगुती नळ जोडणी (FHTC-Functional Household Tap Connection) (५५ LPCD) देण्यात आलेल्या आहेत. तसेच १५.७९ लाख घरे/कुटुंब यांना घरगुती नळ जोडणी देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकूण ५१५५८ योजना हाती घेण्यात आल्या असून, आजतागायत २३,०५४ योजना पूर्ण झालेल्या आहेत. तर उर्वरित २८,५०४ योजना प्रगतीपथावर आहेत. तसेच

सद्यस्थितीत जल जीवन मिशन अंतर्गत घेण्यात आलेल्या अंदाजे १८,८८४ योजना विविध कारणांमुळे सुधारीत होत आहेत. तसेच योजना राबवितांना स्थानिक पातळीवर येणाऱ्या अडचणी जसे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनेच्या उपांगांकरीता जागा घेण्याकरीता भूसंपादनासाठी निधीची तरतुद नसणे, खाजगी जागा मिळवण्यासाठी अडचणी निर्माण होणे, ग्रामपंचायतीकडून जागा वेळेत उपलब्ध न होणे, पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाकरिता वन हद्दीतील जागा, राष्ट्रीय महामार्ग जागा, रेल्वे क्रॉसिंग या करिता लागणाऱ्या परवानग्या संबंधित विभागाकडून मिळण्यास विलंब होणे, MSEB विद्युत जोडणी घेताना ग्रामपंचायतीमार्फत पूर्वीच्या देयकांची थकबाकी अदा केली नसल्याने नवीन कनेक्शन मिळण्यास अडचणी येणे, लोकवर्गणीची रक्कम विहित प्रमाणात जमा न होणे, इत्यादी अडचणीमुळे योजना कामांना अडथळे येत आहेत. त्याअनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणांमार्फत क्षेत्रियस्तरावर आवश्यक त्या उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रु. ५.०० कोटी खालील कामांची प्रशासकीय मान्यता व अंमलबजावणीचे अधिकार संबंधीत जिल्हा परिषदांना देण्यात आले आहेत, त्यानुसार निविदा कार्यवाही करण्यात आलेली असुन पाणी पुरवठा योजनांची कामे विविध स्तरावर सुरु आहेत. कामातील गैरव्यवहाराबाबत प्राप्त तक्रारीवर अंमलबजावणी यंत्रणेकडून उचित कार्यवाही करण्यात येते. झालेल्या कामांच्या टप्प्यानुसार व वेळापत्रकाप्रमाणे त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणेकडून (Third Party Inspection) योजनेमध्ये त्रुटी आढळून आल्यावर त्यावर उपाय सुचविले जातात व ते स्वखर्चाने कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येतात. तसेच कंत्राटदारास त्यांच्याकडील त्रुटींच्या अनुषंगाने दंड आकारला जातो किंवा काळ्या यादीमध्ये टाकले जाते. वस्तु व सेवा करातील वाढ (जी.एस. टी), ज्यादा दर निविदा, स्त्रोत कोरडा पडणे, त्याअनुषंगाने इतर तांत्रिक बदल व ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार सुधारीत अंदाजपत्रक शासनाकडे संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांना मान्यता देण्यात येते. प्रस्ताव परिपुर्ण नसल्यास संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेकडून त्रुटी पुर्तता अहवाल मागविण्यात येतो व तो प्राप्त झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पार पाडली जाते.

तसेच सद्यस्थितीत केंद्र शासनाकडून माहे ऑक्टोबर २०२४ पासून निधी उपलब्ध न झाल्याने योजनांची कामे मंदावलेली आहेत. त्याअनुषंगाने केंद्र हिस्सा अप्राप्त असतांनाही, राज्य शासनाने विशेष बाब म्हणून आवश्यक तो राज्य हिस्सा वितरीत केलेला आहे. त्याचबरोबर अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या मागणीनुसार निधी वितरणाबाबतची कार्यवाही सद्यस्थितीत शासन स्तरावर सुरु आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये आतापर्यंत एकूण रु. ३९५८.४९५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाकडे शासनस्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा सुरु असून सदर निधी उपलब्ध होताच अंमलबजावणी यंत्रणांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

---

लक्षवेधी सूचना क्र. २४७०

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. विनोद निकोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २४७० पुढीलप्रमाणे आहे.**

"पालघर जिल्ह्यामध्ये प्रशासकीय अधिकारी व ठेकेदार यांच्या हलगर्जीपणामुळे अत्यंत भीषण दुर्घटना घडणे, डहाणू तालुक्यातील चळणी ग्रामपंचायत हद्दीतील सुकड आंबा शिरसून पाडा येथे जलजीवन मिशन अंतर्गत जलकुंभाचे काम सुरु असणे, सदर बांधकाम ठेकदार व प्रशासकीय अधिकारी यांच्या संगनमताने अत्यंत निकृष्ठ दर्जाचे होणे, सदर जलकुंभाचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असणे, १७ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास दोन शाळकरी मुली कुमारी हर्षला रशु बधी व रंजना प्रकाश राव सदर टाकीच्या परिसरामध्ये खेळण्यास जाणे, टाकीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट झाल्यामुळे स्लॅब वर खेळत असलेल्या मुली निकृष्ट दर्जाचा स्लॅब कोसळल्यामुळे ३० फुट उंचावरून खाली जमिनीवर आदळणे, या दुर्घटनेमध्ये दोन्ही मुलींचा दुर्दैवी मृत्यू होणे, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्या विषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, या दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन

जल जीवन मिशन अंतर्गत मौजे सुकडआंबा, ता. डहाणू, जि. पालघर नळ पाणी पुरवठा योजनेस दि. ०४.०८.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर योजनेच्या कामांचे कार्यरंभ आदेश दि. १३.१०.२०२२ रोजी कंत्राटदारास देण्यात आले. सदर योजनेत शिरसोनपाडा, पाटीलपाडा, जुनुनपाडा, बारीपाडा यांचा समावेश आहे. शिरसोनपाडा येथील जल जीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाकीच्या स्लॅबच्या लगतची लँडीग कोसळल्याने दोन विद्यार्थीनींचा मृत्यु व एक विद्यार्थीनी जखमी झाल्याची घटना दि. १७/०३/२०२५ रोजी सायंकाळी ०६ वाजेच्या सुमारास घडलेली आहे. सदर योजनेत इतर उपांगासह एकूण ३ उंच साठवण टाक्या आहेत. त्यापैकी मौजे शिरसोन येथील ३४ हजार लिटर उंच साठवण टाकीचे काम ९५% पूर्ण झालेले आहे. याबाबत दि. १८/०३/२०२५ रोजी उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग डहाणू यांचेकडुन घटनाक्रमाचा प्रत्यक्ष पाहणी अहवालनुसार सदर कामामध्ये शिरसोनपाडा येथील जलकुंभची क्षमता ३४ हजार लिटर व उंची १२ मीटर आहे. सदर कामाच्या ठिकाणी उंच जलकुंभ बांधकाम हे काम प्रगतीपथावर असून जलकुंभाच्या स्थापत्य कामाच्या (टॉप स्लॅब) लगतची लँडींग कोसळले असल्याचे दिसून आले व त्याठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिने कंत्राटदारामार्फत कोणतीही दक्षता घेण्यात आली नसल्याचे दिसून आले आहे. जिल्हा परिषदेकडे मनुष्यबळ कमी प्रमाणात उपलब्ध असल्याकारणाने शासनामार्फत मे. NABARD Consultancy Services यांची प्रकल्प व्यवस्थापन संस्था म्हणून नेमणूक करण्यात आलेली

पि.पा.प.

आहे. सदर संस्थेशी झालेल्या करारनामामधील अट क्र. i) नुसार कामाच्या गुणवत्तेबाबतची हमी, अट क्र. j) नुसार कामाची देखरेख करणे व अट क्र. k) नुसार कामाच्या स्थळी सर्व निर्माणाधीन कामाबाबत देखरेखीची सर्वस्वी जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची आहे. तसेच मोजमापाची नोंदीचेसुध्दा अधिकार सदर संस्थेस देण्यात आले आहेत. सदर कामास नाबार्डचे क्षेत्रीय अभियंता यांनी प्रत्यक्ष कार्यक्षेत्राला दि. ०५/०३/२०२५ रोजी भेट दिली असता त्याठिकाणी असे आढळून आले की, टाकीच्या वरच्या छताची (स्लॅब) तपासणी न करता छताची भरणी (कास्ट) करण्यात आली होती. याबाबत क्षेत्रिय अभियंता यांनी कंत्राटदारास सूचना दिल्या होत्या. सदर स्लॅब भरण्याच्या आधी नाबार्ड अभियंताकडून तपासणी करणे गरजेचे आहे. परंतु याकरिता कंत्राटदाराकडुन योग्य तो सकारात्मक प्रतिसाद देण्यात आलेला नाही, असे प्रकल्प व्यवस्थापन संस्थेच्या दि. १८.०३.२०२५ च्या पत्रात नमूद आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे, त्यामुळे सदर बाबत तात्काळ कारवाई म्हणून उपविभागाकडील कार्यरत कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांनी कामाबद्दल निष्काळजीपणा केल्याने दि. २०/०३/२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या आदेशान्वये त्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच संबंधित कंत्राटदार मे. हरेश बोरवेल्स यांना काळ्या यादीत टाकणेबाबत शिफारस जिल्हा परिषद यांचेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना करण्यात आली आहे. सदर बाबतची पुढील कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सुरु आहे. सदर योजनेच्या कंत्राटदारावर मृतकाच्या कुटुंबियामार्फत दि. १८/०३/२०२५ रोजी एफ.आय.आर. (प्रथम खबर अहवाल) क्रमांक ००४२ दि.१८.०३.२०२५ अन्वये कासा पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच उप अभियंता श्री. बी.के. शिंदे व कार्यकारी अभियंता श्री.आर. आर. पाध्ये यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

सदर घटनेबाबत नाबार्ड कन्सल्टंसी सर्व्हिसेस पालघर संस्थेकडून दि. ०१/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता. सदर खुलासा प्राप्त झाला असून पुढील उचित कार्यवाही जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून करण्यात येत आहे. तसेच सदर नमूद शिरसोनपाडा येथील उंच साठवण टाकीचे कामाकरिता TUV SUD South Asia Pvt Ltd यांनी तांत्रिक तपासणी करण्याकरिता दि. १२/०३/२०२५ रोजी स्थळपाहणी केली असल्याचे अहवालातील अभिलेखावरून दिसून येत आहे. सदर कामाचा त्रयस्थ तांत्रिक परिक्षण अहवालामध्ये विसंगती असल्याची बाब निदर्शनास आली असल्याने मे. TUV SUD South Asia Pvt Ltd यांचेकडून दि. २१/०३/२०२५ अन्वये खुलासा जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून मागविण्यात आला होता. सदर खुलासा प्राप्त झाला असून पुढील कार्यवाही जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून सुरु आहे. नमूद कामातील सर्व उंच साठवण टाक्यांच्या Structural Audit करणे बाबत वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, मुंबई यांना दि. १९/०३/२०२५ रोजी कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने दि. ०३/०४/२०२५ संस्थेकडुन Structural Audit पूर्ण झाले असून, अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

लक्षवेधी सूचना क्र.६४४

# महाराष्ट्र विधानसभा

प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन (मार्च,२०२५)

**सर्वश्री भास्कर जाधव, श्री.रोहित पवार व श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६४४ पुढीलप्रमाणे आहे:-**

" प्रथम एजुकेशन फाउंडेशनच्या 'असर २०२४' या अहवालानुसार सन २०१४ ते सन २०२२ या कालावधीत राज्यातील सरकारी शाळांतील ६ ते १४ वयोगटांतील विद्यार्थ्यांची संख्या ६.५ टक्क्यांनी घटलेली असणे, सदर अहवालानुसार राज्यांतील सरकारी शाळांमधील इयत्ता तिसरीमधील तब्बल ६७% विद्यार्थ्यांना इयत्ता दुसरीचे पुस्तक वाचता येत नसणे, इयत्ता पाचवीमधील ४२.१% विद्यार्थ्यांना तर इयत्ता सातवीमधील २९.१% विद्यार्थ्यांना अद्याप इयत्ता दुसरीचे पुस्तक वाचता येत नसल्याचे नसणे, राज्यांतील सरकारी शाळांमधील इयत्ता दुसरीच्या ६८.४% विद्यार्थ्यांना वजाबाकी येत नसणे, तर इयत्ता पाचवीमधील ७३.९% विद्यार्थ्यांना तर इयत्ता सातवीमधील ६५.५ % विद्यार्थ्यांना अद्याप वजाबाकी येत नसणे, राज्यातील १९.१% शाळांमध्ये अद्याप पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे तर १४.४% शाळांमध्ये नळ असून देखील सदर नळांना पाणी येत नसणे, राज्यातील ३८.२% शाळांमध्ये अद्याप वापरण्यालायक स्वच्छतागृहांची व्यवस्था नसणे, राज्यातील ४८.३% शाळांमध्ये अद्याप विद्यार्थ्यांच्या वापरासाठी संगणक उपलब्ध नसणे, एकंदरीतच सरकारी शाळातील सुविधा तसेच शिक्षणाची गुणवत्ता खालावली असल्याने सरकारी शाळातील सुविधा तसेच शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करण्याची नितांत गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## श्री. दादाजी भुसे, मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन

देशाच्या आणि विविध राज्याच्या शैक्षणिक स्थितीच्या सद्यस्थिती दर्शविणारा प्रथम या संस्थेमार्फत असर २०२४ या सर्वेक्षणाचा दि.२८.०१.२०२५ रोजी प्रकाशित झाला आहे. महाराष्ट्र राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये ९८७ गावांमध्ये वय वर्ष ३ ते १६ मधील ३३७४६ विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहेत. सदर सर्वेक्षणात सरासरी प्रतिजिल्हा १०२२ विद्यार्थी निवडलेले निदर्शनास येतात.

सन २०१४ ते २०२४ या कालावधीतील मागील शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत २०२४ च्या अहवालात पुढील बाबी निदर्शनास येतात :-

- इयत्ता पहिली व दुसरी मधील वाचन व गणितीय क्रिया यामध्ये विद्यार्थ्यांची संपादणूक व अध्ययन स्तरात वाढ दिसून येते.
- शासकीय शाळांमधील इयत्ता तिसरी मधील पायाभूत साक्षरतेच्या वाचन घटकात १०.९% तर खाजगी शाळांमध्ये वाचन घटकात ८.० % प्रगती झालेली दिसून येते.
- शासकीय शाळांमधील इयत्ता तिसरी मधील संख्याज्ञानातील गणितीय क्रियांमध्ये शासकीय शाळांमध्ये १३.१% व खाजगी शाळांमध्ये ११.५% प्रगती झालेली दिसून येते.

- इयत्ता ३ रीतील मुले जी इयत्ता २ रीच्या पातळीचे वाचन करण्याचे महाराष्ट्र राज्याचे प्रमाण देशपातळीपेक्षा १०% ने जास्त दिसून येते.
- इयत्ता तिसरी मध्ये गणितीय क्रियांमधील विद्यार्थी प्रगतीत महाराष्ट्र राज्य देशातील पहिल्या पाच राज्यांमध्ये आहे.
- इयत्ता ५ वी मध्ये विद्यार्थ्यांपैकी २०२२ मध्ये ५५.५% विद्यार्थी हे इयत्ता दुसरीचे वाचन करू शकत होते. तर २०२४ मध्ये ५९.६% विद्यार्थी इयत्ता दुसरीचे वाचन करू शकतात. वाचन क्षमतेमध्ये ४ % नी वाढ झाल्याचे निदर्शनास येते.
- इयत्ता ५ वी मध्ये विद्यार्थ्यांपैकी २०२२ मध्ये भागाकार करण्यामध्ये १९.६% विद्यार्थी भागाकार करू शकत होते, तर २०२४ मध्ये याचे प्रमाण २७.६% एकूणात ८ टक्यांनी वाढ नी वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

उपरोक्त सर्व नमूद बाबींचे अवलोकन केले असता २०२२ च्या तुलनेमध्ये २०२४ मध्ये यात १३% ची वाढ झालेली दिसून येते.

सरकारी शाळातील सुविधा तसेच शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी निपुण भारत अभियान, शाळा पूर्व तयारी कार्यक्रम, मुलभूत वाचन विकास कार्यक्रम व गणित संबोध कार्यक्रम, विद्याप्रवेश, स्तराधारित अध्ययन कार्यक्रम, सेतू अभ्यास, शिक्षक प्रशिक्षण, शाळांसाठी गुणवत्ता मानके, नियतकालिक मूल्यमापन चाचण्या (PAT) इत्यादी कार्यक्रमाचे /उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. शासकीय शाळांमधील भौतिक व इतर सुविधा सुधारण्यासाठी केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

*************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मा.श्री. भास्कर जाधव, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६४६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"रत्नागिरी जिल्ह्यातील शेकडो शिक्षक आंतरजिल्हा बदलीने आपल्या जिल्ह्यात जात असल्यामुळे सध्या जिल्ह्यात दीड हजारपेक्षा जास्त शिक्षकांची पदे रिक्त असणे, असे असताना राज्य शासनाने १० फेब्रुवारी २०२५ रोजी कंत्राटी शिक्षक भरती बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे ७०० हून अधिक स्थानिक बी. एड., डी. एड धारक कंत्राटी शिक्षकांपुढे बेरोजगारीचा निर्माण झालेला प्रश्न. कंत्राटी शिक्षक भरतीचा २३ सप्टेंबर २०२४ रोजी काढलेला निर्णय रद्द करून शासनाने नवीन शासन निर्णय काढला असून पवित्र पोर्टलवरून शिक्षक भरती करणार असल्याची केलेली घोषणा, त्यास जिल्ह्यातील कंत्राटी शिक्षकांनी केलेला तीव्र विरोध, पवित्र पोर्टलवरून अन्य जिल्ह्यातून येणाऱ्या शिक्षकांची संख्या ही मोठ्या प्रमाणात असल्याने हे शिक्षक पुन्हा आंतरजिल्हा बदलीने आपल्या जिल्ह्यात जातात. परिणामी, जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत जाणारी रिक्तपदांची संख्या, विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, त्यामुळे सध्याच्या कंत्राटी शिक्षकांनाच कायम ठेवण्याची किंवा पवित्र पोर्टलवरून भरती करताना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याची मागणी, त्यासाठी जिल्ह्यातील कंत्राटी भरतीतील उमेदवारांनी एकत्र येत केलेला निषेध व तीव्र आंदोलन छेडण्याचा केलेला निर्धार. हि बाब लक्षात घेऊन रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या ७०० हून अधिक स्थानिक बी. एड., डी. एड धारक कंत्राटी शिक्षकांवर अन्याय होऊ नये, त्यांचा रोजगार हिरावला जाऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

कमी पटसंख्या असलेल्या शाळांमधील मंजुर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक सेवानिवृत्त शिक्षक किंवा डीएड, बीएड अर्हताधारक बेरोजगार शिक्षक यांमधून नियुक्त करण्याबाबतचा निर्णय दिनांक ०५.०९.२०२४ व दिनांक २३.०९.२०२४ चा शासन निर्णयांन्वये घेण्यात आला होता. यानुसार सद्या १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळामध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हयामध्ये सन २०२३-२४ मध्ये आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त केल्यानंतर मोठया प्रमाणामध्ये प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे झाल्यामुळे रत्नागिरी जिल्हयामध्ये एकूण ४९१ उमेदवारांना कंत्राटी शिक्षक म्हणून नियुक्ती देणेत आलेली आहे.

तसेच डीएड व बीएड धारक उमेदवारांकडून तसेच विविध संघटना यांचेकडून कंत्राटी शिक्षक भरतीला विरोध होत होता. तसेच त्यादरम्यान शिक्षक भरतीचा दूसरा टप्पा सुरु झाला असल्याने पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीद्वारे जास्तीची गुणवत्ता सिध्द करणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती मिळणार आहे. ही बाब विचारात घेऊन दि.१०.०२.२०२५ च्या शासन आदेशान्वये कंत्राटी शिक्षक नियुक्तीबाबतचे दि.०५.०९.२०२४ व दि.२३.०९.२०२४ चे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आलेले आहे. तसेच यान्वये कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांचा कार्यकाल संपुष्टात येणे अथवा कार्यरत असलेल्या पदावर नियमित शिक्षकाची नियुक्ती होणे यापैकी जे अगोदर घडेल तितक्या कालावधीपर्यंत अशी नियुक्ती ठेवण्याबाबत व त्यानंतर त्यांना पुनर्नियुक्ती न देणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रभावी शैक्षणिक संपादणूकीसाठी शिक्षकांच्या गुणवत्तेशी तडजोड करता येणार नाही, ही बाब सर्वमान्य आहे. यास्तव पवित्र पोर्टलमार्फत विहीत पध्दतीने नियमित पदावर गुणवत्ताधारक शिक्षक नव्याने नियुक्त झाल्यास कंत्राटी शिक्षकांच्या सेवा चालू ठेवता येणार नाही.

***************

लक्षवेधी सुचना क्रमांक १६५८

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.संजय उपाध्याय, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६५८ पुढील प्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ(प्रशासन शाखा) मधील शिक्षण सहसंचालक व समकक्ष या पदावर पदोन्नती देण्याबाबतचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय दि.१५.१०.२०२४ निर्गमित झाला असणे, या निर्णयामध्ये एकूण १० बदल्या केल्या असणे, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ(प्रशासन शाखा) मधील शिक्षण उपसंचालक पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना शासनाने मान्य केलेल्या निवड सूचीनूसार शिक्षण सहसंचालक व समकक्ष महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ(प्रशासन शाखा) या पदावर सुधारित वेतन संरचनेत सेवा ज्येष्ठतेनुसार अटींच्या आधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीचा निर्णय शासनाने घेणे, यामध्ये अनुक्रमणिका ५ मधील श्री.संदिप प्रमोद सांगवे(इमाव) हे सध्या उपसंचालक पदावर कार्यरत असून त्यांना शासन निर्णय दि.१५.१०.२०२४ रोजीच्या निणर्यान्वये पदोन्नती देऊनही त्यांनी उपसंचालक पदावर कायम असल्याने उपसंचालक पदासाठी पात्र असणाऱ्या इतर अधिकाऱ्यांवर अन्याय होत असल्याने श्री. सांगवे यांची इतरत्र ठिकाणी पदस्थपना करुन तातडीने बदली करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### श्री.दादासाहेब भुसे, मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अखत्यारीत महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (प्रशासन शाखा) या सेवेतील शिक्षण उपसंचालक या संवर्गातील अधिकाऱ्यांना शिक्षण सहसंचालक या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबतच्या १६ अधिकाऱ्यांचा प्रस्ताव आस्थापना मंडळासमोर सादर करण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५.०४.२०२४ रोजीच्या आस्थापना मंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावावर विचार करण्यात आला. सदर निवडसुचिस मान्यता देण्यात आली आहे. सन २०२३-२४ च्या निवडसूचीत १६ पदापैकी ११ पदांना सामान्य प्रशासन विभागाने तात्पुरती पदोन्नती देण्यास मान्यता दिली आहे.

तद्नंतर दिनांक ११.१०.२०२४ रोजी नागरी सेवा मंडळाची बैठक घेऊन, सदर ११ पदांपैकी फक्त ९ पदांना शासन निर्णय दिनांक १५.१०.२०२४ अन्वये सर्व नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून पदस्थापना देण्यात आली आहे. परंतु श्री.सांगवे यांना पदस्थापना देण्यात आली नव्हती.

मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडील कामाची व्याप्ती जास्त असल्यामुळे सुशासन आणि गुणवत्तावाढ याबाबी विचारात घेता, मुंबई विभागातील विभागीय शिक्षण उपसंचालक पदाचे सहसंचालक दर्जामध्ये उच्चीकरण करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला असता, सदर प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने अमान्य केला आहे.

तद्नंतर नागरी सेवा मंडळाची दिनांक ०७.०२.२०२५ रोजी बैठक घेण्यात आली होती. नागरी सेवा मंडळाने श्री.सांगवे यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारशीसह श्री.सांगवे यांच्या पदस्थापनेबाबतचा शासन निर्णय दिनांक २३.०६.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार श्री.संदिप संगवे, शिक्षण सहसंचालक हे शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई या पदावर दिनांक २३.०६.२०२५ पासून रुजू झाले आहेत.

******************

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२२१८**

श्री.शिवाजी पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २२१८ पुढील प्रमाणे आहे:-

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदार संघामध्ये चंदगड, गडहिंग्लज, आजरा या तालुक्यांचा समावेश होतो. १) हा मतदारसंघाला कर्नाटक आणि गोवा राज्यांच्या सीमा लागून आहेत. सदर मतदारसंघात मोठे उद्योग नाहीत. त्यामुळे येथे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात असणे, २) चंदगड, गडहिंग्लज व आजरा या तालुक्यांमध्ये उद्योग यावेत. जेणेकरून येथील स्थानिक तरुणांच्या हाताला रोजगार भेटेल. या भागातील तरुण रोजगार नसल्याने मोठ्या प्रमाणात मुंबई, पुणे, गोवा इत्यादी शहरांकडे रोजगाराच्या शोधात आपल्या कुटुंबापासून दूर जावून तुटपुंज्या पगारावर नोकरी करून उदरनिर्वाह करत असणे, त्यामुळे येथे उद्योग होणे आवश्यक असणे. ३) मतदारसंघाला लागून जवळपास ६ विमानतळे आहेत. रेल्वे जंक्शन जवळच्या अंतरावर आहेत. २ राज्यांच्या सीमा लागून असल्याने, हा भाग उद्योगांसाठी अनुकूल आहे. मा. पंतप्रधान यांचा विकसित भारत व मा.मुख्यमंत्री यांचा विकसित महाराष्ट्र हे चंदगड मतदारसंघातून सुरु झाला पाहिजे. सरकारने येथे MIDC क्षेत्र जाहीर करून मोठे उद्योग या भागात आणावेत आणि येथील तरुणांना रोजगार मिळवून द्यावा. तसेच, चंदगड मतदारसंघात जागा, वीज, पाणी, वाहतूक व विमानतळे हे सर्व उपलब्ध असून येथे पंचतारांकित MIDC व्हावी. तसेच, चंदगड मध्ये IT पार्क उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

**चंदगड तालुक्यातील औद्योगिक क्षेत्राबाबत-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून चंदगड तालुक्यामधील मौजे हलकर्णी, मुरूकुटेवाडी व मजरे कार्वे या गावातील खाजगी जमिनींचे संपादन करून हलकर्णी औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात आली आहे. सदर औद्योगिक क्षेत्राकरीता सन १९९५ ते २००० या कालावधीत भूसंपादन केलेले असून, एकूण संपादित क्षेत्र १९२.५३ हेक्टर इतके आहे.

सध्यस्थितीत हलकर्णी औद्योगिक क्षेत्रामध्ये लहान मोठे असे एकूण २८३ औद्योगिक भूखंड आरेखित केले असून त्याचे क्षेत्र १०८.८१ हेक्टर इतके आहे. एकूण आरेखित भूखंडापैकी २०६ औद्योगिक भूखंडाचे वाटप केलेले असून वाटपाचे क्षेत्र ७१.३२ हेक्टर इतके आहे. त्या मध्ये इंजिनीअरींग, खाद्यपदार्थ प्रक्रिया, काजू प्रक्रिया, पेपरमिल इत्यादी प्रकारचे उत्पादन सुरु आहे.

मागील ३ वर्षामध्ये सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये खालील प्रमुख कंपन्यांना भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंपनीचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | प्रस्ता वित गुंतवणूक (रू.कोटी) |
|---|---|---|---|
| १. | मे.इको केन शुगर एनर्जी लिमिटेड | १,००,००० | ८४.२२ |
| २. | मे.अलकेमी बायो फ्युअल्स इंडिया प्रा.लि. | ९९,७६८ | १७०.०० |
| ३. | मे.सिद्धिविनायक केश्यू इंडस्ट्रीज प्रा.लि. | २०,००० | ५०.५० |
| ४. | मे.खवरे डिस्टीलरी प्रा.लि. | ६०,७०२ | ६९.४६ |
| | एकूण | २,८०,४७० | ३७४.१८ |

/१

सध्यस्थितीत हलकर्णी औद्योगिक क्षेत्रामध्ये ऑनलाईन सरळ पद्धतीने वाटपाचे धोरण आहे. सध्यस्थितीत एकूण ७७ औद्योगिक भूखंड वाटपास उपलब्ध असून त्याचे क्षेत्र ३७.४९ हेक्टर इतके आहे.

**आजरा तालुक्यातील औद्योगिक क्षेत्राबाबत-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून आजरा तालुक्यांमधील मौजे पेठेवाडी या गावातील सरकारी जमिनीचे संपादन करून आजरा लघु औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात आली आहे. सदर औद्योगिक क्षेत्राकरीता सन १९९१ या साली भूसंपादन केलेले असून एकूण संपादित क्षेत्र ६.०१ हेक्टर इतके आहे.

सद्यस्थितीत आजरा औद्योगिक क्षेत्रामध्ये लहान मोठे असे एकूण ३२ औद्योगिक भूखंड आरेखित केलेले असून त्याचे क्षेत्र २.६४ हेक्टर इतके आहे. एकूण आरेखित भूखंडापैकी सर्व ३२ औद्योगिक भूखंडांचे वाटप केलेले आहे. त्यामध्ये इंजिनीअरींग, भात प्रक्रिया उद्योग, काजू प्रक्रिया इत्यादी प्रकारचे उत्पादन सुरु आहे.

अतिरिक्त. आजरा औद्योगिक क्षेत्राकरीता आजरा तालुक्यानतील मौजे आजरा व मौजे पारेवाडी येथील एकूण १७.७४ हेक्टर सरकारी जमिनीचे संपादन करण्याचे प्रस्ताआवित आहे.

**गडहिंग्लीज तालुक्याततील औद्योगिक क्षेत्राबाबत-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून गडहिंग्लज तालुक्यामधील मौजे बड्याची वाडी या गावातील खाजगी जमिनींचे संपादन करून गडहिंग्लज औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात आली आहे. सदर औद्योगिक क्षेत्राकरीता सन १९९५ ते २००१ या कालावधीत भूसंपादन केलेले असून, सध्यस्थितीत एकूण संपादित क्षेत्र ११४.१३ हेक्टर इतके आहे. सध्यस्थितीत गडहिंग्लज औद्योगिक क्षेत्रामध्ये लहान मोठे असे एकूण २०३ औद्योगिक भूखंड आरेखित केलेले असून त्याचे क्षेत्र ७५.१८ हेक्टर आर इतके आहे. एकूण आरेखित भूखंडापैकी १२८ औद्योगिक भूखंडाचे वाटप केलेले असून वाटपाचे क्षेत्र ६७.५२ हेक्टर इतके आहे. त्यामध्ये इंजिनीअरींग, वस्त्रोद्योग इत्यादी प्रकारचे उत्पादन सुरु आहे.

मागील ३ वर्षामध्ये सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये खालील प्रमुख कंपन्यांना भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंपनीचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | प्रस्ता वित गुंतवणूक (रू.कोटी) |
|---|---|---|---|
| १. | मे.गॅमा सिलिका प्रा.लि. | ४२,००० | ५२.०० |
| २. | मे.मायस्मालर्ट इंदुलिंक प्रा.लि. | ९१,२४२ | ५८.०० |
| ३. | मे.वॉटरवाईस इंडस्ट्रीइज प्रा.लि. | ३६,०६१ | ५२.०० |
| ४. | मे.आरएसए डेनिम प्रा.लि. | ४८,६७० | १०३.१३ |
| | एकूण | २,१७,९७३ | २६५.१३ |

सध्यस्थितीत, गडहिंग्लाज औद्योगिक क्षेत्रामध्ये ऑनलाईन सरळ पद्धतीने वाटपाचे धोरण आहे. सध्यस्थितीत एकूण ७५ औद्योगिक भूखंड वाटपास उपलब्ध असून त्याचे क्षेत्र ७.६६ हेक्टर इतके आहे.

**चंदगड येथे आय.टी. पार्क स्थापन करणेबाबत -**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून कोल्हापूर शहरामध्ये १.१० हेक्टर क्षेत्रामध्ये आय.टी. पार्क विकसित करण्यात आला आहे. सध्यस्थितीत एकूण ०५ उद्योग कार्यरत आहेत.कोल्हांपूर शहरातील शेंडा पार्क येथे आय.टी.पार्क स्थापन करण्याबाबत मा.उप मुख्य मंत्री, (वित्त) यांचे अध्यपक्षतेखाली दि.०४.१०.२०२३ रोजी बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने संचालक, विभागीय कृषी संशोधन केंद्र यांना मौजे-सांगरूळ, जि. कोल्हापूर येथील पर्यायी जागा द्यावयाची कार्यवाही जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेमार्फत सुरू आहे. संचालक, विभागीय कृषी संशोधन केंद्र यांचेकडील ३४.७६ हेक्टर आर क्षेत्राचा ताबा महामंडळास मिळाल्यानंतर आय.टी. पार्क स्थापन करण्याचे प्रयोजन आहे. चंदगड येथे आय.टी.पार्क स्थापन करणेबाबत उद्योजकांची मागणी व सुसाध्यता पडताळणी करुन आय.टी. पार्क स्थापन करण्याबाबत निर्णय घेणे उचित होईल.

***************************

महाराष्ट्र विधानसभा

२०२५ चे (पहिले) अर्थसंकल्पिय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रं.२४२४

श्री.सुहास बाबर, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२४२४.

"सांगली, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यासाठी कोल्हापूर येथे स्थापन करण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र खानापूर जि.सांगली येथे स्थापन करण्याची मागणी प्रलंबित असणे, खानापूर येथे उपकेंद्र झाल्यास सर्वार्थाने सोयीचे ठरणार असल्याने याबाबत त्वरीत कार्यवाही होण्याची आवश्यकता असणे, विद्यापीठ संबंधित कामकाजासाठी विद्यार्थी वर्गाला कोल्हापूर येथे जावे लागत असून, तरी त्यासाठी खानापूर येथे उपकेंद्रासाठी लागणारी जागा व सर्व निकष पूर्ण होत असणे, शिवाजी विद्यापीठाचे मॅनेजिंग कौन्सिलने खानापूर येथे उपकेंद्र होणेबाबतचा ठराव करुन सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला असणे, उपकेंद्र होण्यासाठी विद्यार्थी, नागरिक लोकप्रतिनिधी यांची याबाबत वारंवार होत असलेली मागणी त्यामुळे खानापूर येथे उपकेंद्र होण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया".

श्री. चंद्रकांत पाटील, मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे निवेदन

राज्यातील विविध अकृषि विद्यापीठांकडून तसेच मा.लोकप्रतिनिधींकडून उपपरिसर/उपकेंद्र सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त होत आहेत. यामध्ये गोंडवाना विद्यापीठाचे चंद्रपूर येथे उपकेंद्र, मुंबई विद्यापीठाचे पालघर येथे उपकेंद्र, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे परभणी येथे उपकेंद्र, शिवाजी विद्यापीठाचे खानापूर येथे उपकेंद्र तसेच अमरावती विद्यापीठाचे अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम येथे उपकेंद्रे स्थापन करण्याची मागणी करण्यात येत आहे. उपपरिसर/उपकेंद्र सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मधील कलम ५ (१०) नुसार विद्यापीठाला उपपरिसर स्थापन करण्याचा अधिकार आहे. तथापि, विद्यापीठ निधीतून उपकेंद्र सुरु करणे शक्य होत नसल्याने उपकेंद्र सुरु करण्यास मान्यता देऊन आवश्यक जागा व निधीची सुध्दा मागणी करण्यात येते.सदरहू उपकेंद्रामध्ये विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच विविध अर्ज भरण्याची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात येते. याशिवाय महाविद्यालयांना संलग्नता अर्ज व शुल्क भरण्याची सुविधा प्राप्त होते. विद्यार्थी व संलग्नित महाविद्यालय यांची प्रशासकीय व शैक्षणिक कामे उपकेंद्रामध्ये झाल्याने वेळेची व पैशाची बचत होते.

उपपरिसर/उपकेंद्र सुरु करण्याबाबतची वाढती मागणी विचारात घेऊन, सद्यस्थितीत सुरु असलेल्या उपपरिसरांची सद्यस्थिती काय आहे तसेच प्रस्तावित उपकेंद्राची आवश्यकता कशा पध्दतीने आहे, या बाबींसह विद्यापीठनिहाय उपकेंद्र सुरु करावयाचे झाल्यास आवर्ती व अनावर्ती

निधीची व जागेची आवश्यकता याबाबत सुसंगत धोरण तयार करण्यासाठी प्र-कुलगुरु मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०८.२०२३ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये डॉ.एम.एस.कुऱ्हाडे, संचालक, संस्कार सर्जन सोसायटी, मुंबई, डॉ.शिवशरण माळी, कुलगुरुंचे सल्लागार एम.आय.टी. विद्यापीठ, पुणे, श्री.दिलिप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, श्री.बी.पी.पाटील, परिक्षा संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा समावेश आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

***********

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १४१४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. सत्यजित देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४१४ पुढीलप्रमाणे आहे :-

"स्व. कै. शिवाजीराव देशमुख यांच्या कृपेने चांदोली धरण व चांदोली राष्ट्रीय उद्यानाची निर्मिती झालेली असणे, धरणासाठी ११ तर चांदोली राष्ट्रीय उद्यानासाठी ३२ अश्या जवळपास ४३ गावांनी या प्रकल्पासाठी विस्थापित होऊन त्याग केला केला असणे, राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्प पैकी प. महाराष्ट्रामध्ये सह्याद्री हा एकमेव व्याघ्र प्रकल्प असणे,सह्याद्री व्याघ्र प्रकल्प मधील चांदोली राष्ट्रीय उद्यानचे एकुण क्षेत्र ३१७ चौ. की. मी, पैकी २०१ चौ.की.मी पेक्षा जास्त क्षेत्र म्हणजेच ६३% क्षेत्र हे फक्त शिराळा तालुक्याने या प्रकल्पासाठी दिले असणे, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा UNESCO ने नामांकित केलेला "जागतिक वारसा स्थळ" असून, या ठिकाणी विविध संकुलांची उभारणी, जैवविविधता व वनौषधीचे प्रशस्थ वन-उद्यान, प्रशस्थ फुलपाखरू वन-उद्यान, नदी पात्रामध्ये बोटिंग प्रकल्प, मगर-क्रोकोडाइल पार्क, प्राणी संग्रहालय व वन्यजीव उपचार केंद्र, रखडलेल्या व्याघ्र पुनर्स्थापना प्रकल्पाला चालना, पर्यटकाना प्रशस्थ निवास व्यवस्था, उच्च दर्जाचे विश्रामगृह, जंगल सफारी, पक्षी निरीक्षण व ट्रेकिंगची व्यवस्था, स्थानिक शेती, लोकजीवन व संस्कृतीची माहिती दर्शवणारे संस्कृतीक उद्यान, धरण व विद्युत उर्जा प्रकल्प माहिती केंद्र अश्या पर्यटन विकास प्रकल्पाची उभारणी करण्यात आल्यास स्थानिकांना रोजगारा मध्ये वाढ, व्यावसायिक, पर्यटक फायदा होणार असून शासनाच्या महसूलामध्ये प्रचंड वाढ होणार असल्याने मा.मुख्यमंत्री, वने, पर्यटन, जलसंपदा व सांस्कृतिक कार्य मंत्री यांना लोकप्रतिनिधींनीनी मागणी केलेली असणे, त्यानुषंगाने उक्त ठिकाणी"जागतिक दर्जाचा पर्यटन विकास प्रकल्प"उभा राहावा याकरीता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपायोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. गणेश नाईक**

### निवेदन

सातारा जिल्ह्यातील ४२३.५५ चौ.कि.मी. क्षेत्र चांदोली वन्यजीव अभयारण्य म्हणून दिनांक १६.०९.१९८५ च्या शासन अधिसूचने अन्वये घोषित करण्यात आले असून त्यामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण ३२ गावांचा समावेश आहे. तद्नंतर चांदोली वन्यजीव अभयारण्यास दिनांक १४.०५.२००४ रोजीच्या शासन अधिसूचने अन्वये ३२ गावांसह मौजे आंबोली ता. शाहुवाडी या गावाचा समावेश करून राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर सन २०१० मध्ये चांदोली राष्ट्रीय उद्यान व कोयना वन्यजीव अभयारण्य यांचा समावेश करून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे.

चांदोली वन्यजीव अभयारण्यात समाविष्ट असलेल्या ३२ गावांपैकी सांगली जिल्ह्यातील ५ तर कोल्हापूर जिल्ह्यातील ३ गावांचे पुनर्वसन पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले आहे. वारणा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मौजे पेटलोंड ही मुख्य बाजारपेठ, वाहतुकीचे रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे आणि भूकंपाचे धक्के बसत असल्याच्या पार्श्वभूमीवर उर्वरित २४ गावांकडून पुनर्वसन करण्याची मागणी करण्यात येत होती. तथापि, तत्कालीन परिस्थितीत वन विभागाचे पुनर्वसन धोरण नसल्यामुळे तसेच सदर गावे वारणा प्रकल्पाच्या पुनर्वसन निकषांमध्ये बसत नसल्यामुळे सदर गावांचे पुनर्वसन करण्याकरीता दिनांक ३१.०३.१९९५ रोजीच्या शासन निर्णयान्वये एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली.

सह्याद्री व्याघ्र राखीव परिसर निसर्ग सौंदर्यामुळे पर्यटकांना आकर्षित ठरणारा केंद्रबिंदू ठरला आहे. त्यामुळे स्थानिक, निसर्गप्रेमी, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी व इतर विभागाच्या सुचना विचारात घेवून, पर्यटन क्षेत्राचा विकास, स्थानिकांना रोजगार निर्मितीच्या दृष्टीने निसर्ग पर्यटन संकुलातील सुविधा, निसर्ग

पर्यटन स्थळी / इतर ठिकाणी करावयाच्या सुविधा व निसर्ग पर्यटन वाढीस पुरक उपक्रमांचा समावेश करुन सह्याद्री व्याघ्र राखीवच्या स्थानिक सल्लागार समिती व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास महामंडळ यांच्या मान्यतेने सन २०२३-२४ ते सन २०२७-२८ या कालावधीकरता करीता रक्कम रु. ८२०५.७६ लक्षचा निसर्ग पर्यटन विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. तसेच सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये निसर्ग पर्यटनासाठी चांदोली राष्ट्रीय उद्यान व कोयना अभयारण्याकरीता विविध योजनांतर्गत रु. १२२९.९४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

चांदोली-मणदूर पर्यटन विकास करीता फुलपाखरु उद्यान, क्रोकोडाईल पार्क, जल-क्रिडा प्रकल्प, साहसी खेळ प्रकल्प, जंगल सफारी मार्ग-तांबवे ते को. निवळे विकसित करणे, मधमाशी पालन उद्योगाला चालना देणे, पक्षी निरीक्षण मार्ग विकसित करणे, पावसाळी पर्यटन ट्रेक रुट (जाधववाडी ते शेवताई मंदिर), उखळू धबधबा ट्रेक, कडवी धरण (बोटींग सफारी), जंगल सफारी करीता वाहने खरेदी करणे व प्रशिक्षित गाईड तयार करणे, डोमेटरी व निवास व्यवस्था, पावसाळी पर्यटनासाठी सरपटणारे आणि उभयचर प्राण्यांसाठी निरीक्षण पायवाट विकसीत करणे इ. कामे प्रस्तावित केलेली आहेत.

सदर आराखड्यामध्ये समाविष्ठ नसलेली कामे सन २०२५-२६ मध्ये नव्याने प्रस्तावित करुन महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ यांचे मान्यतेनंतर निधी प्राप्तीनुसार कामे करण्यात येतील.

*****

H/777-19

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक २३२०

श्री. भास्कर जाधव, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३२० पुढीलप्रमाणे आहे :-

" पालघर जिल्ह्यातील मौजे सरावली, (ता. धनसार) येथील सर्वे नंबर ५५, प्लॉट नंबर ६, ७, ८, ९, १३, १४, १९, २० येथे गो ग्रीन इको टेक सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी रहिवासी जागेत बेकायदेशीरपणे सुरु असणे, कंपनीने ग्रामपंचायत सरावली यांच्याकडून केवळ प्लास्टिक रिसायकलिंगची परवानगी घेतली असताना प्रत्यक्षात हजार्डस प्री-प्रोसेसिंगचा म्हणजेच रासायनिक प्रक्रिया करणारा व्यवसाय सुरु असणे, कंपनी कोणत्याही प्रकारचे हजारर्डस वेस्ट प्रोसेस न करता कचरा अन्यत्र पाठवत असणे, कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडून परवानगी न घेता कंपनीने केलेले बांधकाम, कागदपत्रांमध्ये छेडछाड करुन बोगस परवानग्या कंपनीने मिळवलेल्या असणे, माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या माहितीवरुन अनेक गंभीर बाबी उघड होणे, याबाबत ०५.०३.२०२५ तसेच त्याआधी देखिल स्थानिक ग्रामस्थ जीतम राजेंद्र घरत यांनी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे/पालघर, उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रारी करुन देखील कोणतीही कार्यवाही न करता त्यांच्या तक्रारींवर दिलेली उत्तरे मोघम, असमाधानकारक असणे, यामुळे कंपनी आणि मंडळाचे अधिकारी यांच्यात संगनमत असल्याच्या शक्यतेला मिळणारी पुष्टी, याबाबत ०६.०२.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री, मा. पर्यावरण मंत्री तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे लेखी तक्रार करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना "

---

## मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांनी करावयाचे निवेदन

मौजे सरावली, ता.जि.पालघर येथील सर्व्हे क्रमांक ५५ क्षेत्र २०१८०.०० चौ.मी. जागेतील भुखंड क्रमांक १ ते ४५ वर रहिवास या पयोजनार्थ बिनशेतीसह रेखांकन परवानगी अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १८.१२.१९९७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे.

मे. गो ग्रीन इको टेक सोल्युशन्स प्रा. लि. या कंपनीने मौजे सरावली येथे एम.आय.डी.सी, तारापूर लगत सर्व्हे क्रमांक ५५, प्लॉट क्रमांक ८, ९, १३, १४, १९, २० या अकृषक जागेवर प्लास्टिक रिसायकलिंग व रसायनिक घनकचरा व्यवस्थापनाकरिता आणि बांधकामासाठी ग्रामपचायंत, सरावली यांनी दिनांक ०७.१०.२०२० रोजी ना हरकत दाखला दिला आहे.

तसेच, मे. गो ग्रीन इको टेक सोल्युशन्स प्रा. लि. यां कंपनीने एम.आय.डी.सी., तारापूर लगत बफर झोन सर्व्हे क्र. ५५, प्लॉट क्र. ८, ९, १३, १४, १९, २०, सरावली, ता. जि. पालघर येथे स्वयं मालकीच्या जागेवर औद्योगिक घनकचरा प्रि-प्रोसेस करुन सिमेंट कंपन्यासाठी पर्यायी इंधनाचे उत्पादन करण्यासाठी उद्योग उभारण्याकरीता संमत्तीपत्र मिळविण्यासाठी दिनांक १९.१०.२०२० रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज सादर केला होता

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने H&OW(M & TBM) नियम, २०१६ नुसार धोकादायक आणि अन्य कचऱ्याच्या पूर्व-प्रक्रिया आणि सह-प्रक्रियेसाठी, माहे जुलै, २०१७ मध्ये मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेले आहेत. सदरील मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास मौजे सरावली येथे एम.आय.डी.सी., तारापूर लगत बफर झोन सर्व्हे क्र. ५५, , प्लॉट क्रमांक ८, ९, १३, १४, १९ व २० या अकृषक

जागेवर दिनांक ०२.१२.२०२० रोजी उद्योग उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन संमत्तीपत्र (Consent to Establishment) दिले आहे.

तद्नंतर मे. गो ग्रीन इको टेक सोल्युशन्स प्रा. लि. या उद्योगाने उत्पादन सुरु करण्यासाठी दिनांक २०.०१.२०२२ रोजी संमतीपत्र मिळण्याबाबत अर्ज केला. सदर अर्ज महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्र समिती (Consent Committee) च्या दिनांक ०८.०४.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये विचारार्थ घेण्यात आला व सदर बैठकीमध्ये सदर उद्योगास संमतीपत्र देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर उद्योगास दिनांक २९.०४.२०२२ रोजी हजार्डस वेस्ट प्रि-प्रोसेसिंग करण्यासाठी संमतीपत्र (Consent to Operate) प्रदान करण्यात आले होते. तसेच, सदर उद्योगच्या संमतीपत्राचे दिनांक ३१.०१.२०२३ रोजी नुतनीकरण करण्यात आले असून, सदर संमतीपत्र दिनांक ३१.०३.२०२८ पर्यंत वैद्य आहे. सदर उद्योगातून निघणारा प्रक्रियाकृत कचरा सिमेंट कारखान्यांना Cement Kiln मध्ये पर्यायी इंधन म्हणून वापरण्याकरीता पाठविण्यात येतो.

सदर उद्योगाने नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, पालघर यांच्याकडे जमिनीचा झोन दाखला मिळणेबाबत दिनांक २७.०१.२०२५ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जानुसार नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, पालघर यांनी सर्व्हे क्रमांक ५५, प्लॉट क्रमांक ८, ९, १३, १४, १९ व २० ही जागा Industrial / Mining / MIDC या मध्ये समाविष्ट असल्याबाबत कळविले आहे.

श्री. जितम राजेंद्र घरत यांनी प्रस्तुत प्रकरणी केलेली तक्रार जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक १८.०२.२०२५ रोजी प्राप्त झालेली आहे. सदर तक्रार अर्ज महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक ०४.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली असून, सदरील तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २०.०३.२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास भेट देऊन पाहणी करण्यात आली असता, पाहणी दरम्यान माहे नोव्हेंबर, २०२२ ते माहे जानेवारी , २०२५ पर्यंत सदर उद्योगामध्ये १५,८०७.८३ टन औद्योगिक घनकचरा प्रि-प्रोसेस करण्यासाठी प्राप्त झाला व १२,४८९.०८ टन औद्योगिक घनकचरा प्रि-प्रोसेस करुन सिमेंट कारखान्यांना उत्पादन प्रक्रियेमध्ये (in cement kiln) पर्यायी इंधन म्हणून वापरण्यासाठी पुरविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले. तसेच, ३३१८.७५ टन औद्योगिक घनकचरा प्रि-प्रोसेस करण्यासाठी सदर उद्योगामध्ये शिल्लक असल्याचे आढळले. प्रि-प्रोसेस करून औद्योगिक घनकचऱ्यापासून तयार करण्यात आलेले पर्यायी इंधन सिमेंट कंपन्यांमध्ये वापरण्यासाठी पाठविण्यात येते. अन्यत्र कोठेही पाठविण्यात येत नसल्याचे निर्दशनास आले.

याशिवाय सदर उद्योगाचे प्रि-प्रोसेसिंग प्रक्रियेमधून सांडपाणी निघत नाही तसेच प्रक्रियेदरम्यान उत्सर्जित होणाऱ्या अस्थिर सेंद्रिय संयुगे (Volatile Organic Compound (VOC)) नियंत्रीत करण्यासाठी सदर उद्योगाने व्दितीय स्तराचे स्क्रबर बसविल्याचे निर्दशनास आले.

श्री. जितम राजेंद्र घरत यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितलेली माहिती आणि दिनांक १२.०३.२०२४ व दिनांक २०.०३.२०२५ रोजी दिलेल्या भेटीच्या आधारावर श्री. जितम राजेंद्र घरत यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामध्ये सदर उद्योगाविरुध्द केलेल्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य आढळून आले नाही.

******

लक्षवेधी सूचना क्र. ७५२

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७५२ :-**

"रेल्वे फाटक उघडे असतानाच प्रयागराज एक्सप्रेस ही रेल्वेगाडी निघून गेल्याची धक्कादायक घटना दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास रत्नागिरी जिल्हयातील कळंबस्ते (ता.चिपळूण) येथे घडल्याचे समोर येणे, याचवेळी रेल्वे रुळ ओलांडून जाण्याच्या तयारीत असलेल्या अनेकांनी रेल्वेगाडीच्या आवाजाने पळ काढल्याने सुदैवाने त्यांचे वाचलेले प्राण, एक मोठी दुर्घटना टळली असली तरी रेल्वे प्रशासनाचा प्रचंड निष्काळजी आणि बेजबाबदारपणा समोर येणे, रेल्वे फाटक असलेला सदर मार्ग हा चिपळूण व खेड या दोन तालुक्यांना जोडणारा असून या दोन्ही तालुक्यातील ५० हून अधिक गावांना जोडणारा हा एकमेव मार्ग असणे, दिवसभरात हजारो वाहने आणि नागरिकांना हा रुळ ओलांडूनच करावी लागणारी ये-जा, यामध्ये चिपळूण शहरातील शाळांमध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांच्या गाडयांचाही समावेश असणे, दिवसभरात ६० पेक्षा अधिक रेल्वेगाडया धावत असल्यामुळे त्या कालावधीत रेल्वे फाटक बंद ठेवावे लागते. परिणामी, दोन्ही बाजून मोठया प्रमाणात वाहने अडकून होणारी प्रचंड वाहतूक कोंडी, त्यामुळे या ठिकाणी उड्डाणपूल व्हावा यासाठी कोकण रेल्वे अन्याय निवारण समिती अनेक वर्षांपासून सर्व संबंधितांकडे पत्रव्यवहार व पाठपुरावा करीत असताना शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, भविष्यात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी सदर उड्डाणपूलाची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना. "

---

**<u>मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचे निवेदन</u>**

दिनांक २३.०२.२०२५ रोजी प्रयागराज एक्सप्रेस हि रेल्वे गाडी रत्नागिरी जिल्ह्यातील कळंबस्ते येथील फाटक क्र.२० उघडे असताना तेथून रेल्वे गाडी निघून गेल्याच्या घटनेचा उल्लेख केलेला आहे. सदरील घटना हि दि.२२.०२.२०२५ रोजीची असून त्या संदर्भातील वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे -

दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी चिपळूण गेट नंबर २० येथील गेटमनला वंदेभारत ट्रेन पास होणार असल्याची सूचना मिळताच त्यांनी गेट बंद करण्याची प्रक्रिया केली. मात्र तांत्रिक अडचणी मुळे खाली आलेले गेट पूर्णत: लॉक झाले नाही. अशा स्थितीत गेट लॉक न झाल्यास गेट पासून २०० मीटर वर असलेले सिंग्नल कार्यान्वित होतात. याच पध्दतीने सिग्नल कार्यान्वित झाले आणि गेट पासून सु रक्षित अंतरावर वंदे भारत ट्रेन थांबली. यावेळी गेट बंद होते त्यामुळे गेटमनने नंतर पायलटिंग करत संथगतीने वंदेभारत ट्रेन पास केली. यानंतर या ठिकाणावरुन अप प्रयागराज एक्स्प्रेस आणि डाऊन मालगाडी मार्गस्थ झाली. यावेळी गेटमनने याठिकाणी पर्यायी व्यवस्था म्हणून असलेल्या स्लायडिंग बूमच्या सहाय्याने गेट बंद करुन या दोन ट्रेन येथून मार्गस्थ केल्या. दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६.४५ ते ७.०४ या वेळेत या गेट मधून तीन ट्रेन मार्गस्थ करण्यात आल्या. मात्र या सगळ्या ट्रेन्स अत्यंत सुरक्षितरित्या गेट बंद स्थितीत सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करुन मार्गस्थ झाल्या.

(कृमाप)

विषयांकित रेल्वे फाटक हे सार्वजनिक बांधकाम विभाग चिपळूण अंतर्गत देखभाल दुरुस्तीकरीता असणाऱ्या चिपळूण काडवली धामणंद पोसरे चोरवणे निवे रस्ता प्रजिमा-२२ च्या सा.क्र.कि.मी. ०/३९० मध्ये असून सदर रस्ता चिपळूण व खेड तालुक्याच्या हद्दीत येत आहे.

रेल्वे मार्गावर रेल्वे गाडी धावत असताना बंद रेल्वे फाटकामुळे फाटकाच्या दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी होते ही वस्तुस्थिती आहे. सबब, सदर ठिकाणी पूल बांधण्याचे काम हे प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------------------------------------------

लक्षवेधी सुचना क्रमांक ३०७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

डॉ.विनय विलासराव कोरे (सावकार), मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.३०७ पुढीलप्रमाणे आहे :-

"शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडे सलग तीस वर्षाहून अधिक काळ सेवा बजावलेल्या निवृत्त अन्न निरीक्षकांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दोन लाभ मिळणे आवश्यक असणे, मात्र काही अन्न निरीक्षक सातत्याने व सनदशीर मार्गाने पाठपुरावा करूनही या लाभापासून मागील ७ वर्षापासून वंचित असणे, याबाबत तत्कालीन विरोधी पक्ष नेत्यांनीही वित्त विभागाकडे व वित्त विभागाकडून वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी कळवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दोन लाभमिळणे पासून वंचित असणारे ४३ सेवानिवृत्त अन्न निरीक्षकांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, अशाप्रकारे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज व मागण्यांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

**मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन**

अन्न व औषध प्रशासनातून सेवानिवृत्त झालेल्या अन्न निरीक्षकांनी २०१९ व २०२० च्या दरम्यान सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळावा म्हणून प्रशासनास निवेदन सादर केली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०८.०६.१९९५ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकिय कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना दिनांक ०१.१०.१९९४ पासून लागू करण्यांत आलेली आहे. तद्नंतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करण्याबाबत वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१० अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपुर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात आलेली आहे. सदर योजना दिनांक ०१.१०.२००६ पासून अंमलात आणण्यात आलेली आहे.

अन्न व औषध प्रशासनातील ज्या अन्न निरीक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ दिनांक ०१.१०.१९९४ रोजी मंजूर करण्यात आला असेल, त्यांना दुसरा लाभ मंजूर करण्यासाठी पहिल्या लाभाच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा पुर्ण करणे म्हणजेच दिनांक ०१.१०.२००६ पर्यंत सेवा करणे अनिवार्य होते. मात्र अन्न व औषध प्रशासनातील ५२ अन्न निरीक्षक हे त्यांच्या पहिल्या लाभाच्या दिनांकापासून (दि.०१.१०.१९९४) त्यांची १२ वर्षाची सेवा पुर्ण होण्यापुर्वीच सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे सदर अन्न निरीक्षकांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा २४ वर्षानंतर देय असलेला दुसरा लाभ मंजूर करण्यात आलेला नाही. तथापि अन्न व औषध प्रशासनातील ज्या अन्न निरीक्षकांनी पहिल्या लाभाच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा दि.०१.१०.२००६ रोजी पुर्ण केली आहे, अशा ५३ अन्न निरीक्षकांना अन्न व औषध प्रशासनाच्या दिनांक ०६.१०.२०१८ च्या आदेशानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यांत आलेला आहे. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेकरीता अनुज्ञेय ठरत असलेल्या सर्व अन्न निरीक्षंकाना सदरील आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत आवश्यक कार्यवाही केलेली आहे.

*****

ROTA-H-147-1(800-6-2025)

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन**

श्री. राजेश उत्तमराव विटेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

**"मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचे पेन्शन अभावी उपासमार होणे, सहसंचालक, क्रीडा व युवा, पुणे यांनी ऑक्टोबर २०२४ दरम्यान याप्रकरणी उपसंचालक संभाजीनगर यांना अहवाल करण्याचे आदेश देऊनही कोणतीही सक्षम कारवाई न होणे, संभाजीनगर येथे कार्यरत असताना त्यांनी केलेल्या आठ कोटी ५० लक्ष रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई तसेच रत्नागिरी येथे येथून वसुलीसाठी आलेल्या व्यापाऱ्यास बोलावून मारहाण जवाहर नगर पोलीस स्टेशन संभाजीनगर येथे गुन्हा नोंद होणे, आर्थिक घोटाळे, अनिमित्तता केल्याने त्यांचे निलंबन झालेले असून त्यांच्या विभागीय चौकश्या सुरू असतानाही परभणी येथे त्यांना आकार्यकारी पदावर न नेमता मुख्य कार्यभार देण्यात येणे, जिल्हा नियोजन समितीने सण २०२३/ २४ व २४/ २५ दरम्यान मंजूर केलेल्या कामांना मंजुरी व इतर अनेक गैरप्रकार प्रकरणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सन २०२५ दरम्यान मुद्देनिहाय लेखी तक्रार नोंदवणे, गैरप्रकार व आर्थिक घोटाळे करून अधिकाऱ्यांना मंत्रालय स्तरावरून पाठीशी घालण्यात येणे , अश्याच प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी परभणी यांनी जानेवारी/फेब्रुवारी २०२५ दरम्यान मा.क्रीडामंत्री यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवणे परंतु अद्याप पर्यंत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यावर कोणतीही सक्षम कारवाई न होणे, परिणामी स्थानिक जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व नाराजीचे वातावरण यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना"**

---

मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे निवेदन

जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी कार्यालयातील कै.शैलेन्द्र गौतम, क्रीडा अधिकारी यांचे दि.१२/०३/२०२४ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या कुटूंबीयांस अनुज्ञेय असलेल्या (१) गट विमा निधी (२) गट विमा बचत निधी (३) रजा रोखीकरण (४) भविष्य निर्वाह निधी (५) सहा महिन्याचे तात्पुरते कुटुंब निवृत्ती वेतन (६) ७ व्या वेतन आयोगाचा ५ वा हप्ता अशी एकुण रु.४२,६५,६४४/- इतकी रक्कम दि.२३.१०.२०२४ पर्यंत अदा करण्यात आली आहे.

कै. शैलेन्द्र गौतम, क्रीडा अधिकारी यांच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्ती वेतन अदा करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी कार्यालयाकडून सुरु आहे.

श्रीमती कविता नावंदे या जिल्हा क्रीडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर या पदावर कार्यरत असतांना त्यांचेविरूद्ध प्राप्त तक्रारींची प्राथमिक चौकशी करण्याकरीता क्रीडा संचालनालयाचे स्तरावर प्राथमिक चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने प्राथमिक चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर केला होता. सदर प्राथमिक चौकशी अहवालाआधारे शासनाने दि. २४ जून, २०२२ रोजी श्रीमती कविता नावंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी यांना तात्काळ प्रभावाने निलंबित केले व दि.१६ सप्टेंबर, २०२२ रोजी श्रीमती कविता नावंदे यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करिता दोषारोपपत्र बजावण्यात आलेली आहेत. सदर प्रकरणी विभागीय चौकशी सुरु आहे.

दि. २४ जानेवारी, २०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये श्रीमती कविता नावंदे यांना त्यांच्या विरुध्द प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून शासन सेवेत जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी या रिक्त पदावर शासन स्तरावरुन पुनःस्थापित करण्यात आले आहे. तथापि, जिल्हा क्रीडा अधिकारी या संवर्गातील अकार्यकारी पद रिक्त नसल्यामुळे श्रीमती कविता नावंदे यांना जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

श्रीमती कविता नावंदे यांचेविरूद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सूरू असून याबाबतचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर उचित निर्णय घेण्याचे प्रयोजित आहे.

श्रीमती कविता नावंदे यांचे विरुध्द स्थानिक लोकप्रतिनिधी, परभणी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडून अहवाल मागविला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

.....................................

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १९६२

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. सुभाष देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील अंगणवाडी सेविकांना मानधन वाढ, पेन्शन, ग्रॅज्युएटी मिळावी या मागणीसाठी सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यालयासमोर आंदोलन करित आपल्या मागण्यांसाठी मोर्चे आयोजित करण्यात आला असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२४ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले असणे, अंगणवाडी सेविकांनी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने उपाययोजना करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

## मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यात १०४ नागरी प्रकल्प व ४४९ ग्रामीण प्रकल्प असे एकूण ५५३ प्रकल्प कार्यान्वित असून त्याअंतर्गत अंगणवाडी सेविका यांची - ११०६६९, अंगणवाडी मदतनीस यांची - ११०६६९ अशी एकूण २२१३३८ एवढी पदे मंजूर असून सदर पदे मानधनी तत्वावरील आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनाकरिता केंद्र व राज्य हिस्सा याचे निधीचे प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र व त्यास समरूप राज्य हिश्या व्यतिरिक्त राज्य शासनाकडून अतिरिक्त राज्य हिश्यामधून देखील मानधन अदा करण्यात येते.

अंगणवाडी कर्मचा-यांकडून त्यांच्या विविध मागण्यासंदर्भात सातत्याने मागण्या करण्यात येत असतात. त्यानुषंगाने अंगणवाडी कर्मचारी संघटनेसमवेत वेळोवेळी बैठक आयोजित करून कार्यवाही करण्यात येते. अंगणवाडी कर्मचा-यांचे मानधन नियमितपणे अदा करण्यात येत आहे.

शासन निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर,२०२४ अन्वये अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनामध्ये दिनांक १ ऑक्टोबर,२०२४ पासून अनुक्रमे रुपये ३००० व रुपये २००० याप्रमाणे वाढ करण्यात आली आहे. याशिवाय प्रोत्साहन भत्ता देखील लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच अंगणवाडी कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेनुसार अनुज्ञेय असलेली मानधनवाढ कायम ठेवण्यात आली आहे.

********************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १०६७**

**सर्वश्री. मोहन मते,राजेंद्र गावित, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना :-**

"ठाणे जिल्ह्यातील जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागातील वाडा उपविभांगांतर्गत खैर गावातील पडवलेपाडा ते छिंडेपाडा व तरेपाडा या रस्त्यांची प्रत्यक्षात कामे न करताच बनावट देयके सादर करून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करण्यात आला असल्याची धक्कादायक बाब दि. २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधीत उपविभागातील अधिकाऱ्यांनी अशाच प्रकारे अनेक रस्त्यांची प्रत्यक्षात कामे न करताच देयके काढली असल्याची निर्माण झालेली शक्यता, यासाठी संबंधीत विभागाचे अधिकारी आणि ठेकेदारांची झालेली अभद्र युती, त्यामुळे या सर्व कामांची दक्षता व गुणनियंत्रक विभागाकडून सखोल तपासणी करण्याची असलेली नितांत आवश्यकता, संबंधीत विभागाने सन २०१० ते २०२१ या कालावधीत प्रत्यक्षात केलेल्या विविध कामांची आणि अदा करण्यात आलेल्या देयकांची सखोल चौकशी करण्याची सामाजिक संघटनांनी वेळोवेळी केलेली आग्रही मागणी, परंतु सदरहू मागणीकडे शासनाकडून करण्यात आलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक जनतेत शासनाप्रति निर्माण झालेली नाराजीची भावना, यास्तव ठाणे जिल्ह्यातील जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागातील वाडा उपविभांगांतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या विविध कामांची सखोल चौकशी करून संबंधीत अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

### मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

पालघर जिल्हयातील खैरे पडवलेपाडा ते धिंडेपाडा रस्ता तयार करणे या कामास आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रस्ते बांधकामांना रक्कम रु.१० लक्ष करिता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरचे कामाकरिता दि.११.१०.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आला आहे. सदरचे काम अद्याप सुरु झाले नसल्याने कंत्राटदारास देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

खैरे ते तरेपाडा हा अवर्गीकृत रस्ता असून सद्य:स्थितीत या रस्त्यावर काम मंजूर नाही.

सन २०१० ते २०२१ या कालावधीतील कामांचे बाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रायगड यांचे अध्यक्षतेखाली सात सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. समितीचा प्राथमिक चौकशी अहवाल प्राप्त झाला असून, यासंदर्भात संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे. सविस्तर चौकशी अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

***********

## सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

### मा.श्री.हेमंत ओगले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१११ पुढील प्रमाणे आहे:-

"हरेगाव ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर येथे दि. १६ डिसेंबर १९३९ रोजी जुडीच्या बंधनाने (शेतीसाठी आकारण्यात आलेला कर) त्रस्त बारा बलुतेदारांची भव्य आंतरराज्य परिषद भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेली असणे, त्या परिषदेत स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिलेला आहे, जो राजकीय स्वातंत्र्याप्रमाणेच सामाजिक स्वातंत्र्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असणे, या ठिकाणी स्वाभिमान घोषणेच्या ७० व्या वर्षापासून म्हणजेच २००९ पासून दरवर्षी स्वाभिमान परिषद भरत असणे, हे क्षेत्र येवला येथील मुक्तीभूमी, भीमा-कोरेगावची शौर्यभूमी, महाडची क्रांतीभूमी,, मुंबईची चैत्यभूमी, नागपूरची दीक्षाभूमी इतकेच महत्त्वाचे असूनही आजपर्यंत दुर्लक्षित राहिलेले असणे, परिणामी येथील नागरीकांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे हरेगावचे असलेले महत्त्व लक्षात घेऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मृतीस्थळ, मागासवर्गीय मुला-मुलींचे वसतिगृह, स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिका आणि मुक्तीभूमीच्या धर्तीवर बुद्धविहार आणि विपश्यना इमारत, वाचनालय आणि इतर विकासकामे होण्याबाबत शासनाकडून तात्काळ कार्यवाहीची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन:-

शासन निर्णय दि. ९ ऑक्टोबर, २०१५ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्षे (दिनांक १४ एप्रिल, २०१५ ते दिनांक १४ एप्रिल, २०१६) हे समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यास व त्या अनुषंगाने या वर्षामध्ये विशिष्ट कार्यक्रम/ उपक्रम हाती घेण्यास मान्यता प्रदान केली आहे. शासन निर्णय दि. १२ ऑक्टोबर, २०१७ अन्वये सदर योजनेची कार्यपध्दती निश्चित करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनाशी निगडीत असलेली घटनास्थळे व महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन स्थळांचा विकास करणे या बाबी अंतर्गत राज्यात विविध प्रकल्प राबविण्यात आलेले आहेत.

विभागाच्या दि.२२.२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मौजे, हरेगांव ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक बांधकामाकरीता रू. ९५,०६,०००/- इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर स्मारकाची गट क्रमांक ३ मधील जागा महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित यांचे नांवे असून ती जागा बेलापूर शुगर मिल्स लिमिटेड कंपनी यांना शासनाने करारनाम्याने दिलेली होती. सदर जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक बांधकामास बेलापूर शुगर मिल्स लिमिटेड कंपनी यांनी दिनांक १२.५.१९८२ नुसार (NO OBJECTION CERTIFICATE) हरकत नसलेबाबत प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यानुसार नमुना नं. ८ उतारा मालकाचे नांव हरेगांव ग्रामपंचायत, ता. श्रीरामपूर या नावाने उतारा सादर करण्यात आलेला आहे.

मौजे, हरेगांव येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक बांधकाम जागा ही शेती महामंडळ मर्यादित महाराष्ट्र शासन यांच्या नावे असल्याने सार्वजनिक बांधकाम

विभाग, संगमनेर यांनी सदर जागा मौजे हरेगांव ग्रामपंचायतीच्या नावाने नसल्याने सदर बांधकाम करण्यास नकार दिला होता. सहायक आयुक्त, समाजकल्याण, अहिल्यानगर यांचेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक बांधकामाची जागा मौजे हरेगाव ग्रामपंचायतीच्या नावावर करणेसाठी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दि. २१ जानेवारी, २०२२ च्या नाहरकत प्रमाणपत्रानुसार सदर बांधकाम सन २०२१-२२ मध्ये सुरु केले ते दि.२७.३.२०२३ रोजी पुर्ण करण्यात येऊन दिनांक ३०.३.२०२३ रोजी इमारत ग्रामपंचायत हरेगाव, ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

तसेच मौजे शिरसगाव रोड, हरेगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, या नावाने ७५ विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वसतिगृह, सन १९८० पासून सुरु आहे. प्रत्येक वर्षी गुणवतेनुसार सदर शासकीय वस्तीगृहामध्ये ७२ विद्यार्थी प्रवेशीत आहेत. प्रवेशीत विद्यार्थी यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा, पुस्तके, निर्वाह भत्ता, इ. सोई सुविधा मोफत पुरविल्या जातात.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मृतीस्थळ, मागासवर्गीय मुला-मुलींचे वसतिगृह, स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिका, आणि मुक्तीभूमीच्या धर्तीवर बुद्धविहार आणि विपश्यना इमारत, वाचनालय आणि इतर विकासकामे होण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन धोरणानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

गृह (परिवहन) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.७२६

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा.श्री.भास्कर जाधव,श्री.सुनिल प्रभू, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७२६ खालीलप्रमाणे आहे.:-

"महाराष्ट्र एसटी महामंडळाच्या चालकास कानडी भाषा येत नसल्याच्या कारणावरून कर्नाटकातील चित्रदुर्ग येथे जबर मारहाण झाल्याची घटनादि.२१ फेब्रुवारी २०२५ रोजी घडणे, कन्नड संघटनाच्या मराठी द्वेषातून सदर घटना घडल्याचे समोर येणे, त्यावरून कोल्हापूर, पुणेसह राज्यात ठीकठिकाणी एसटी कर्मचारी व राजकीय, सामाजिक संघटनांनी केलेली निदर्शने, एस.टी चालक आणि वाहकांनी सुरक्षा दिली तरच कर्नाटकात बस घेऊन जाण्याची घेतलेली भूमिका, तथापि या घटनेचे मूळ अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या महाराष्ट्र कर्नाटक सीमावादात असणे, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्ष होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांच्यावर केले जाणारे अत्याचार, त्यांच्या जीविताचा निर्माण झालेला प्रश्न, मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे केलेला लाठीमार, त्यांची आंदोलने चिरडण्याचा सातत्याने केलेला प्रयत्न, महाराष्ट्रातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करुन त्यांचे भूखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे, मराठी शाळा आणि साहित्य संस्था बंद करणे यासारख्या कारवाया याबाबत डिसेंबर २०२२ मध्ये विधानसभेत ठराव होऊनही त्यांची अंमलबजावणी न होणे, केंद्र व राज्य सरकार या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची सीमा भागातील मराठी भाषिकांची झालेली भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### निवेदन

{श्री.प्रताप सरनाईक,मा.मंत्री (परिवहन)}

दिनांक २१.०२.२०२५ रोजी रात्री २१.१० दरम्यान रा.प. मुंबई आगाराची बस क्रमांक-MH-१४-KQ-७७१४ बेंगलोर ते मुंबई येत असतांना सदर बसवर रा.प. कोल्हापुर आगाराचे श्री.भास्कर हरी जाधव चालक क्र.१५९७४ व श्री.प्रशांत तुकाराम थोरात वाहक क्र.३५१२५ हे कर्तव्य करीत होते. सदर बस चित्रदुर्ग (कर्नाटक) शहराच्या पाठीमागे दोन कि.मी. अंतरावर आली असता कन्नड रक्षण वेदिका या संघटनेचे कार्यकर्ते तीन-चार गाड्यांमधुन आले व बसच्या पुढे गाडया लावुन बस थांबवल्या नंतर चालक श्री.जाधव यांना बसमधुन खाली उतरुन मारहाण करुन तोंडाला काळे फासले तसेच बसच्या पुढील बाजुस बॉडीवर काळे फासुन कन्नड मध्ये घोषणा देत निघुन गेले.

त्यानंतर रा.प.बस वरील काळा रंग पुसुन काढला व सदर घटनेची माहिती चित्रदुर्ग ग्रामीण पोलीस स्थानकास दिली व घटनेचा एफ.आय.आर चालक श्री.जाधव यांनी नोंदविला आहे. चित्रदुर्ग पोलीस यांनी संबंधितांवर गुन्हे दाखल करुन अटक केली आहे. सदर घटनेची मा.जिल्हाधिकारी चित्रदुर्ग व पोलीस अधिक्षक चित्रदुर्ग यांचेशी संपर्क साधुन चालक-वाहक व प्रवासी यांस संरक्षण व सहकार्य करणेस सांगितले व त्यानुसार प्रशासनाने सहकार्य केले. मा.परिवहन मंत्री व मध्यवर्ती कार्यालयामार्फत प्रवासी वर्गाच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव महाराष्ट्र राज्यातुन कर्नाटक राज्यात जाणारी वाहतुक थांबविणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. परंतू, दि.२८.०२.२०२५ पासुन दोन्ही राज्यातील आंतरराज्य वाहतूक पुर्वीप्रमाणे सुरु झाली आहे.

*****

गृह विभाग / परि-२ लक्षवेधी सूचना क्रमांक - १०६५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. शिरीषकुमार नाईक, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०६५ पुढीलप्रमाणे आहे :-

"नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर व गव्हाणी ता. अक्कलकुवा येथे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे वाहन तपासणी नाका कार्यान्वीत असणे, या तपासणी नाक्यांवर गेल्या अनेक वर्षांपासून वाहन चालकाकडून अवैध खाजगी व्यक्तींकडून तसेच वजनकाटा चालकांकडून तपासणी करुन न घेता रितसर शासनाची पावती न देता अनधीकृतपणे वसूली होत असणे. यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडणे. नवापूर येथील सीमा तपासणी नाका, बेडकी येथे रोज हजारो वाहनांची ये-जा होत असतांना देखील याव्दारे वसूल होणारा महाराष्ट्र राज्याचा महसूल हा गुजरात, मध्यप्रदेश शासनाच्या तुलनेत सदर नाक्यांवर होणाऱ्या अवैध वसूलीमुळे अत्यंत कमी असणे. सीमा तपासणी नाका, बेडकी येथे नेमण्यात आलेले अनधीकृत तसेच वाहन निरीक्षक कार्यालयात पावती देण्यासाठी बसविण्यात आलेले अवैध कारकुन यांच्यामुळे शासनाच्या महसूलावर परिणाम होत असणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

निवेदन

महाराष्ट्र राज्यात परराज्यातून येणाऱ्या वाहनांना कर भरता यावा, परवाना घेता यावा तसेच मोटार वाहन कायद्यातील तरतूदींचे पालन करण्याकरीता, प्रामुख्याने ओव्हरलोड वाहतूकीवर कारवाई व्हावी यासाठी सीमा तपासणी नाके स्थापन करण्यात आले. राज्यांतर्गत यंत्रणा फारशी पुरेशी नसल्याने व परराज्यातून या राज्यात येणाऱ्या वाहनांची तपासणी प्रभावीपणे व्हावी यासाठी सीमा तपासणी नाके सुरु करण्यात आले आहेत. महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लिमीटेड या कंपनीद्वारे नवापूर व गवाली येथे अत्याधुनिक सीमा तपासणी नाके, उभारण्यात आलेले असून येथील पायाभूत सुविधांचे संपूर्ण संचलन, देखभाल व दुरुस्ती या कंपनीद्वारे केली जाते.

महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लिमीटेड या कंपनीचे कर्मचारी हे चोवीस तास सिमा तपासणी नाका येथे कार्यरत असतात येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांचे वजन करण्यासाठी पुर्णत:

संगणकीकृत वजनकाटे येथे बसविण्यात आलेले आहेत. मालवाहतूक वाहनांना वजन काट्याकडे मार्गस्थ करणे, वाहनांचे वजन करणे इत्यादी काम करण्यासाठी सद्भाव कंपनीच्या मार्फत लेन मार्शल, लेन मॅनेजर, टोल कलेक्टर, सुरक्षा रक्षक इलेक्ट्रीशियन,सफाई कामगार कॅम्पुटर इंजिनीअर इत्यादी प्रकारच्या व्यक्तींची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सीमा तपासणी नाका, नवापूर व गवाली येथील संपूणे परिसरात कंपनीद्वारे मोठ्या प्रमाणात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असून मोटार वाहन विभागाचे अधिकारी पूर्णवेळ सीसीटीव्हीच्या कक्षेत काम करीत असतात.

नाक्यावर येणाऱ्या प्रत्येक वाहनांची ऑनलाईन पध्दतीने नोंद घेतली जाते तसेच शासकीय महसूल उदिष्ट पूर्तीसाठी मालवाहतूक वाहनांची पूर्णपणे तपासणी शासकीय अधिकारी यांच्यामार्फत केली जाते व दोषी वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करून शासकीय नियमानुसार तडजोड शुल्क व कर वसूलीचे कामकाज केले जाते.तसेच वसूल करण्यात आलेल्या दंडाची पावती ही वाहनधारकांना तात्काळ दिली जाते.

सीमा तपासणी नाका येथे सेवा पुरवठादार कंपनीच्या कर्मचाऱ्यामार्फत मालवाहतूक वाहनांच्या सकल भार क्षमतेपेक्षा पाच टक्केच्या वर वजन आले तर कंपनीच्या ऑनलाईन सिस्टीममध्ये ते वाहन ओव्हरलोड म्हणून गृहीत धरले जाते व त्यानंतर सदर वाहन कंपनीच्या कर्मचाऱ्यांमार्फत मोटार वाहन निरीक्षक यांच्याकडे ओव्हरलोडचा दंड आकारण्याकरीता हस्तांतरीत करण्यात येते.

सीमा तपासणी नाका, नवापूर येथे वाहनांची नियमीतपणे तपासणी करण्यात येत असून दोषी वाहनधारकांकडून करण्यात आलेली वसूली खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | एकुण वसूली | कार्यवाही केलेली वाहनसंख्या |
|---|---|---|
| २०२१-२२ | ७१६.२३ लक्ष | ३३८४७ |
| २०२२-२३ | १४१६.६० लक्ष | ४९२३० |
| २०२३-२४ | १६७३.७४ लक्ष | ५७१३८ |
| दि. ०१.०४.२०२४ ते दि. २८.०२.२०२५ | १०७८.१० लक्ष | ६८८८५ |

तसेच सीमा तपासणी नाका, गवाली येथे दोषी वाहनधारकांकडून करण्यात आलेली वसूली खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | एकुण वसूली | कार्यवाही केलेली वाहनसंख्या |
|---|---|---|
| २०२१-२२ | ३०८.१७ लक्ष | १९३४८ |
| २०२२-२३ | ५४१.२५ लक्ष | २३१५१ |
| २०२३-२४ | ४८४.६४ लक्ष | १६०८९ |
| दि. ०१.०४.२०२४ ते दि. २८.०२.२०२५ | ३००.७४ लक्ष | १२३४० |

प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार तसेच सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार यांच्या मार्फत सिमा तपासणी नाका येथे वेळोवेळी प्रत्यक्ष भेट देण्यात येते व भेट देऊन कामकाजाचा आढावा घेण्यात येतो.

**************

गृह (परिवहन) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.२२१६

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**मा.श्री.शिवाजी पाटील, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२१६ खालीलप्रमाणे आहे.:-**

**"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड, गडहिंग्लज, आजरा या तालूक्यांमध्ये महाराष्ट्र परिवहन महामंडळच्या बसेसची कमतरता असणे, चंदगड, गडहिंग्लज, आजरा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वाड्या वस्ती असणे, या वाड्यावस्ती आणि गावांना जोडणारे रस्ते हे डोंगर झाडीतून जात असून कामासाठी, दवाखान्यासाठी, शाळेत जाण्यासाठी, बाजारात, जाण्यासाठी, प्राथमिक सुविधांसाठी दळणवळण करण्यासाठी बसेस नसणे, हा भाग डोंगराळ आणि जंगलाने व्यापलेला असून या रस्त्यावर जंगली प्राण्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असल्यामुळे येथील नागरिकांनाा फिरणे मुश्किल होणे, शाळेला जाणारे विद्यार्थी आणि शेतावर जाणाऱ्या लोकांनाही कुठलीही दळणवळणाची व्यवस्था नसल्यामुळे एसटी वरच अवलंबून राहावे लागणे, एसटी बसेस नसल्याने या सर्वांना ५/७ किलोमीटर आपला जीव मुठीत धरून पायपीट करावी लागत असल्याने चंदगड, गडहिंग्लज, आजरा एसटी आगारात बसेस कमी असून आगार चालवणे कठीण होणे, सन २०१९ पासून ज्या बसेस बंद पडल्या त्यानंतर बसेस या डेपोला अगदी तुटपुंज्या मिळाल्या असणे, चालक व वाहक कमी असून मार्गावर बसेस फिरवने कठीण होणे, एसटी बसेस नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, यामुळे शासनाने चंदगड, गडहिंग्लज, आजरा तालुक्यांसाठी ६० नवीन बसेस उपलब्ध करून विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.**

## निवेदन

**{श्री.प्रताप सरनाईक, मा.मंत्री}**

चंदगड,गडहिंग्लज व आजरा हे तालुके वाड्यावस्त्या,डोंगराळ व जंगलव्याप्त असणारे तालुके आहेत. या आगार क्षेत्रात येणाऱ्या सर्व शाळा व महाविद्यालये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जाणे-येण्याची सोय महामंडळामार्फत करणेत आलेली आहे. तसेच जास्तीत-जास्त गावांना व वाड्या-वस्त्यांना किमान फेऱ्या देण्यात आलेल्या आहेत.

चंदगड,गडहिंग्लज, आजरा आगारात सद्य स्थितीमध्ये चालनात असलेली नियते व त्याकरीता उपलब्ध असलेली वाहने तीनही आगारात चालनातील नियतांकरीता पुरेसि वाहने उपलब्ध असल्याने बसेसची कमतरता नाही.

रा.प.कोल्हापूर विभागातील ६३४ चालनिय नियतानुसार १४ अतिरिक्त चालक व वाहक आहेत. चंदगड, गडहिंग्लज व आजरा या आगारामध्ये सदर अतिरिक्त चालक व वाहकांचे उचित समायोजन करण्याबाबत विभाग नियंत्रक, रा.प.कोल्हापूर विभाग यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सरळसेवा भरती सन २०१९ मधील अतिरिक्त निवड यादीवरील पुणे विभागातील २० उमेदवार नेमणूकीसाठी रा.प कोल्हापूर विभागात वर्ग करण्यात आलेले आहेत.

गडहिंग्लज,चंदगड व आजरा आगरास चालनिय नियताकरीता आवश्यकतेनुसार बसेस उपलब्ध आहेत. वाहकांना अतिकालीन भत्ता अदा करुन तसेच दुहेरी कामगिरीचे नियोजन करुन दैनंदिन चालनीय कि.मी.पुर्ण केले जातात.

वाहन स्थिती उत्तम ठेवण्याकरीता महामंडळाच्या विविध स्तरांवरील कार्यशाळांमध्ये प्रत्येक वाहनाची विविध प्रकारची नियमित देखभाल केली जाते. यामध्ये दैनंदिन देखभाल, दशदिनी देखभाल, डेपो डॉकिंग, आरटीओ पासिंग व पुन:स्थितीकरण यांचा समावेश आहे.

आजरा,गडहिंग्लज व चंदगड आगार कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावातील सरपंच, शाळा व महाविद्यालय, लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीप्रमाणे बहुतांश फेऱ्या चालनात आणलेल्या आहेत.

रा.प.महामंडळाच्या ताफ्यात स्व-मालकीच्या २६४० बसेस दाखल होत आहेत. या प्रकल्पातील बसेस आगामी कालावधीत टप्या-टप्याने उपलब्ध होणार आहेत. बसेस उपलब्ध झाल्यावर आजरा,गडहिंग्लज व चंदगड आगारांना प्राधान्याने बसेस वाटप करण्याचे नियोजन आहे.

****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्र. ४२२

**श्री. भास्कर जाधव, मा.विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४२२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटात रस्त्याच्या संरक्षणासाठी नव्याने बांधण्यात आलेली 200 मीटरची संरक्षक भिंत पहिल्याच पावसात भरावासह कोसळल्याची घटना दि. 21 जून 2024 रोजी घडणे, परिणामी मुख्य रस्त्यालाही तडे जावून वाहतुकीला निर्माण झालेला धोका, घाटाच्या पायथ्याशी असलेल्या पेढे, ता. चिपळूण या गावातील रहिवाशांच्या जिविताचा निर्माण झालेला प्रश्न, तीन-चार वर्षात सातत्याने दरडी व मोठमोठे दगड खाली येवून घडलेल्या दुर्घटनांमुळे त्यांच्यावर जीव मुठीत धरून राहण्याची आलेली वेळ, प्रत्यक्ष पाहणीनंतर बांधण्यात आलेली संरक्षक भिंत अत्यंत तकलादू आणि त्यामध्ये मातीचा भराव करून पृष्ठभागावर दगड लावण्यात आल्याचे समोर येणे, अत्यंत निकृष्ट दर्जाच्या केलेल्या कामामुळे सदर घटना घडल्याचे स्पष्ट होणे, घाटात दरवर्षी दुर्घटना घडूनही ठेकेदार कंपनीसह संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न होणे, चुकीच्या उत्खननामुळे परशुराम गावातील लोकवस्तीला निर्माण झालेल्या धोक्याबाबत अदयाप कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे पेढे व परशुराम दोन्ही गावांतील नागरिकांत असलेली संतापाची भावना, गेल्या 12-13 वर्षांपासून रखडलेल्या महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाकडून देण्यात आलेली खोटी आश्वासने, रखडलेल्या कामामुळे अपघात होवून हजारो निष्पाप नागरिकांचे नाहक गेलेले प्राण, या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी होवून संबंधितांवर कठोर कारवाईची होणारी मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**<u>मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.</u>**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ची महाराष्ट्र राज्यातील कि.मी. ०/००० (पळस्पे) ते कि.मी. ४७१/३०० (पात्रादेवी) अशी एकूण ४७१.३०० कि.मी. लांबी आहे. सदर लांबीपैकी कि.मी. ००/००० (पळस्पे) ते कि.मी. ८४/००० (इंदापूर) या ८४ कि.मी. या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. तसेच इंदापूर (किमी ८४/०००) ते झाराप (किमी ४५०/१७०) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीत आहे.

कि.मी. १६१/ ६०० (कशेडी) ते कि.मी. २०५/४०० (परशुराम घाट) या ४२.४३८ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम हायब्रीड ॲन्युईटी (HAM) तत्वावर माहे जुलै २०१६ मध्ये मे. कल्याण टोलवेज यांना देण्यात आलेले आहे. सदर कामावर देखरेख करणे, तांत्रिक बाबी तपासणे व देयके अदा करणे इत्यादी कामे करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय ( MoRTH) मार्फत मे. ब्लुम कंपनी यांची स्वतंत्र अभियंता म्हणून नियुक्ती केलेली आहे.

परशुराम घाटातील डोंगर भागातील माती ही दगड मिश्रीत असल्यामुळे तिचा धर कमी आहे. सदर ठिकाणी गावे वसलेली असल्यामुळे ब्लास्टींग करुन रस्त्यासाठी खोदकाम करता येणे शक्य नसल्याने या घाटामध्ये वाहतूक बंद ठेवून डोंगर भागात सुरक्षितपणे रस्त्याचे काम करण्यात आले आहे.

[क्रमशः

कोकण विभागामध्ये मान्सून कालावधीमध्ये सर्व साधारणपणे सुमारे ४००० ते ४५०० मि.मी. एकूण पाऊस पडतो. सदर महामार्ग घाट मार्गातून असल्याने पावसाळ्यादरम्यान अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्याच्या व नैसर्गिक आपत्ती येण्याच्या घटना वारंवार घडत असतात.

दिनांक २२ जुलै व २३ जुलै ,२०२१ रोजी चिपळूण तालुक्यात आलेल्या महापुराच्या वेळी परशुराम घाटामध्ये अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे घाटाच्या दरीकडील भागामध्ये असलेल्या पेढे- कुंभारवाडी येथील घरांवर दरड कोसळून ३ जणांचा दुर्दैवी मृत्यु झाला होता. यामध्ये पेढे गावातील काही घरांचे नुकसान देखील झाले होते. यानंतर पूरहानी दुरुस्तीच्या माध्यमातून दरड कोसळलेल्या ठिकाणी संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे. माहे जुलै २०२१ नंतर परशुराम घाटातील काही भागात छोट्या मोठ्या प्रमाणात दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. परंतु त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या घरांना कुठलेही नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच महामार्ग देखील वाहतूकीसाठी त्वरित खुला करण्यात आला आहे.

दिनांक २१ जून, २०२४ रोजी परशुराम घाटामध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे व भुस्खलनामुळे दरीकडील बाजूस बांधण्यात आलेल्या लांबी पैकी सुमारे ४० मी. लांबीतील संरक्षक भिंत कोसळली. तहसील कार्यालय, चिपळूण येथील अभिलेखानुसार सदर दिवशी या घाट परिसरात सुमारे १४० मि.मी. पाऊस पडल्याची नोंद आहे. या अतिवृष्टीमुळे पावसाच्या पाण्याच्या निचरा संरक्षक भिंतीमध्ये देण्यात आलेल्या वीप होल्स मधून न झाल्याने पाण्याच्या अतिरिक्त दाबामुळे संरक्षक भिंत कोसळल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे.

त्यानंतर दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी परशुराम घाटात झालेल्या सततच्या पावसामुळे आणि भूस्खलनामुळे सुमारे ३० मीटर लांबीतील संरक्षक भिंत कोसळली. सदर दोन्ही कोसळलेल्या संरक्षक भिंती नव्याने बांधण्याचे काम संबंधित चौपदरीकरणाचे कंत्राटदार मे. कल्याण टोलवेज यांचे मार्फत सुरु करण्यात आले आहे. सदर काम HAM तत्वावर असल्याने करारनाम्यानुसार कामाची देखभाल दुरुस्ती १५ वर्षांसाठी कंत्राटदारामार्फत करण्यात येते. त्यामुळे नव्याने करण्यात येणाऱ्या कामासाठी करारनाम्यानुसार कोणताही अतिरीक्त देयक कंत्राटदारास अदा करण्यात येत नाही. करारनाम्यातील तरतुदीनुसार संरक्षक भिंतीची संकल्पचित्रे कंत्राटदारामार्फत तयार करण्यात आली असून या प्रकल्पासाठी नियुक्त स्वंतत्र अभियंता मे. ब्लुम कंपनी यांचेमार्फत तपासण्यात आलेली आहेत.

परशुराम घाटातील दरडप्रवण क्षेत्रातील दरड कोसळण्याच्या प्रसंगांना आळा घालण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनामार्फत टेहरी हायड्रो डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या संस्थेकडून सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून त्याचा डीपीआर तयार करण्यात आला आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सदर काम प्रगतीत आहे. सदर काम पूर्ण झाल्यावर परशुराम घाटभागातील दरड कोसळण्याचे प्रमाण कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचे मार्फत प्रगतीपथावर असलेल्या ८४ कि.मी. लांबीपैकी सद्यस्थितीत ७४.८०० कि.मी. लांबीतील कॉक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम डिसेंबर- २०२५ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीत असलेल्या एकूण ३५५.२८० कि.मी. लांबीपैकी ३२४.६५० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित लांबीतील चौपदरीकरणाचे काम मोठे पुल/उड्डाणपूल वगळता जून-२०२५ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन असून बायपास व उड्डाणपूलांसहित रस्त्याचे काम जानेवारी-२०२६ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. चौपदरीकरणानंतर अपघाताचे प्रमाण कमी झाल्याचे आढळून आले आहे.

***********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक २१३९

**मा.श्री. संदिप क्षीरसागर, विधानसभा सदस्य यांच्या लक्षवेधी सूचना क्र. २१३९ वरील निवेदन सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री सभागृहासमोर ठेवतील :-**

" बीड विधानसभा मतदार संघामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाची विकास कामे चालु असणे. 1) खर्डा-पाचंग्री-साळेगाव-अंबाजोगाई-परळी रोडवरील लघु पुलाचे बांधकाम करणे एस.एच.६४ कि.मी. १६/४०० ता.जि. बीड 2) खर्डा-पाचंग्री-साळेगाव-अंबाजोगाई-परळी रोडवरील लघु पुलाचे बांधकाम करणे एस.एच.६४ कि.मी. १७/२०० ता.जि. बीड. 3) नवीन व्हिव्हीआयपी रेस्ट हाऊस बांधकाम करणे. 4) शासकीय आयटीआय, बीड संरक्षण भिंत तथा इतर कामे करणे. 5) संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह इमारत बांधकाम करणे. 6) एमएसएच.१६ रायमोहा-खालापुरी-साक्षाळप्रिंपी-सिरसमार्ग रोड एमडीआर.१८ कि.मी. १५/०० ते २५/५०० ता. शिरुर का.जि.बीड रस्ता सुधारणा करणे. 7) एसएच-२११ पालवण-नागझरी-भायाळा-वैद्यकिन्ही-वैजाळा-पाचेगाव-पाचंग्री रस्ता एमडीआर ३१ कि.मी.२०/०० ते २२/०० रस्ता सुधारणा करणे ता.जि. बीड ही विकास कामे बीड विधानसभा मतदार संघाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाची असणे, कंत्राटाराच्या चुकीच्या पध्दतीमुळे अथवा निकृष्ट कामामुळे सदरील कामामध्ये दिरंगाई होत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त असणे व त्यानुसार संबंधित अधिका-यांकडे रितसर पत्र व्यवहार केलेला असणे, सदर कामांच्या बाबतीत ज्या तक्रारी आहेत त्या तक्रारीचे निरसण करण्याच्या बाबतीत त्रयस्त समितीच्या मार्फत तथा गुण नियंत्रण विभागाच्या वतीने स्तरनिहाय चौकशी करण्याची मागणी होणे, चौकशी होईपर्यंत सदरील कामाचे देयके देण्यात येवू नयेत अशी स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी असणे, त्यावर शासनाची प्रतिक्रिया ."

---

**मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

खर्डा-चौसाळा-साळेगांव-अंबाजोगाई-परळी रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे रामा-६४ कि.मी. १६/४००, प्रस्तुत कामास दि. २०.०९.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहे. या कामाचा पुर्णत्व कालावधी १२ महिने असुन, सदर काम कंत्राटदारातर्फे निविदा शर्ती प्रमाणे व मानकाप्रमाणे विहीत मुदतीत पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामासाठी वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्याचे आवश्यक चाचणी निष्कर्ष घेण्यात आलेले असून या कामासाठी योग्य गुणवत्ता असलेले बांधकाम साहित्य वापरण्यात आलेले आहे. तसेच कामासंबंधी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, छ.संभाजीनगर यांच्या पाहणी निरीक्षण ज्ञापनामधील मुद्यांचे अनुपालनही करण्यात आले आहे. सदर काम विहित वेळेमध्ये पूर्ण झाल्यामुळे दिरंगाईचा प्रश्न उद्भवत नाही.

खर्डा-पाचंग्री-साळेगांव-अंबाजोगाई-परळी रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे रामा-६४ कि.मी. १७/२००, प्रस्तुत कामास दि. १५.१२.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहे. या कामाचा पुर्णत्व कालावधी १२ महिने असुन, सदर काम कंत्राटदारातर्फे निविदा शर्ती प्रमाणे व मानकाप्रमाणे विहीत मुदतीत पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामासाठी वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्याचे आवश्यक चाचणी निष्कर्ष घेण्यात आलेले असून या कामासाठी योग्य गुणवत्ता असलेले बांधकाम साहित्य वापरण्यात आलेले आहे. तसेच कामासंबंधी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, छ.संभाजीनगर यांच्या पाहणी निरीक्षण ज्ञापनामधील मुद्यांचे अनुपालनही करण्यात आले आहे. सदर काम विहित वेळेमध्ये पूर्ण झाल्यामुळे दिरंगाईचा प्रश्न उद्भवत नाही.

बीड येथील नवीन व्ही. व्ही. आय. पी. विश्रामगृहाचे बांधकाम करणे. सदर कामास दि.१७.०३.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहेत. सदर कामाची मुदत १२ महीने असून कामावरील आज रोजी पर्यंतचा खर्च रु.७२६.८८ लक्ष इतका आहे. कामातील वाढीव परिमाणामुळे अपूर्ण असलेली कामे ही निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार पुर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर कामाच्या सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीची मान्यता अद्याप अप्राप्त आहे. आजपर्यंत झालेले काम कंत्राटदाराने निविदा शर्ती प्रमाणे व मानकाप्रमाणे केले आहे व झालेल्या कामाची तपासणी करून क्षेत्रिय चाचण्या निरीक्षण ज्ञापनाचे अनुपालन करण्यात आले आहे.

बीड येथील शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था परिसरातील नवीन प्रशासकीय इमारतीसाठी सुविधा पुरवणे, प्रस्तुत कामास सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२०२४ योजने अंतर्गत दि.१२.१०.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहेत. या कामाचा पुर्णत्व करण्यासाठी १२ महिने (दि. ११/१०/२०२५ पर्यंत) आहे. उर्वरित कामे विहित मुदतीत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच प्रगतीत असलेली कामे अंदाजपत्रकीय तरतुदी व मानकाप्रमाणे चालू असून वापरण्यात आलेल्या साहित्याचे दक्षता व गुण नियंत्रण जिल्हा प्रयोगशाळा, बीड यांचेकडून साहित्य समाधानकारक असलेबाबत चाचणी अहवाल देखील प्राप्त आहेत .

संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे, प्रस्तुत कामास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून दि.१५.०९.२०२३ रोजी रु.९९९.९७ लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे .सदर कामाचे दि.१४.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत तीनही मजल्यांचे RCC काम ,विटकाम ,आतून व बाहेरून गिलावा काम पूर्ण झाले असून वॉल पुट्टीचे काम प्रगतीत असून पुढील ६ महिन्यात काम अंतिम करण्याचे नियोजन आहे. प्रगतीत असलेली व झालेली कामे अंदाजपत्रकीय तरतुदी व मानकाप्रमाणे असून वापरण्यात आलेल्या साहित्याचे दक्षता व गुण नियंत्रण ,जिल्हा प्रयोगशाळा ,बीड यांचेकडून साहित्य समाधानकारक असलेबाबत चाचणी अहवाल वारांवारीते प्रमाणे प्राप्त आहेत.

प्ररामा-१६ रायमोह- खालापूरी- साक्षाळपिंपरी -सिरसमार्ग रस्ता प्रजिमा-१८ कि.मी. १५/०० ते २५/५०० मध्ये सुधारणा करणे. सदर कामास दि. २४.०६.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले असुन सदर काम दि.३०.०४.२०२३ रोजी पूर्ण झाले आहे. सदर काम कंत्राटदारातर्फे निविदा शर्ती प्रमाणे व मानकाप्रमाणे विहीत मुदतीत पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामासाठी वापरण्यात येणाऱ्या

बांधकाम साहित्याचे आवश्यक चाचणी निष्कर्ष घेण्यात आलेले असून या कामासाठी योग्य गुणवत्ता असलेले बांधकाम साहित्य वापरण्यात आलेले आहे. तसेच कामासंबंधी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, छ.संभाजीनगर यांच्या पाहणी निरीक्षण ज्ञापनामधील मुद्यांचे अनुपालनही करण्यात आले आहे. सदर काम विहित वेळेमध्ये पूर्ण झाल्यामुळे दिरंगाईचा प्रश्न उद्भवत नाही.

एसएच-२११ पालवण- नागझरी- भायाळा- वैद्यकिन्ही —वैजाळा- पाचेगांव- पाचंग्री रस्ता एमडीआर-३१ कि.मी. २०/०० ते २२/०० मध्ये सुधारणा करणे प्रस्तुत कामास मे. सतीश राधाकृष्ण दांगट, बीड यांना दि.२०.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहेत. सदर कामाची मुदत ६ महीने असून, सदर काम अद्याप कंत्राटदाराकडून सुरु करण्यात आले नाही. कंत्राटदारास वेळोवळी लेखी व तोंडी सुचना देण्यात आलेले आहे. काम सुरु करणेस्तव कंत्राटदारास दि.०९.०९.२०२४ रोजी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव यांचेकडून नोटीस देण्यात आलेली असून, अद्याप काम सुरु न केल्यामुळे निविदा शर्ती नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर लांबीत खड्डे नाहीत व रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

सदर कामांच्या अनुषंगाने मा. विधानसभा सदस्यांव्यतिरिक्त इतर नागरीकांची/ लोकप्रतिनिधिंची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली नाही. मा. विधानसभा सदस्य यांचे नमूद केलेल्या कामासंबंधी दिनांक २८/०१/२०२५ ते ७/०२/२०२५ या नजीकच्या कालावधीमध्ये तक्रारी प्राप्त असुन त्याअनुषंगाने कामांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच पुर्ण झालेल्या कामांची दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, छ.संभाजीनगर यांचेकडून तपासणी करण्यात आली आहे. सदर तपासणीमध्ये कोणताही गंभीर मुद्दा नसून त्यांच्या निरिक्षणाचे अनुपालन करण्यात आले आहे. उपरोक्त वस्तुस्थितीचा सर्वंकष विचार करता सदर लक्षवेधीत उल्लेखीत केलेल्या मुद्यांबाबत अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून नियमोचित कार्यवाही झालेली दिसुन येते.

---

लक्षवेधी सूचना क्र.४०८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. भास्कर जाधव, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ४०८पुढीलप्रमाणे आहे. :-

"रत्नागिरी जिल्हयातील साखरीआगर (ता. गुहागर) येथील मच्छिमार जेटीचे सुमारे १३ वर्षांपासून रखडलेले काम सर्व तांत्रिक अडथळे दूर करून माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये सुरू करण्यात आलेले असणे, तथापि माहे मार्च २०२४ पासून सदर काम ठप्प असणे, त्यासाठी ८ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी मंजूर असणे, तथापि काम सुरु झाल्यानंतर पुढील बांधकामाचे डिझाईन संबंधित विभागाकडून कंत्राटदाराला देण्यात न आल्याने गेल्या सुमारे वर्षभरापासून जेटीचे बांधकाम ठप्प असणे, साखरी आगर आणि परिसरातील मच्छिमारांची गैरसोय दूर व्हावी यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन २०१०-११ मध्ये मंजुरी मिळालेल्या सदर जेटीच्या कामामध्ये आलेले अनेक अडथळे, ते दूर करण्यासाठी गेलेला सुमारे १३ वर्षांचा कालावधी, त्यानंतर बांधकाम सुरु होऊन संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे पुन्हाकाम बंद पडल्यामुळे या भागातील मच्छिमारांमध्ये असलेली तीव्र संतापाची आणि चिडीची भावना, कंत्राटदाराला पुढील बांधकामाचे डिझाईन वेळेत न देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे निवेदन

रत्नागिरी जिल्हयातील साखरीआगर (ता. गुहागर) येथील मच्छिमार जेटीचे काम प्रथमतः सन २०१०-११ मध्ये मच्छिमारांसाठी सूविधा पुरविणे या कामास राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दिनांक १५.१२.२०११ शासन निर्णयान्वये रु. २.९६ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर तांत्रिक मान्यता देऊन निविदा कार्यवाही पूर्ण करून कार्यरंभ आदेश ही देण्यात आला. सदर जागेवर ऑक्टोबर २०१२ मध्ये काम करतेवेळी मच्छिमारांनी तीव्र विरोध केल्याने मत्स्यव्यवसाय विभागाच्या आदेशानुसार मंजूर जागेपासून ८० मी. पश्चिमेची निवडण्यात आली. तद्नंतर CWPRS यांचीही मान्यता घेण्यात आली. तथापि सदर कामास MCZMA मार्फत काम स्थगित करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानंतर MCZMA ची परवानगी प्राप्त करुन SEIAA (Straight Environmental Impact Assessment Authority) यांचीही परवानगी घेण्यात आली. सदर कामाचे रु. २.९५ कोटी रकमेच सुधारीत अंदाजपत्रकही सादर करण्यात आले होते तथापि, सुधारित अंदाजपत्रक करण्याऐवजी नवीन अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या. त्यानुसार RCC जेट्टी बांधकामाचे रु. ६ कोटी रकमेचे ढोबळ अंदाजपत्रक मंजुरीसाठी मत्स्यव्यवसाय विभागास सादर करण्यात आले होते. यावर मत्स्यव्यवसाय विभागानी सदर कामास निधी उपलब्ध करुन देता येणार नाही व सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. त्याअनुषंगाने रु. ८.४३ कोटी रकमेचा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मत्स्यव्यवसाय विभागास सादर करण्यात आला होता. तथापि तत्कालीन उपमुख्यमंत्री महोदयांच्या प्राप्त झालेल्या सूचनेस अनुसरुन, प्रस्तुत कामास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ४७११ समुद्रधूप प्रतिबंधक बंधारे बांधकाम या लेखाशीर्षाखाली दिनांक २४.०५.२०२२ रोजी रु. ८.४३ कोटी रकमेस मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन प्रत्यक्षात काम प्रगतीत आहे.

***

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. २२९२**

**श्री. उमेश यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना :-**

"भिवंडी-वाडा भागामधून वाडा- मनोर सिसि रोड बनवणेबाबत निविदा निघालेली असून सदर निविदा घेणारे ठेकेदार हे ब्लॅकलिस्टेड करण्याचे व एसआयटीबी चौकशी लावण्याचे अनेक नागरीकांची लोकप्रतिनिधींची तक्रार असूनही सदर ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी या ठेकेदाराला निविदा देण्यात आली सदर ठेकेदारांनी भिवंडी महानगर पालिकेतील भुयारी गटार योजनेचे काम अति निकृष्ट दर्जाचे केलेले असुन ४२ कोटीच्या निविदेमध्ये १०० टक्के बिल अदायगी घेऊन ३० टक्के काम अपूर्ण सोडून दिलेले आहे ठेकेदाराने मोठ्या प्रमाणावर संबंधित अधिकाऱ्यांबरोबर गैरव्यवहार व गैरकारभार करुन बिले काढली असून संबंधित ठेकेदाराला कायदयाचे व भ्रष्टाचाराचे कुठलेही भय नसून त्याने वाडा-मनोर रोडमध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणावर गैरकारभार करावयास घेतलेले आहे. त्याने अतिनिकृष्ट दर्जाचे काम करत असलेबाबत दिनांक २१/०२/२०२५ व २४/२/२०२५ रोजी उप अभियंता सार्वजनिक बांधकाम भिवंडी मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता ठाणे पालघर यांना तक्रार दिलेले असुन संबंधित ठेकेदाराने जनतेचे पैसे स्वतःची जहागीरदारी समजलेली आहे त्याने अशा निविदा घेऊन बिले काढण्याचे दुकान थाटलेले आहे याचप्रमाणे २००५ ते २०२४ पर्यंतचे ईतर दोन ठेकेदारांनी सुध्दा १२०० कोटीची चुरडा केलेला आहे त्यामध्ये सुप्रिम कंपनी तथा जिजाऊ कन्स्ट्रक्शन यांना ब्लॅकलिस्टेड करण्यापर्यंत शासनाकडे अहवाल पाठवुन पुर्तता करण्यात आलेली आहे परंतु प्रशासनामध्येच दुजाभाव असुन गैरव्यवहाराला खतपाणी घातले जात आहे कारण भिवंडी येथील कामतघर धामणकर नाका सिसिरोड हे सुध्दा अतिनिकृष्ट दर्जाचे काम झालेले असुन ५० टक्के कामे बाकी असतांना संबंधित ठेकेदाराला सुध्दा ८५ टक्के बिलअदायगी झालेली आहे यावरुन सार्वजनिक बांधकाम खात्याचे गैरव्यवहार व गैरकारभार निदर्शनास आल्यामुळे शासनाने संबंधितांविरुध्द करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

## मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

मनोर-वाडा-भिवंडी दुपदरी रस्त्याचे चौपदरीकरण प्रकल्प खाजगीकरणा अंतर्गत "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर राबविण्यात आला होता. प्रकल्पाचे उद्योजक मे.सुप्रिम कंपनी रस्ता देखभाल दुरुस्तीस असमर्थ ठरल्यामुळे, सदर रस्ता सुस्थितीत ठेवण्याबाबत स्थानिक प्रतिनिधी, राजकिय व सामाजिक संघटना, स्थानिक जनता यांच्याकडून प्राप्त तक्रारी व आंदोलने यामुळे शासन पत्र, दि. ११/१०/२०१९ अन्वये उद्योजका समवेत केलेला करारनामा संपुष्टात आणण्यात आला असून, पथकर वसूली बंद करण्यात आली आहे. तद्नंतर सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे.

मनोर-वाडा राज्यमार्ग क्र.३४ सा.क्र.कि.मी. २९/५५० ते ५३/८०० या लांबीमध्ये आणि वाडा-भिवंडी राज्यमार्ग क्र. ३५ सा.क्र.कि.मी. ४९/००० ते कि.मी. ८९/७०० या लांबीमध्ये रस्त्याची सुधारणा करणे या कामाकरीता दि. ०५/०३/२०२४ च्या आदेशान्वये रक्कम रु. १०४२.६० कोटी करीता प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर काम कार्यान्वित करणे करीता दि. १५/१०/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आले आहेत. सदर कामाच्या करारनाम्यात प्रामुख्याने भिवंडी ते वाडा आणि वाडा ते मनोर या रस्त्याच्या ५५.६१० कि.मी. लांबीचे चारपदरी कॉक्रीटीकरणाच्या कामाचा समावेश आहे. मनोर

वाडा भिवंडी या रस्त्याचे चार पदरी कॉक्रीटीकरणाचे काम करारनाम्याच्या तरतुदीप्रमाणे ३० महिन्याच्या विहित मुदतीत पुर्ण करण्याचे नियोजित आहे. सदरचे काम प्रकल्पाच्या करारनाम्यातील तरतूदीनुसार प्रगतीत आहे.

मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा.लि. ठाणे या कंत्राटदारा विरोधात प्राप्त विविध तक्रार अर्ज व दि. ३१/०८/२०२३ रोजी झालेल्या दुर्घटनेच्या अनुषंगाने वाडा ते भिवंडी राज्यमार्ग ७६ सा.क्र.कि.मी. ४९/००० ते ८९/१०० या ४०.१०० कि.मी. लांबीत मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा.लि. यांनी मागील तीन वर्षात केलेल्या कामांची चौकशी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांचेकडून करण्यात आली असून, त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

भिवंडी येथील कामतघर धामणकर नाका सी.सी. रोडचे काम मंजूर असून, अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु करण्यात आलेले नाही.

भुयारी गटाराचे काम भिवंडी महानगरपालिकेच्या अखत्यारित येत असून, सदरचे काम भिवंडी महानगरपालिकेकडून कार्यान्वीत आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ प्रकल्प रक्कम रु. ४२७.९८ कोटीचा मंजूर करण्यात आलेला आहे. या कामास दि. ०६/०७/२०१८ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर योजनेमध्ये प्रस्तावित एकूण ०४ प्रकल्प आहेत.

(१) इद्रगाह स्लॉटर हाऊस येथील ३० एम.एल.डी. क्षमतेचे मल:शुध्दीकरण केंद्र सन २०२२ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(२) बकरा बाजार येथील २९ एम.एल.डी. क्षमतेचे मल:शुध्दीकरण केंद्राचे काम पूर्ण झालेले आहे. मिल्लत नगर येथील काम पार्कींग पंपींग स्टेशनचे काम पूर्ण झालेले असून, सदर मल:शुध्दीकरण केंद्र अंशत: कार्यान्वित करण्यात आलेले आहे. सदर मल:शुध्दीकरण केंद्रांतर्गत येत असलेले गॅलेक्सी सिनेमा पंपींग स्टेशन रायजिंग मेन वाहिनीचे काम अंतिम टप्प्यात असून, सदर काम पूर्ण करुन बकरा बाजार मल:शुध्दीकरण केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेचे महानगर पालिकेचे नियोजन आहे.

(३) मानससरोवर स्टेपींग गार्डन येथील ३१ एम.एल.डी. क्षमतेच्या मल:शुध्दीकरण केंद्राचे काम पूर्ण झालेले असून, सद्य:स्थितीत इलेक्ट्रिकल मेकॅनिकल काम प्रगतीत आहे.

(४) भादवड मल:शुध्दीकरण केंद्राचे काम १०० % पूर्ण झाले असून, उर्वरित रायजिंग मेन पाईप लाईनचे काम मार्च,२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पांतर्गत असलेल्या १.ब्राह्मणआळी, २.टावरे कंपाऊंड, ३. पद्मानगर ४. कामतघर ५. अरिहंत सिटी, भादवड ६. गॅलक्सी व ७. मिल्लतनगर अशा ०७ पंपींग स्टेशनची कामे १००% पूर्ण झालेली आहेत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने भुयारी गटार योजना टप्पा-२ प्रकल्पाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक सल्लागार म्हणून दि. १०/४/२०१८ रोजीच्या करारनाम्यानुसार नियुक्ती करण्यात आलेली असून, योजने अंतर्गत झालेल्या व होत असलेल्या संपूर्ण कामाची गुणवत्ता तपासली जात असून, त्यांच्या देखरेखीखाली प्रकल्पाचे काम सुरु आहे. भुयारी गटार योजना टप्पा-२ मध्ये अंतर्भूत कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण आय.आय.टी. मुंबई व पुणे अभियांत्रिकी शासकीय महाविद्यालय (COEP) पुणे या संस्थेमार्फत करण्यात आलेले आहे. या संस्थांकडून काम गुणवत्तापुर्वक झाले असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यावरच वेळोवेळी संबंधितांस देयके प्रदान करण्यात आलेली आहेत.

**************

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक ६७०</u>

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन

मा.श्री. रोहीत पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६७० पुढीलप्रमाणे आहे :-

"महाशिवरात्री हा धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा सण असून, या निमित्ताने सांगली आणि परिसरात 'द्राक्ष दिन' साजरा केला जातो. महाराष्ट्रातील सांगली, नाशिक आणि पुणे हे द्राक्ष उत्पादनाचे प्रमुख केंद्र आहेत, मात्र अनेकदा शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नाहीत, त्यामुळे हा उपक्रम महत्त्वाचा ठरतो. द्राक्ष दिन साजरा करण्यामागचा उद्देश म्हणजे लोकांनी मोठ्या प्रमाणावर द्राक्ष आणि बेदाणे खरेदी करावेत, ज्यामुळे शेतकऱ्यांना चांगला बाजारपेठ मिळेल आणि त्यांचे उत्पन्न वाढेल. यामुळे शेतकरी थेट ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतात आणि मध्यस्थांचा हस्तक्षेप कमी होतो, तसेच, द्राक्षे पोषणमूल्यांनी समृद्ध असल्याने आरोग्यासाठीही फायदेशीर असतात. शिवरात्रीच्या उपवासात अनेक लोक फळे खातात, त्यामुळे द्राक्ष दिनाच्या माध्यमातून हा सण कृषी आणि आरोग्यवर्धक चळवळीशी जोडला जातो, अशा उपक्रमांमुळे शेतकरी आणि ग्राहक दोघांनाही लाभ मिळतो, म्हणूनच शिवरात्रीला 'द्राक्ष दिन' साजरा करणे आवश्यक ठरते. तसेच स्थानिक मान्यता आणि लोकांच्या चर्चेमध्ये असे ऐकण्यास मिळते की, भगवान शंकराला प्रिय असलेला रुद्राक्ष, यातील 'रु' अक्षर हे काढल्यास 'द्राक्ष' शिल्लक राहतात त्यामुळे देखील वरील मागणीसाठी लोक प्रयत्न करीत आहेत, याचा विचार करून सांगली जिल्हा कृषी विभागाचा हा उपक्रम राज्य पातळीवर सरकारने लागू केल्यास, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना खूप मोठा फायदा होऊन द्राक्षाचे उत्पादन येणाऱ्या काळात वाढण्यास मदत होईल, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

<u>मा.श्री.माणिकराव कोकाटे, मंत्री, कृषि महोदयांचे निवेदन</u>

सांगली व नाशिक जिल्हयामधील द्राक्ष हे प्रमुख फळपिक आहे. द्राक्ष फळ पिकास सुयोग्य दर मिळण्यासाठी तसेच द्राक्षाच्या पौष्टिक गुणधर्म यामुळे आहारामध्ये जास्तीत जास्त समावेश होण्याच्या दृष्टीने सांगली जिल्हयामध्ये सन फेब्रुवारी २०२४ मध्ये महाशिवरात्री या धार्मिक दृष्ट्या महत्वाच्या सणाच्या निमित्ताने लोकसहभागातून द्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महाशिवरात्रीच्या दिवसात नाशिक जिल्हयात द्राक्ष हंगाम सुरु असल्याने द्राक्ष ही मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. महाशिवरात्रीनिमित्त द्राक्ष दिनामुळे शेतक-यांना चांगली बाजापेठ जिल्हयात उपलब्ध होते.

उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेवर आधारीत धान्य व खाद्य महोत्सव तसेच फळे, फुले व भाजीपाला महोत्सव इत्यादीचे आयोजन करण्यासाठी मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळता राज्यातील उर्वरीत जिल्ह्यांमध्ये दरवर्षी ५ दिवसांचा "जिल्हा कृषि महोत्सव योजना" ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत शासनाकडून राबविली जाते. सांगली जिल्ह्यात देखील जिल्हा कृषि महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

******************

लक्षवेधी सूचना क्र.१९७४

महाराष्ट्र विधानसभा,
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीप्रमाणे आहे:-

"सोलापूर नाईट लँडिंग साठी होडगी रोड विमानतळ परिसराला लागून असलेली नागरी वसाहत अडचणीची ठरत असल्याचे कारण देत भारतीय विमानतळ प्राधिकरणाने ३०० घरांचे अतिक्रमण हटवण्याची सूचना होडगी रोड विमानतळ प्रशासनाला केली असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, प्रथम डे लँडिंगची सर्व तयारी झालेली असताना डे लँडिंग सुरु न करता नाईट लँडिंग ची तयारी करण्यात येत असल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत असणे, सोलापूर विमानतळ प्रथम ते लँडिंग ची सुरुवात करून बाधित घरांचे पुनर्वसन करूनच ते अतिक्रमण हटवण्यासाठी शासन उपायोजना करणे गरजेचे असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

सोलापूर (होडगी)विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली आहे. सदर विमानतळासाठी एकुण ३६५.८५ एकर जागा संपादित करण्यात आली आहे. यापैकी अंदाजे ४० एकर जमीनीवरती अतिक्रमण झाल्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी कळविले आहे. सदर अतिक्रमण केलेल्या जागेमध्ये अंदाजे ३०० घराचा समावेश आहे. सदर जमीनीवरील अतिक्रमण काढणेबाबत कार्यवाही सुरू असताना विविध पक्षकारांनी दिवाणी न्यायालय, सोलापूर व उच्च न्यायालयामध्ये पिटीशन दाखल केल्या आहेत. यापैकी गट नं.७१/१ व ७१/२ मौजे-मजरेवाडी येथील प्रकरणामध्ये दिवाणी न्यायालय, सोलापूर यांनी दि.३०.११.२०१९ रोजी अंतरीम स्थगिती आदेश दिलेले आहेत. मा. मुख्य सचिव यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मा. न्यायालयामध्ये विमानतळ प्राधिकरणाकडून स्थगिती आदेश उठविणे संदर्भात अर्ज दाखल करणेची कार्यवाही सुरू आहे.

सोलापूर (होडगी) विमानतळाला कोड २ सी व्हीएफआर दिवसाच्या उड्डाणासाठी, ATR-४२ प्रकराच्या विमानासाठी परवाना प्राप्त आहे. नाईट लँडिंग परवाना प्राप्त नाही. सद्यस्थितीत सोलापूर (होडगी) विमानतळ येथून डे लँडिगची सेवा सुरू करण्यात आली आहे.

***